नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3 + Nagpur Post Rs. 3 = 6 — 4 रुपयात

* वर्ष १६ * अंक २८१ * * भंडारा * सोमवार, दिनांक ७ एप्रिल २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

## भाजप जे बोलते ते करते : जेपी नड्डा

■ वृत्तसंस्था, नवी दिली, दि. ६ :

भारतीय जनता पक्ष आज आपला ४६ वा स्थापना दिन साजरा करत आहे. यावेळी पक्षाध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री जेपी नड्डा यांनी दिल्लीतील पक्ष मुख्यालयात भाजपचा ध्वज फडकावला. यानंतर त्यांनी कार्यकर्त्यांना संबोधित केले. ते म्हणाले की, सर्व भाजप कार्यकर्त्यांना यशासोबतच त्यांचा भूतकाळही लक्षात ठेवावा लागेल. आपल्याला आपल्या जुन्या कार्यकर्त्यांशी संवाद साधत राहावे लागेल, त्यांना भेटावे लागेल, त्यांना समजून घ्यावे लागेल. त्या सर्वांच्या संघर्षामुळे आज हा पक्ष जगातील सर्वात मोठा पक्ष बनला आहे. नड्डा पुढे म्हणाले- आम्ही राम मंदिर बांधण्याचे वचन दिले होते आणि ते आम्ही पूर्ण केले. कलम ३७० रद्द करण्याचे आश्वासन दिले आणि ते पूर्ण केले.

# पंतप्रधान मोदींच्या हस्ते रामेश्वरममध्ये नव्या पंबन पुलाचे उद्घाटन

■ वृत्तसंस्था, चेन्नई, दि. ६ :

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी तामिळनाडूतील रामेश्वरम येथे आशियातील पहिल्या उभ्या लिफ्ट स्पॅन रेल्वे पुलाचे उद्घाटन केले. त्याचे नाव पंबन ब्रिज आहे. हा पूल २.०८ किमी लांब आहे. त्याची पायाभरणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नोव्हेंबर २०१९ मध्ये केली. हा आशियातील पहिला व्हर्टिकल लिफ्ट स्पॅन रेल्वे पूल आहे.



२.०८ किमी लांबीचा हा पूल भारतातील तामिळनाडूमधील रामेश्वरम (पंबन बेट) ते मंडपम यांना जोडतो. पंतप्रधान मोदींनी स्वतः नोव्हेंबर २०१९ मध्ये याचा पायाभरणी केला. भविष्य लक्षात घेऊन, ते दुहेरी ट्रॅक आणि हाय-स्पीड ट्रेनसाठी डिझाइन केले आहे. स्टेनलेस स्टीलपासून बनवलेल्या या नवीन पुलावर पॉलिसिलॉक्सेनचा लेप लावण्यात आला आहे, जो गंज आणि समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून त्याचे संरक्षण करेल. जुना पूल २०२२ मध्ये गंज लागल्यामुळे बंद करण्यात आला होता. यानंतर, रामेश्वरम आणि मंडपममधील रेल्वे संपर्क तुटला.

उद्घाटनानंतर, पंतप्रधान मोदी रामेश्वरममधील रामनाथस्वामी मंदिरात भेट देतील आणि पूजा करतील. रामायणानुसार, रामसेतूचे बांधकाम रामेश्वरमजवळील धनुषकोडी येथून सुरू झाले. या कारणास्तव ते श्रद्धेच्या दृष्टिकोनातून देखील महत्त्वाचे आहे. म्हणूनच पंतप्रधान मोदी रामनवमीला त्याचे उद्घाटन करत आहेत.

याशिवाय, पंतप्रधान राज्यात ८३०० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या विविध रेल्वे आणि रस्ते प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन करतील. यावेळी ते एका जाहीर सभेलाही संबोधित करतील. हे इलेक्ट्रो-मेकॅनिकल सिस्टीमवर काम करते. यामुळे, त्याचा मध्यभाग फक्त ५ मिनिटांत २२ मीटरपर्यंत वाढू शकतो. यासाठी फक्त एकाच व्यक्तीची आवश्यकता असेल. तर, जुना पूल कॅन्टिलिव्हर पूल होता. ते एका लीव्हरचा वापर करून मॅन्युअली उघडण्यात आले, ज्यासाठी १४ लोकांची आवश्यकता होती.

तथापि, जर समुद्रातील वाऱ्याचा वेग ताशी ५८ किमी किंवा त्याहून अधिक झाला तर उभ्या प्रणाली काम करणार नाही आणि स्वयंचलित लाल सिग्नल दिला जाईल. वाऱ्याचा वेग सामान्य होईपर्यंत रेल्वे वाहतूक बंद राहील. हे बहुतेकदा ऑक्टोबर ते फेब्रुवारी दरम्यान घडते. रेल्वे सुरक्षा आयुक्तांनी पुलासाठी ७५ किमी प्रतितास वेगमर्यादा मंजूर केली आहे, परंतु हा नियम पुलाच्या मधल्या भागाला, म्हणजेच उंचावलेल्या भागाला लागू होणार नाही.

## वक्फ दुरुस्ती विधेयकाला राष्ट्रपतींची मंजुरी

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ६ :



शनिवारी संध्याकाळी उशिरा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी वक्फ (दुरुस्ती) विधेयकाला मान्यता दिली. सरकारने नवीन कायद्याबाबत राजपत्र अधिसूचना जारी केली. आता केंद्र सरकार नवीन कायद्याच्या अंमलबजावणीच्या तारखेबाबत स्वतंत्र अधिसूचना जारी करेल. २ एप्रिल रोजी लोकसभेत आणि ३ एप्रिल रोजी राज्यसभेत १२ तासांच्या चर्चेनंतर हे विधेयक (आता कायदा) मंजूर झाले.

काँग्रेसचे खासदार मोहम्मद जावेद, एआयएमआयएमचे खासदार असदुद्दीन ओवेसी आणि आपचे आमदार अमानतुल्ला खान यांनी नव्या कायद्याला स्वतंत्र याचिकांमध्ये सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. या याचिकांमध्ये असे म्हटले आहे की वक्फ सुधारणा कायदा मुस्लिम समुदायाविरुद्ध भेदभाव करतो. हा कायदा मुस्लिमांच्या मूलभूत अधिकारांचेही उल्लंघन करतो.

यावर केंद्रीय मंत्री रिजिजू म्हणाले की, या कायद्याचा उद्देश वक्फ मालमत्तेतील भेदभाव, गैरवापर आणि अतिक्रमण थांबवणे आहे. या विधेयकाला राज्यसभेत १२८ सदस्यांनी पाठिंबा दिला, तर ९५ सदस्यांनी विरोध केला. २ एप्रिल रोजी रात्री उशिरा लोकसभेत ते मंजूर झाले. या काळात २८८ खासदारांनी समर्थनात मतदान केले तर २३२ खासदारांनी विरोधात मतदान केले.

## अग्राग्रलेख
## खरीखरी..
# शेतकरी आणि कर्ज

महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांवर आता नवी संक्रांत आलेली दिसते. जानेवारी महिन्याची जी संक्रांत होती. तेव्हा शेतकऱ्यांच्या वर कर्जाची असलेली संक्रांत दूर होईल, अशी आशा होती. मात्र ३१ मार्चच्या अवघे दोन दिवस आधी आपल्या अर्थमंत्र्यांनी शेतकऱ्यांनी कर्जफेड करावी. असा उपदेश म्हणा किंवा आदेश म्हणा किंवा त्याला काहीही म्हणा तो दिला आहे. जानेवारी महिन्यापासून कर्ज फेडीचे आश्वासन अस्तित्वात असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी आपल्यावर मुला-मुलींची लग्नं करून टाकली. आता आपले कृषिमंत्री म्हणतात की, शेतकरी कर्ज घेतात आणि कर्जमाफीची वाट बघत बसतात. कर्जमाफी झाली की त्या पैशातून साखरपुडा आणि लग्नकार्य करतात. माणिकराव कोकाटे यांच्यासारख्या सुजाण कृषी मंत्र्यांनी असे विधान करून शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळले. असे म्हटले तर अजिबात वावगे ठरणार नाही. कर्जमाफी केली नाही आणि शेतकऱ्यांनी कर्ज भरले. तर मुला-मुलींच्या लग्नासाठी शेतकऱ्याला खाजगी सावकाराकडून कर्ज काढावे लागते. हे शेतकरी अंबानीच्या पोराच्या लग्नाप्रमाणे आंतरराष्ट्रीय कितीर्ची लग्न करू शकणार नाहीत. तरीही आपल्या ऐपतीप्रमाणे त्यांना लग्न करणे भागच असते. शेतकऱ्यांच्या बाबतीत अशी अपमानजनक भाषा वापरणे. यावरूनच आपल्या राज्यात शेतकरी किती हतबल आहे तेच दिसून येते. आता बँकांनी आणि लग्नसराईच्या काळात शेतकऱ्यांना कलम १०१ नुसार नोटीसा पाठवलेल्या आहेत. या नोटीसा सुमारे २३ लाख शेतकऱ्यांना पाठवण्यात आलेल्या आहेत. सरकारने कर्जमाफी या विषयावर आपले हात झटकल्यावर कर्ज देणाऱ्या बँकांना वसुली करणे भागच आहे. आता या कर्जदार शेतकऱ्यांचा वाली कोण आहे. ते कुणालाच सांगता येणार नाही. पण ३१ मार्चच्या दोन दिवस आधी कर्जमाफी होणार नाही. हे सांगितल्यावर आता कर्ज भरणे तर सोडाच. खरीप पिकांसाठीही खचार्ची जुळणी कशी करावी. हा सुद्धा मोठा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकलेला आहे. चांगली शेती असलेल्या म्हणजेच चांगले आर्थिक उत्पन्न असलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांनाही शेतकरीच असलेले बाप सुद्धा आपली मुलगी देत नाहीत. हे सध्याचे जळजळीत वास्तव आहे. त्यापेक्षा एखाद्या सरकारी किंवा निमसरकारी नोकरीत काम करणाऱ्या कारकूनाला किंवा चपराशी असला तरी त्याला मुलगी सहज मिळते, अशी स्थिती आहे. आता सरकारने सर्व शेतकऱ्यांनी आपल्या मुलामुलींची लग्नं नोंदणी पद्धतीने करावी. असा कायदा लागू करावा आणि जो कोणी शेतकरी मोठा खर्च करून लग्न करेल. त्याच्या विरोधात कायदा करून कारवाई करावी. म्हणजे शेतकऱ्यांना कर्जमाफी मागण्याची वेळ येणार नाही. आता बऱ्याच प्रमाणात मुलीच्या बापाला हुंडा मागणाऱ्या मुलाच्या बापाचा आवाज हळूहळू समाप्त होत आहे, नव्हे तो संपलाच आहे. फक्त मुलाचे लग्न होत आहे, हेच फार मोठे भाग्य आहे. असेच मुलांच्या बापांना वाटते. त्यामुळे लग्नात हुंड्यामध्ये होंडा मागणेही बंद झालेले आहे. आता बँकांच्या वसुलीकडे आपण वळूया. शेतकऱ्यांचे नेते राजू शेट्टी यांनी सरकारने शेतकऱ्यांना दिलेले कर्जमाफीचे आश्वासन पाळावे. असे आवाहन केलेले आहे. शेतकऱ्यांना संघटित करून राजू शेट्टी हे स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून राज्यभर आंदोलन उभे करत आहेत. जर बँकांचे अधिकारी वसुलीकरता आले. तर त्यांना चोपून काढू, असे राजू शेट्टी म्हणतात. शेट्टी यांनी काहीही म्हटले तरी चोपून काढणे वगैरे गोष्टी जो कोणी करेल. तो शेतकरी जिवंतपणे मरेल, हे तुम्ही लिहून ठेवा. कारण कायदेच तसे आहेत. आस्मानी आणि सुलतानी या दोघांच्याही कचाट्यात शेतकरी आधीच पिचलेला आहे. गेल्या पाच-सहा दिवसांत राज्यात झालेल्या अवकाळी पावसाने आणि गारपिटीने शेतकरी आधीच गार झालेला आहे. सरकार कर्जमाफी करणार म्हणून जिल्हा बँक, सोसायटी आणि इतर राष्ट्रीयकृत बँकांची वसुली थांबली होती. सरकारने हात झटकल्यावर आता बँकांनाही मोकळे मैदान मिळाल्याने शेतकऱ्यांवर कर्ज वसुलीचा वरवंटा फिरू लागलेला आहे. म्हणजे आई जेवू घालेना आणि बाप भीक मागू देईना, अशी शेतकऱ्यांची अवस्था झालेली आहे. त्यातच अजून एक मुद्दा खूप महत्त्वाचा आहे. तो शेतमालाला मिळणाऱ्या भावाबद्दलचा आहे. यावर्षी शेतकऱ्यांना तुरीचे उत्पन्न बऱ्यापैकी झाले आहे. पण तुरीचे दर नेहमीपेक्षा ४० टक्क्यांनी उतरलेले आहेत. कापूस आणि सोयाबीनचे पीक घेणे परवडतच नाही. भाजीपाल्यालाही भाव मिळत नाही. त्यामुळेच शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत आणि आपल्या श्रीमंत राज्यातील गरीब सरकार पळ काढत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची अवस्था त्रिशंकू सारखी झालेली आहे. त्याला धड रडताही येत नाही आणि धड हसताही येत नाही. सरकारने कर्जमाफीचा फेरविचार करावा. असे म्हटले तर सरकारच इतके कर्जबाजारी आहे की, कर्जाच्या बाजारात सरकारचीच पत घसरलेली दिसते. या सर्व परिस्थितीमुळे सरकार आणि शेतकरी यांना, कुणी काय? आणि कसे करावे हे सुद्धा समजेनासे झालेले आहे. हा गोंधळी लोकांचा गोंधळ किती शेतकऱ्यांचा बळी घेईल. हे कोणालाच सांगता येणे शक्य नाही.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# भरधाव टिप्परच्या धडकेत कारचा चुराडा
# एकाचा मृत्यू तर ४ जखमी

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ६ :



अनियंत्रित झालेल्या भरधाव टिप्परने रस्त्याच्या कडेला उभ्या कारला मागून धडक दिली. त्यानंतर टिप्पर एका पानठेल्यात शिरला. टिप्परच्या धडकेत कारचा चुराडा झाला. या अपघातात कारमधील एक जण जागीच ठार झाला तर चौघे जण जखमी झाले. हा अपघात रविवारी दुपारी दोन वाजताच्या सुमारास शहरातील गोरेवाडा परिसरातील पलोटी शाळेसमोर झाला. या अपघातानंतर घटनास्थळावर एकच गर्दी झाली. पोलिसांनी चक्क क्रेनचा वापर करुन चुराडा झालेली कार रस्त्याच्या बाजुला केली. या घटनेनंतर आरोपी टिप्परचालक पळून गेला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एक भरधाव टिप्पर गोरेवाडा पलोटी शाळेसमोरून जात होता. त्या टिप्परचे ब्रेक निकामी झाले.

त्यामुळे टिप्परचालकाचे वाहनावर नियंत्रण सुटले. भरधाव टिप्पर समोर असलेल्या एका कारवर आदळला. त्यानंतर टिप्पर रस्त्याच्या कडेला असलेल्या पानठेल्यात शिरला. या अपघातात कारचा चुराडा झाला. या कारच्या दरवाज्यात फसल्याने कारचालकाचा जागीच मृत्यू झाला. तर पानठेलाचालक आणि तीन ग्राहक असे एकून चार जण जखमी झाले. पानठेलाचालकाला जबर मार लागला असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे. टिप्परच्या समोरील भागामध्ये कार फसली. त्यामुळे चालकाचा दबल्याने गंभीर जखमी होऊन मृत्यू झाला. चारही जखमींवर खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहे.

## चिमुकलीसमोरच वडिलांनी केला आईचा खून

■ महासागर प्रतिनिधी, सोलापूर, दि. ६ :

सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यातील कोर्टी गावात एक अत्यंत धक्कादायक आणि दुःखद घटना घडली आहे. युवराज लक्ष्मण शेरे (वय ३१) याने पत्नी रूपाली युवराज शेरे (वय २५) हिचा गळा दाबून खून केला आणि त्यानंतर स्वतः गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याची घटना घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, युवराज काही दिवसांपासून मानसिक तणावात होता. तो सतत पत्नीशी वाद घालत असे आणि कुटुंबीयांशीही नीट संवाद करत नव्हता. या मानसिक तणावातूनच त्याने टोकाचे पाऊल उचलल्याचे सांगितले जात आहे.


## विकसित भारतासाठी पुणे महानगर प्रदेशाचा विकास वेगवान : अजित पवार

■ महासागर प्रतिनिधी पुणे, दि. ६ :

उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी पुणे महानगर प्रदेश विकास परिषदेअंतर्गत जिल्हा विकास आराखड्यातील कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा (ए आय) वापर, पर्यावरण व परिपूरक अर्थव्यवस्था, उद्योग क्षेत्र व उत्पादकता वाढविण्यासाठी विविध संस्थाकडून सविस्तर आढावा घेतला.

यावेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पोलीस आयुक्त अमितेश कुमार, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, पुणे मनपा आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, मैत्री संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण परदेशी, पिंपरी चिंचवड मनपा आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील तसेच विविध संस्थांचे प्रमुख उपस्थित होते. उपमुख्यमंत्री म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे २०४७ पर्यंत विकसित भारत करण्याचे उद्दिष्ट आहे.






## माणिकराव कोकाटेंची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करा

मुंबई : एक रुपया पीक विमा योजनेवरून शेतकऱ्यांची तुलना भिकाऱ्यांशी करणाऱ्या कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी सरकारकडून मिळणाऱ्या निधीचा उपयोग शेतीऐवजी साखरपुडे, लग्नासाठी करत असल्याचा आरोप शेतकऱ्यांवर लावला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा वारंवार अपमान करणाऱ्या कोकाटेंची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करावी, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी शनिवारी येथे केली.

नाशिकमध्ये अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी माणिकराव कोकाटे यांनी आज केली. यावेळी कोकाटेंनी शेतकऱ्यांच्या तक्रारी ऐकून घेताना, शेतकऱ्यांकडून शासकीय मदतीच्या निधीचा उपयोग शेतीत करण्याऐवजी वैयक्तिक खर्चासाठी होत असल्याची टीका केली. या टीकेचा सपकाळ यांनी आज पत्रकार परिषदेत समाचार घेतला.

सत्तेत आल्यानंतर शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचे आश्वासन महायुतीने दिले होते. ते अद्याप पाळलेले नाही. आता कर्जमाफीसाठी पैसे नाहीत असे सरकार म्हणते. अशातच कर्जमाफीवरून कृषी मंत्र्यांचा शेतकऱ्यांना प्रश्न म्हणजे चोर तो चोर आणि वरून शिरजोर असा प्रकार आहे. शेतकऱ्याला सरकार मदत करते किंवा कर्जमाफी करते म्हणजे काही उपकार करत नाही. तो जनतेचा पैसा आहे, कोकाटेच्या घरचा नाही,असे सपकाळ यांनी यावेळी सुनावले. राज्यातील भाजप महायुतीचे सरकार हे शेतकरीविरोधी आहे. माणिकराव कोकाटे यांनी आपल्या अकलेचे तारे तोडले आहेत. मूठभर उद्योगपतींना १६ लाख कोटींचे कर्ज माफ केले, तेव्हा असा प्रश्न विचारण्याची धमक कोकाटे किंवा सरकारने दाखवली नाही. मग शेतकऱ्यांनाच प्रश्न विचारण्याची हिंमत का होते? असा सवाल सपकाळ यांनी केला आहे. शेतमालाला भाव नाही. शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी भाव मिळत आहे. शेतकरी संकटात असून तो दररोज आत्महत्या करत आहे. शेतकरी आत्महत्येची कृषी मंत्री वा भाजप युती सरकारला लाज वाटत नाही. उलट शेतकऱ्यांनाच अजब प्रश्न विचारला जातो. त्यामुळे हा सत्तेचा माज शेतकरी नक्की उतरवेल हे लक्षात ठेवा, असा इशाराही हर्षवर्धन सपकाळ यांनी यावेळी दिला.

## मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रमाची घोषणा

**मुंबई :** राज्यातील तरुणांना सरकारी प्रशासकीय कामकाजाचा अनुभव मिळावा या हेतूने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम हा पुन्हा सुरू करण्यात आला आहे. फडणवीस यांनी शनिवारी 'एक्स' या समाज माध्यमातून या कार्यक्रमाची घोषणा केली.

या उपक्रमांतर्गत राज्यातील ६० तरुणांची निवड करण्यात येणार असून, त्यांना एक वर्षासाठी जिल्हाधिकारी वा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या अधीन महत्त्वाची जबाबदारी दिली जाईल. तरुणांना प्रशासनासोबत थेट काम करण्याचा अनुभव मिळावा. त्यांच्या ज्ञानाच्या आणि अनुभवाच्या कक्षा विस्ताराव्यात. तसेच त्यांच्या कल्पकतेचा, ताज्या दृष्टिकोनाचा आणि तंत्रज्ञानावरील प्रभुत्वाचा उपयोग प्रशासनाला व्हावा, यासाठी मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. या कार्यक्रमाची अंमलबजावणी नियोजन विभागाच्या अर्थ आणि सांख्यिकी संचालनालयामार्फत होणार आहे. फेलोशिपचा कालावधी १२ महिने असून आणि वयोमर्यादा २१ ते २६ वर्षे ठेवण्यात आली आहे. अर्ज प्रक्रिया ... या संकेतस्थळावरून लवकरच सुरू होईल. अर्ज शुल्क ५०० रुपये असेल. पात्रता म्हणून कोणत्याही शाखेतील किमान ६० टक्के गुणांसह पदवी, एक वर्षाचा अनुभव, मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेचे ज्ञान आणि संगणक हाताळणीचे कौशल्य आवश्यक आहे. निवड प्रक्रियेमध्ये ऑनलाईन चाचणी, निबंध लेखन आणि मुलाखत हे तीन टप्पे असतील. फेलोंना एकूण ६१ हजार ५०० रुपये प्रति महिना देण्यात येणार आहे.

## यंदा झाडांची पद्धतशीर छाटणी होणार

**मुंबई :** पावसाळ्यात वृक्ष उन्मळून पडणे, फांद्या तुटणे या घटना घडून नयेत यासाठी झाडांची पद्धतशीर छाटणी करण्यासाठी उद्यान खात्याने कंबर कसली आहे. यासाठी महानगरपालिकेने परिमंडळ स्तरावर कामगारांना वृक्षछाटणीसंदर्भात विशेष प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली आहे. आतापर्यंत सहा परिमंडळातील कामगार, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले असून पुढील आठवड्यात परिमंडळ मधील कामगारांना प्रशिक्षण देण्याचे नियोजन पालिकेच्या उद्यान खात्याने केले आहे. महानगरपालिकेच्या उद्यान खात्यातर्फे वर्षभर वृक्षछाटणी केली जाते. मात्र, पावसाळ्यापूर्वी या कामावर अधिक भर दिला जातो. दरवर्षी पावसाळ्यात जोरदार वाऱ्यामुळे झाडे उन्मळून पडणे, फांद्या तुटणे आदी घटना घडतात. या दुर्घटनांमध्ये आतापर्यंत अनेकांना प्राण गमवावे लागले असून जखमींचीही संख्या मोठी आहे. तसेच, या घटनांमुळे अनेकदा मोठ्या प्रमाणात वित्तहानी होते. झाडांची शास्त्रीय पद्धतीने छाटणी केल्यास या घटनांना आळा बसू शकतो. मात्र, वृक्ष छाटणी करणाऱ्या कामगारांना याबाबत माहिती नसल्याने अनेकदा अशास्त्रीय पद्धतीने झाडांची छाटणी केली जाते. याबाबत अनेकदा नागरिकांनी पालिकेकडे तक्रारी केल्या आहेत. नागरिकांच्या सूचनेनुसार, महापालिकेने गेल्या वर्षापासून कामगारांना वृक्ष छाटणीचे प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली. यंदाही पालिकेच्या परिमंडळ स्तरावर कामगारांना वृक्ष छाटणीसंदर्भात प्रशिक्षण देण्यात येत आहे. झाडांची शास्त्रीय पद्धतीने छाटणी न झाल्यामुळे झाडांचे सौंदर्य नष्ट होते, त्यांची वाढ खुंटते, तसेच झाडाचा समतोल बिघडून ते कोसळण्याची शक्यता निर्माण होते. अनेकदा घरे, विजेच्या तारा, रस्त्यालगत उभ्या असलेल्या वाहनांवर झाडाच्या फांद्या कोसळतात. महापालिकेतर्फे ही समस्या टाळण्यासाठी कामगारांच्या प्रशिक्षणावर भर देण्यात येत आहे.

# वक्फ बोर्ड विधेयक मुस्लिम बांधवांच्या हिताचे संरक्षण करणारे: हेमंत पाटील

■ महासागर प्रतिनिधी,

**पुणे, दि. ६ :** लोकशाहीचे सर्वोच्च मंदिर असलेल्या लोकसभेत तसेच वरिष्ठ सभागृह 'राज्यसभेत' वक्फ बोर्ड विधेयक मंजूर झाले आहे.राष्ट्रपतींच्या स्वाक्षरी नंतर विधेयकाचे कायद्यात रूपांतर होईल.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारतातील मुस्लिम बांधवांना 'नव उम्मेद' देणारे हे विधेयक त्यांच्या अधिकारांचे संरक्षण करणारे आहे, असे मत यानिमित्ताने इंडिया अगेन्स्ट करप्शनचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि ओबीसी नेते हेमंत पाटील यांनी रविवारी व्यक्त केले आहे. मुस्लिम महिलांचे सक्षमीकरण तसेच सकल मुस्लिम समाजाच्या अधिकारांचे संरक्षण करण्याचा मुख्य उद्देश सरकारचा आहे.विरोधकांनी हे विधेयक मुस्लिम विरोधी असल्याचा अपप्रचार केला.परंतु, हे विधेयक गरीब, मागासलेले मुस्लिम बांधव आणि त्यांच्या परिवारांच्या विकासाचा मार्ग प्रशस्त आणि सुकर करणारे आहे, असे मत पाटील यांनी व्यक्त केले.यूनीफाईड वक्फ मॅनेजमेंट इम्पावरमेंट इफिशिएंशी अॅन्ड डेव्लपमेंट अर्थात 'उम्मीद' मुस्लिम बांधवांच्या विकासासाठी कटिबद्ध असलेले



पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारच्या दुरदृष्टीचे प्रतीक आहे. वैज्ञानिक संस्था असलेले वक्फ बोर्ड धर्मनिरपेक्ष असणे आवश्यक आहे. असे असतांनाही केंद्र सरकारने वक्फ बोर्डातील मुस्लिमेतर यांची संख्या मर्यादित ठेवली आहे.विधेयकासंबंधी भ्रामक माहितीचा प्रचार करीत विरोधकांनी मुस्लिम बांधवांना घाबरवण्याचे काम केले असल्याचा आरोप पाटील यांनी केला.मुस्लिम बांधवांचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास तसेच प्रेम आहे. केवळ दुष्प्रचार करीत मुस्लिम बांधवांच्या मनात संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा दावा करीत अपप्रचाराला बळी न पाडण्याचे आवाहन पाटील यांनी केले आहे.

# वीज बिल कपातीचं आश्वासन देऊन जनतेला एप्रिल फुल केलं हर्षवर्धन सपकाळ यांचा फडणवीसांवर आरोप

■ महासागर प्रतिनिधी,

**मुंबई, दि. ६ :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १ एप्रिलपासून वीजबिलात १० टक्के कपात करण्याचं जाहीर आश्वासन दिलं होतं. मात्र प्रत्यक्षात महावितरणने वीज नियामक आयोगाकडे याचिका दाखल करून दर कपातीला स्थगिती मिळवली आणि जनतेला 'एप्रिल फुल' केलं, असा घणाघात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. टिळक भवन येथे पत्रकार परिषदेत बोलताना सपकाळ म्हणाले की, फडणवीस हे मुख्यमंत्री असूनही स्वतः घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करू शकत नाहीत, हे यातून स्पष्ट होते.२८ मार्च रोजी त्यांनी वीजबिलात कपात करण्याची घोषणा केली, मात्र अवघ्या तीन दिवसांतच ती घोषणा मागे घेण्यात आली. यामागे कोणतीही आर्थिक तयारी नव्हती आणि हे केवळ जनतेची दिशाभूल करणारे पाऊल होते, असा आरोप त्यांनी केला. सपकाळ पुढे म्हणाले, महाराष्ट्रातील वीजदर हे इतर राज्यांच्या तुलनेत अधिक आहेत. आधीच महागाईमुळे जनतेला त्रास होत असताना, स्मार्ट मीटर बसवून वीजबिलात आणखी वाढ झाली आहे. स्मार्ट मीटरमुळे वीजबिल ३० ते ४० टक्क्यांनी वाढले आहे. ही योजना राबवून सरकारने जनतेच्या डोक्यावर अतिरिक्त आर्थिक भार टाकला आहे. विधानसभा निवडणुकीत भाजपा युतीने कोणतीही आर्थिक तयारी न करता आश्वासनांची खैरात केली होती, असा आरोपही त्यांनी यावेळी केला. शेतमालाला हमीभाव, शेतकरी कर्जमाफी, लाडकी बहिणीला२१०० रुपये देण्याचे वचन दिले गेले होते. मात्र सत्तेत आल्यानंतर या आश्वासनांपासून सरकार दूर पळत आहे. शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्यासाठी पैसे नाहीत असे सांगून ३१ मार्चपूर्वी कर्ज फेडा, असा इशारा अर्थमंत्री अजित पवार यांनी दिला. ही शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखी गोष्ट आहे, असे सपकाळ म्हणाले. पैशाचं सोंग करता येत नाही, हे माहित असूनही निवडणुकीच्या काळात खोट्या आश्वासनांची उधळण का केली गेली? ही केवळ जनतेची क्रूर थट्टा आहे, असा संतप्त सवाल करत त्यांनी सरकारवर जोरदार टीका केली. या संपूर्ण प्रकरणावरून राज्य सरकारची आश्वासनं केवळ जुमले ठरत असून, त्यांना प्रत्यक्षात उतरविण्याची क्षमता किंवा इच्छाशक्ती नसल्याचं पुन्हा एकदा स्पष्ट झालं आहे, असं हर्षवर्धन सपकाळ यांनी ठामपणे नमूद केलं.

# तापमानात सतत चढ उतार सुरू

**राज्यातही चटका**

**वाढणार, ठाण्यात १८ मिमी पाऊस**

■ महासागर प्रतिनिधी,

**मुंबई, दि. ६ :** मुंबईत सध्या असह्य उकाडा सहन करावा लागत असून पुढील दोन ते तीन दिवस हीच परिस्थिती कायम राहण्याचा अंदाज प्रादेशिक हवामान विभागाने व्यक्त केला आहे. मागील काही दिवसांपासून प्रचंड उकाडा, उन्हाच्या झळा आणि काहिली यामुळे मुंबईकर अक्षरश: पोळून निघाले आहेत. मुंबईच्या तापमानात सतत चढ उतार सुरू आहेत. अचानक तापमानात वाढ होते तर कधी अचानक घट होते. या वातावरणाचा त्रास मुंबईकरांना सहन करावा लागत आहे. मार्च महिना सुरू झाला तरी तापमानात वाढ होण्यास सुरुवात झाली असून मध्यंतरी वातावरणातील बदलामुळे तापमान कमी-जास्त होत असल्याचेही दिसून आले. तीच परिस्थिती या महिन्यातही कायम आहे. हवामान विभागाच्या कुलाबा केंद्रात शनिवारी अंश३३.४ . सेल्सिअस तर, सांताक्रूझ केंद्रात ३५.४. अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. तापमान कमी नोंदले गेले असले तरी, कोरड्या, उष्ण वाऱ्यांनी उकाड्याची जाणीव अधिक त्रासदायक झाली आहे. दरम्यान, प्रादेशिक हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मुंबईत पुढील काही दिवस कोरड्या वातावरणाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या कालावधीत किमान तापमानाचा पारा२४ ते २६ अंशापर्यंत जाऊ शकतो. त्यामुळे सकाळच्या वेळीही अस्वस्थता जाणवू शकते. तर, कमाल तापमानाचा पारा ३४ ते ३६ अंशापर्यंत असेल. या कालावधीत आकाश निरभ्र असू शकेल. त्यामुळे कोरडे वारे आणि उन्हाच्या झळा यांचा ताप होऊ शकेल. मागील आठवड्यात मुंबईतील तापमानात सलग चार ते पाच दिवस घट झाली होती. त्यामुळे मुंबईकरांना तापमान दिलासा मिळाला होता. मात्र, उकाड्यापासून मुंबईकरांची सुटका झालेली नाही. त्यामुळे पुढचे आणखी काही दिवस मुंबईकरांना हा उकाडा सहन करावा लागणार आहे.

**एप्रिलमध्ये तापमानवाढीची शक्यता**

यंदाच्या उन्हाळी हंगामात (एप्रिल ते जून) देशाच्या बहुतांश भागात कमाल तापमान सरासरीपेक्षा अधिक राहण्याची शक्यता आहे. महाराष्ट्राच्या बहुतांश भागात उन्हाचा चटका तापदायक ठरणार असून राज्यात उष्णतेच्या तीव्र लाटा येण्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. एप्रिल महिन्यात महाराष्ट्र अधिक तापण्याची शक्यता असल्याचे हवामान विभागाकडून सांगण्यात आले. उत्तर कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तीव्र उष्ण लाटांचा इशारा आहे. मराठवाडा आणि विदर्भातही काही प्रमाणात उष्ण लाटांची शक्यता आहे.

# इस्त्रीमध्ये लपवून कोट्यावधींच्या सोन्याची तस्करी, जेद्दाहहून आलेल्या प्रवाशाला विमानतळावरून अटक



**मुंबई :** इस्त्रीमध्ये लपवून सोन्याच्या तस्करीचा प्रयत्न सीमाशुल्क विभागाने हाणून पाडला आहे. याप्रकरणी दोन इस्त्र्यांमधून सव्वा किलो सोने जप्त करण्यात आले असून त्याची किंमत एक कोटी दोन लाख रुपये असल्याची माहिती अधिकाऱ्याने दिली. आरोपी प्रवाशाला सीमाशुल्क कायदा १४६२ अंतर्गत गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी आंतरराष्ट्रीय टोळीचा सहभाग असल्याचा संशय असून त्याबाबत सीमाशुल्क विभाग अधिक तपास करत आहेत. जेद्दाह येथून मुंबईला आलेल्या प्रवाशाला संशयावरून शुक्रवारी विमानतळावर अडवण्यात आले होते. त्याची झडती घेण्यात आली. तसेच त्याच्याकडील वस्तूंची स्कॅनरद्वारे तपासणी करण्यात आली. त्यावेळी दोन इस्त्र्यांमध्ये काही संशयीत भाग असल्याचे आढळले. इस्त्री फोडल्यानंतर २४ कॅरेट सोन्याच्या तुकडे सापडले. दोन इस्त्र्यांमध्ये मिळून एकूण १६ तुकडे जप्त करण्यात आले. त्यांचे एकूण वजन १२०० ग्रॅम आहे. जप्त करण्यात आलेल्या सोन्याची किंमत एक कोटी दोन लाख रुपये असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. त्यानंतर आरोपी प्रवाशाला सीमाशुल्क कायदा १ अंतर्गत गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. **सोने तस्करीसाठी नवनवीन फंडे**सोने तस्करीसाठी तस्कर विविध क्लृप्त्या लढवत आहेत. चॉकलेटचा थर चढवलेले सोने वेष्टनात दडवून तस्करी केली जाते. याशिवाय गृहउपयोगी वस्तू, लॅपटॉप, हेअर ड्रायरसारख्या वस्तूंमध्ये सोने लपवूनही त्याची तस्करी केली जाते. सध्या शरीरात, अंतर्वस्त्रांमध्ये लपवूनही सोन्याची तस्करी केली जाते.

## टँकरच्या चाकाखाली सापडून बालकाचा मृत्यू

**पुणे :** टँकरच्या चाकाखाली सापडून दीड वर्षांच्या बालकाचा मृत्यू झाल्याची दुर्देवी घटना वारजे भागातील गणपती माथा परिसरात घडली. याप्रकरणी टँकर चालकाला अटक करण्यात आली असून, टँकर मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधोक्षक महेश वहाळे (वय १८ महिने) असे मृत्युमुखी पडलेल्या बालकाचे नाव आहे. याप्रकरणी टँकर चालक सनी प्यारे बारसकर (वय ३३, सध्या रा. वडाचा गणपती मंदिराजवळ, दत्तवाडी, मूळ रा. भैय्यावाडी, सहापूर, जि. बैतुल, मध्य प्रदेश) याला अटक करण्यात आली. याबाबत सतीश वसंत टिकारे (वय ६५, रा. टिकारे हाईट्स, गणपती माथा, वारजे) यांनी वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वारजे भागातील गणपती माथा परिसरातील रहिवासी छाया वहाळे यांचा नातू अधोक्षक शनिवारी सायंकाळी साडेसातच्या सुमारास घरासमोर खेळत होता. या परिसरातील एका इमारतीतील टाकीत पाणी भरण्यासाठी टँकर आला होता. त्या वेळी टँकर मागे नेत असताना घरासमोर खेळणारा अधोक्षक मागच्या चाकाखाली सापडला. त्याचा जागीच मृत्यू झाला.

# घरफोडीचे २० गुन्हे दाखल असलेला आरोपी अखेर जेरबंद



■ महासागर प्रतिनिधी,

**मुंबई, दि. ६ :** शीव कोळीवाडा येथील सरदार नगरमध्ये एका घरात दागिन्यांची चोरी करणाऱ्याला मुंबई पोलिसांनी सापळा रचून मोठ्या शिताफिने अटक केली. या चोराकडून चोरण्यात आलेला सर्व मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. त्याच्यावर घरफोडीचे २० गुन्हे दाखल असून, न्यायालयाने त्याला ८ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. शीव येथील सरदार नगरातील एका घरातील सर्वजण २१ ते २४ मार्च या कालावधीत शहराबाहेर गेले होते. यावेळी घरात कोणीही नसल्याचे पाहून चोराने स्वयंपाक घराच्या खिडकीचे लोखंडी गज तोडून आत प्रवेश केला. घरातील सोने चांदीचे दागिने घेऊन चोर पसार झाला. घरातील व्यक्ती परत आल्यावर त्यांना घरामध्ये चोरी झाल्याचे लक्षात आले. त्यामुळे त्यांनी अँटॉप हिल पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार केली. पोलिसांनी गुन्हा नोंदवून प्रकरणाचा तपास सुरू केला. तपासादरम्यान संबंधित आरोपीचे नाव निखिल कांबळे (२४) असून तो कोणताही रोजगार करत नसल्याचे उघड झाले. तसेच, चेंबूर येथील आर. सी. एफ. एच. पी कॉलनीत तो वास्तव्यास असल्याचे निष्पन्न झाले. याची माहिती मिळताच पोलिसांनी संबंधित ठिकाणी शोध घेतला. मात्र, त्याठिकाणी आरोपी सापडला नाही. आरोपी हा सराईत चोर असल्यामुळे आसपासच्या वाशीनाका, चेंबूर, चुनाभट्टी, नेहरूनगर, कुर्ला, गोवंडी आदी भागांमध्ये त्याचा शोध घेण्यात आला. दरम्यान, मानखुर्द येथील साठे नगर परिसरात दररोज सकाळी १० ते दुपारी २ दरम्यान आरोपी येत असल्याचे पोलिसांना सूत्रांकडून समजले. त्यांनतर पोलिसांनी वेशभूषा बदलून २ एप्रिल रोजी सकाळी ४ वाजता सापळा रचला.दुपारी साधारण २ वाजता आरोपी परिसरात येताच त्याला मोठ्या शिताफीने पोलिसांनी ताब्यात घेतले. तपासात आरोपीने शीव आणि व्ही. बी नगर परिसरात घरफोडी केल्याची कबुली दिली. तसेच, गुन्हयात चोरी झालेला १०० टक्के मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला. त्याला पोलिसांनी न्यायालायात सादर केल्यानंतर न्यायालयाने त्याला८ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

# आवक वाढल्याने मिरची, शेवगा, भुईमूग शेंग, कैरीच्या दरात घट

■ महासागर प्रतिनिधी,

**पुणे, दि. ६ :** आवक वाढल्याने हिरवी मिरची, शेवगा भुईमूग शेंग, कैरीच्या दरात घट झाली. अन्य फळभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात रविवारी राज्य, तसेच परराज्यातून मिळून४० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेशातून मिळून १८ ते २० टेम्पो हिरवी मिरची, कर्नाटक, गुजरातमधून मिळून ३ ते ४ टेम्पो कोबी, कर्नाटकातून ३ ते ४ टेम्पो घेवडा, आंध्र प्रदेश, तामिळनाडूतून मिळून ५ ते ६ टेम्पो शेवगा, राजस्थानातून टेम्पो गाजर, हिमाचल प्रदेशातून दोन ट्रक मटार, कर्नाटकातून टेम्पो भुईमूग शेंग, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, कर्नाटकातून ७ ते ८टेम्पो तोतापुरी कैरी, गुजरात



आणि मध्य प्रदेशातून ८ते १० टेम्पो लसूण अशी आवक परराज्यातून झाली, अशी माहिती मार्केट यार्डातील ज्येष्ठ अडते विलास भुजबळ यांनी दिली.पुणे विभागातून सातारी आले ५५० ते ६०० गोणी, भेंडी ७ ते ८ टेम्पो, गवार ३ ते ४ टेम्पो, टोमॅटो ८ ते १० हजार पेटी, हिरवी मिरची ४ ते ५ टेम्पो, ढोबळी मिरची ८ ते १० टेम्पो, काकडी ७ ते ८ टेम्पो, कोबी ५ ते ६ टेम्पो, फ्लॉवर ८ ते १० टेम्पो, तांबडा भोपळा ८ ते१० टेम्पो, कांदा ५० ते ५५ ट्रक, तसेच इंदूर, आग्रा, स्थानिक भागातून बटाट्याची आवक झाली. मेथी, शेपूच्या दरात वाढ

मेथी, शेपूच्या दरात गेल्या आठवड्याच्या तुलनेत वाढ झाली. कांदापात, अंबाडीच्या दरात घट झाली. चाकवत, पुदिना, मुळे, चुका, राजगिरा, चुका, चवळई, पालक या पालेभाज्यांचे दर स्थिर आहेत. तरकारी विभागात कोथिंबीर एक लाख हजार जुडी, मेथीच्या हजार जुडींची आवक झाली, अशी माहिती तरकारी विभागातील व्यापाऱ्यांनी दिली. घाऊक बाजारात पालेभाज्यांचे शेकड्याचे दर पुढीलप्रमाणे कोथिंबीर-५०० ते १२००, मेथी १२०० ते १५००, शेपू ८०० ते १०००, कांदापात-६०० ते १०००, चाकवत ४०० ते ६००, करडई-३०० ते ६००, पुदिना ३०० ते ५००, अंबाडी ४०० ते ५००, मुळे ८०० ते १२००, राजगिरा-४०० ते ६००, चुका ५०० ते८००, चवळई-३००-६००, पालक- ८००-१२००.

# जंगली पशू, पक्ष्यांना बर्ड फ्लयूची लागण, केंद्र सरकार सतर्क; कुक्कुटपालकांसाठी मार्गदर्शक सूचना

■ महासागर प्रतिनिधी,

**मुंबई, दि. ६ :** महाराष्ट्रासह देशातील आठ राज्यांमध्ये जंगली पशू, पक्ष्यांना बर्ड फ्लयूची लागण झाल्याचे समोर आले आहे. केंद्र सरकारने तातडीने दखल घेऊन कुक्कुटपालन व्यवसायाला असलेला संभाव्य धोका टाळण्यासाठी कुक्कुटपालक आणि औषध निर्माता कंपन्यांबरोबर संयुक्त बैठक घेऊन उपाययोजनांबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. देशात महाराष्ट्र, छत्तीसगड, झारखंड, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, तेलंगाणा, कर्नाटक आदी आठ राज्यांमधील एकूण ३४ ठिकाणी कुक्कुटवर्गीय पक्ष्यांना बर्ड फ्लयूची लागण झाल्याचे समोर आले आहे. त्यापैकी



झारखंडमध्ये दोन, तेलंगाणामध्ये तीन आणि छत्तीसगडमध्ये दोन ठिकाणी बर्ड फ्लयू सक्रीय असल्याचे दिसून आले आहे. या ठिकाणी गावरान कोंबड्या किंवा परसबागेतील कोंबड्यांना लागण झाली आहे. प्रत्यक्ष व्यावसायिक कुक्कुटपालन केंद्रात (पोल्ट्री) लागण झालेली नाही. जंगली पशू आणि पक्ष्यांना बर्ड फ्लयू लागण होण्याच्या घटना वाढल्यात आहेत. महाराष्ट्रात वाघ, बिबट, गिधाड, कावळे, ससाणा आणि बगळे. मध्य प्रदेशात पाळीव मांजर, राजस्थानमध्ये बगळे आणि बिहारमध्ये कावळ्यांना बर्ड फ्लयूची लागण झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. कोंबड्यांना प्रतिबंधक लस देण्याची सूचना देशाच्या वेगवेगळ्या भागात बर्ड फ्लयूची लागण झाली असली तरीही व्यावसायिक कुक्कुटपालन केंद्रात (पोल्ट्री) अद्याप बर्ड फ्लयूची लागण झाली नाही.

पण, संभाव्य धोका टाळण्यासाठी जैव सुरक्षेची काळजी घेण्यासह कोंबड्यांना भोपाळ येथील भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थेने तयार केलेली एच ४ एन २ (लो पॅथोजेनिक एव्हियन एन्फ्लूएंझा) या प्रतिबंधक लस देण्याची सूचना दिली आहे. देशात २००६ मध्ये पहिल्यांदा कोंबड्यांना बर्ड फ्लयूची लागण झाली होती.

त्यानंतर आता बर्ड फ्लयूच्या विषाणूंचे अन्य प्रजातींमध्ये संक्रमण झाले आहे. वाघ, बिबटे, मांजरांसह जंगली पक्ष्यांना झालेली लागण धोक्याची घंटा मानली जात आहे. भविष्यात बर्ड फ्लयूच्या विषाणूचे मानवा-मानवांमधील संक्रमण टाळण्यासाठी जगभरात संशोधन सुरू झाले आहे. राज्यात २०२१ मध्ये आलेल्या बर्ड फ्लयू साथीच्या काळात एकत्रित उपाययोजना करून साथ नियंत्रणात आणली होती.

# रामाचे नाव घेण्याची भाजपची पात्रता नाही : प्राण जाए पर वचन न जाए असे सरकारला सांगण्याची गरज, : उद्धव ठाकरें

■ महासागर प्रतिनिधी,

**मुंबई, दि. ६ :** राम जसे वागले, तसे वागण्याचा प्रयत्न करावा, इतक्याच त्यांना शुभेच्छा, असा टोला उद्धव ठाकरे यांनी भाजपला स्थापना दिनाच्या शुभेच्छा देताना लगावला. रामाचे नाव घेण्याची भाजपच्या लोकांची पात्रता नाही. प्राण जाए, पर वचन न जाए असे सरकारला सांगण्याची गरज आहे, अशी टीका ठाकरे यांनी शेतकरी कर्जमाफीच्या मुद्द्यावरून सरकारवर केली. राम नवमी निमित्त शिवसेना ठाकरे गटाकडून शिव संचार सेनेच्या लोगोचे अनावरण करण्यात आले. उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत मातोश्रीवर हा अनावरण कार्यक्रम पार पडला. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे यांनी भाजपवर जोरदार निशाणा साधला. भाजपचा आजचा वर्धापन दिन हा तिथीप्रमाणे, तारखेप्रमाणे की त्यांच्या सोयीप्रमाणे आहे. हे आधी सांगा. राम नवमी हा तुमच्या पक्षाचा स्थापना दिवस असेल, तर प्रभू रामचंद्र जसे वागले होते, तसे वागण्याचा प्रयत्न करा, या एवढ्याच माझ्या त्यांना शुभेच्छा आहेत, असे उद्धव ठाकरे म्हणाला. वक्फ बिलावरून आम्ही आमची भूमिका मांडली आहे.



वक्फ विधेयकावरून आम्ही कोर्टात जाणार नाहीत. काँग्रेस आणि इतर पक्ष कोर्टात जाणार असतील, तर त्यांना जाऊ द्या. आम्हाला जे म्हणायचे होते, ते आम्ही सांगितले आहे, असे उद्धव ठाकरे म्हणाले. प्राण जाए पर वचन न जाए असे सांगण्याची गरज

निवडणूक जिंकण्यासाठी भाजपने लाडकी बहीण योजनेला वाढीव पैसे देऊ बोलले होते. शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. मात्र, आता प्राण जाए पर वचन न जाए असे सरकारला सांगण्याची गरज आहे. कारण त्यांनी लोकांना फसवणून मते घेतली, हे आता उघड झालेले आहे. त्यामुळे सरकारच्या लोकांची रामाचे नाव घेण्याची पात्रता नाही, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली.

**कृषिमंत्र्यांच्या विधानाचाही घेतला समाचार**

उद्धव ठाकरे यांनी यावेळी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या शेतकरी कर्जमाफीवर केलेल्या विधानाचाही समाचार घेतला. कोकाटेंवरच मुळात फसवणुकीचा आरोप आहे. कोर्टाकडून आश्चर्यकारक निकाल लागल्यामुळे त्यांचे मंत्रिपद आणि आमदारकी वाचलेली आहे. ज्यांच्यावर फसवणुकीचा आरोपच आहे किंवा गुन्हा सिद्ध झालेला आहे. गुन्हा सिद्ध होऊन शिक्षा न झालेली ही कदाचित पहिली व्यक्ती असेल, असा टोला उद्धव ठाकरे यांनी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना लगावला.

**वक्फची जमीन मित्रांना द्यायची, हा भाजपचा हेतू**

भाजपला कोणत्याही समाजाविषयी प्रेम नाही. त्यांचे लक्ष केवळ जमिनी आणि व्यापार करणारी भाजप आहे. त्यांचे पूर्ण लक्ष आपल्या मित्रांवर आहे. वक्फ बोर्डाकडे जितक्या जमिनी आहेत, त्या आपल्या मित्रांना देण्याचा भाजपचा हेतू आहे. उद्या उठून हे लोक जैन, शिख आणि हिंदूंच्या जमिनी घेण्याची पुढची पायरी आहे. यातील मोकाच्या जमिनी आपल्या मित्रांना देणार आहेत. यामुळेच आम्ही वक्फ बोर्डाच्या विधेयकाला विरोध दर्शवला. या बिलाचा हिंदुंशी काही संबंध नाही, अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी वक्फ सुधारणा विधेयकावरून भाजपवर निशाणा साधला.

**भाजप देशभरात धर्मांमध्ये विष कालवतंय**

भाजप लोकांना तणावग्रस्त आयुष्य जगायला लावत आहे. देशभरात धर्मांमध्ये द्वेष कालवत असल्याचा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला. हिंदूमध्ये मराठी -अमराठी करत आहेत. मराठीमध्ये मराठा-मराठीकरत आहेत, असेही उद्धव ठाकरे म्हणाले.

## शासकीय नोकरीच्या अमिषाने फसवणूक

**पुणे :** महसूल, पोलीस आणि वनविभागात नोकरीच्या आमिषाने फसवणूक करुन लाखो रुपये उकळणाऱ्या एकाला गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. आरोपीने महसूल सचिव असल्याची बतावणी केली होती. आरोपीला बनावट नियुक्तीपत्रे देण्यासाठी पुण्यातील महसूल कार्यालयातील लिपिक सामील असल्याचे उघडकीस आल्यानंतर पोलिसांनी त्याला अटक केली. महादेव बाबुराव दराडे (वय ३२, सध्या रा. वाकड, मूळ. रा. धाराशिव) आणि रणजित लक्ष्मण चौरे (वय ३५, सध्या रा. धायरी. मूळ. रा. बीड) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.




राम नवमीनिमीत्य नागपुर शहरात विविध ठिकाणी शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले त्यानिमित्ताने सिंधीखाना गणेश पेठ नागपुर येथे साकारण्यात आलेली प्रतिकृती सर्वाचे लक्ष वेधून घेत होती.



राम नवमीनिमीत्य नागपुर शहरात विविध ठिकाणी शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले

# रामनवमीनिमित्त प्रसाद वाटप




## उन्नती फाउंडेशन आणि सुरुची मसाला परिवारातर्फे न्यू इतवारी रोडवरील सर्व भगवान रामभक्तांना प्रसाद वाटप करण्यात आला

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि.६ : उन्नती फाउंडेशन आणि सुरुची मसाला परिवारातर्फे न्यू इतवारी रोडवरील सर्व भगवान रामभक्तांना प्रसाद वाटप करण्यात आला. भगवान रामजींच्या तैलचित्राला हार अर्पण करून पूजा करण्यात आली. सुरुची मसाला परिवारचे संचालक रवी भंडारी, मयंक भंडारी, प्रकाश कटारिया आणि उन्नती फाउंडेशनचे प्रमुख अतुल कोटेचा यांच्या हस्ते प्रसाद वाटप कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी अतुल कोटेचा म्हणाले की, दरवर्षीप्रमाणे या वर्षीही सर्व भाविकांना प्रसाद वाटप करण्याची परंपरा कायम ठेवत, सुरुची मसाला परिवाराने भाविकांना मसाला भात आणि सुरुची भेटवस्तूंचे सुरळीत वाटप केले. यावेळी श्री.राजू कटारिया, नरेंद्र कासवा, प्रवीण नेरळ, अनिल किनकर, विपीन तिसमळकर यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.









सावनेर: रामनवमी निमित्य आमदार डॉ.आशिष देशमुख यांनी आयाचित राम मंदीर रोड सावनेर येथे घेतले रामाचे दर्शन



## क्रिकेट सामन्याची खायवाडी करताना पकडले

**नागपूर, क्राईम रिपोर्टर.** गुन्हे शाखा युनिट ४ च्या पथकाने कारमध्ये क्रिकेट सट्ट्याची खायवाडी करताना एकाला अटक केली. प्रमोद दयाराम मरोडकर (४३) रा. विश्वकर्मानगर असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी त्यांच्याकडून ३ मोबाइल, रोख ९६८० रुपये आणि अन्य साहित्यांसह ६,२१,८७९ रुपयांचा माल जप्त केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी रात्री १०.४० च्या सुमारास, मंगलमूर्ती चौकात एक व्यक्ती एमएच-४९/एएस-५७७क्रमांकाच्या कारमध्ये काही इसम आयपीएलच्या कोलकाता आणि हैदराबाद यांच्यातील सामन्यावर लागवडी-खायवाडीकरीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी तेथे धाड टाकली असता वरील आरोपी मोबाईल फोनद्वारे ग्राहकांकडून क्रिकेट सामन्यावर सट्ट्याची खायवाडी करताना सापडला. चौकशीत त्याने पैशाची खायवाडी करून साथीदार राकेश याच्याकडे लगवाडी करीत असल्याची माहिती दिली. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेऊन कार, तीन मोबाईल, रोख ९६८० रुपये आणि सट्ट्याशी संबंधित साहित्य जप्त केले. पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध नंदनवन ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून राकेशचा शोध सुरू केला आहे.

## टिप्परच्या धडकेत कारचा चुराडा

### कारचालक जागीच ठार, ४ जण जखमी, गोरेवाड्यात भीषण अपघात

**नागपूर, क्राईम रिपोर्टर.** भरधाव आणि निष्काळजीपणे वाहन चालवीत एका टिप्परचालकाने कारला मागून जबर धडक दिली. ही धडक इतकी जबरदस्त होती की, कारचा चुराडा होऊन वृद्ध चालकाचा जागीच मृत्यू झाला. त्यानंतर अनियंत्रित टिप्पर रस्त्याच्या कडेला असलेल्या पानटपरीत घुसला. यात टपरीचालक आणि तीन ग्राहक गंभीर जखमी झाले. अपघाताची ही भीषण घटना गोरेवाडा मार्गावरील पलोटी शाळेजवळ रविवारी सकाळच्या सुमारास घडला. झऊर हसन (७७) रा. छावणी असे मृत कारचालकाचे नाव आहे. जखमी राजकुमार दुबे (३५) रा. पलोटीनगर आणि सचिन यादव (३८) रा. स्वागतनगर यांच्यावर त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर दोनजण किरकोळ जखमी आहेत. या प्रकरणी गिट्टीखदान पोलिसांनी आरोपी टिप्पर चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवून त्याला अटक केली आहे. अविनाश भोयर (२९) रा. कन्हान असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

टिप्परचालक अविनाश हा रविवारी सकाळी रामटेकहून निघाला. वाळू भरलेला ट्रक घेऊन तो गोरेवाडा मार्गाने जात होता. या मार्गावर तशीही फारशी वर्दळ नसते. त्यामुळे अविनाश भरधाव वेगाने टिप्पर चालवीत जात होता. मृतक हसन यांचे गड्डीगोदाम येथे हसन या नावाने गॅरेज आहे. ते सकाळी १०.३० वाजताच्या सुमारास कारने गोरेवाडाकडे कामानिमित्त जात होते. दरम्यान पलोटी शाळेजवळून जात असताना अचानक भरधाव वेगाने आलेल्या टिप्परचालकाने त्यांच्या कारला मागून जबर धडक दिली. त्यानंतर टिप्पर अनियंत्रित होऊन कारसह जवळच असलेल्या राजकुमार दुबे यांच्या पानटपरीत घुसला. यावेळी पानटपरीवर सचिन व इतर दोन ग्राहक उभे होते. काही समजण्यापूर्वीच टिप्परने त्यांनाही धडक दिली. यात राजकुमार, सचिन हे गंभीर जखमी झाले. तर इतर दोन ग्राहकही किरकोळ जखमी झाले. टिप्परच्या समोरील भागामध्ये कार फसल्याने कारचालक गंभीर जखमी झाले. रक्तबंबाळ होऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला होता. माहिती मिळताच गिट्टीखदान ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक कैलाश देशमाने पथकासह घटनास्थळी पोहोचले. तत्पूर्वी जवळपासच्या लोकांनी जखमींना दिलासा दिला. पोलिसांनी चारही जखमींना रुग्णालयात नेले. या अपघातानंतर घटनास्थळावर एकच गर्दी झाली. पोलिसांनी क्रेनचा वापर करून कार रस्त्याच्या बाजूला केली. बराच वेळपर्यंत नागरिकांची गर्दी कायम होती.

# रामनवमीसाठी पोलिस सज्ज

**५ हजार पोलिस बंदोबस्तात तैनात, मिरवणुकीवर ड्रोनने वॉच**

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि.६ : रामनवमीला शहरात कुठल्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांनी कंबर कसली आहे. मिरवणूक मार्ग आणि शहरातील संवेदनशील भागांत तगडा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. ४ हजार पोलिस कर्मचाऱ्यांसह १५०० होमगार्ड कोणत्याही परिस्थितीशी निपटण्यासाठी तयार आहेत. संशयास्पद हालचालींवर नजर ठेवण्यासाठी गुप्तचर यंत्रणा सक्रिय करण्यात आली आहे. तसेच एटीएस व इतर सुरक्षा यंत्रणादेखील तैनात राहणार आहेत. नुकत्याच झालेल्या हिंसाचारानंतर परिस्थिती अधिक संवेदनशील असल्याने पोलिसांकडून सातत्याने गस्त घालून संभाव्य धोक्यांवर लक्ष ठेवले जात आहे. कोणतीही अफवा पसरू नये आणि कुठेही तणाव निर्माण होऊ नये यासाठी विशेष खबरदारी घेतली जात आहे. संवेदनशील भागांमध्ये शस्त्रधारी पोलिस तैनात असून, दंगल नियंत्रण पथकाच्या पाच तुकड्या देखील तयार ठेवण्यात आल्या आहेत.

धार्मिक स्थळांभोवती सुरक्षा वाढवून फिक्स पॉइंट लावण्यात आले आहेत. सर्व ठाणेदारांना त्यांच्या हद्दीतील गस्त वाढविण्याचे आणि २४ तास प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. याशिवाय, सायबर पोलिसांची विशेष टीम सोशल मीडियावर नजर ठेवून आहे. पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांनी सांगितले की, दरवर्षीप्रमाणे या वर्षीही मोठ्या उत्साहात रामनवमी साजरी होणार आहे.

त्यासाठी आमची तयारी झाली आहे. शोभायात्रेच्या मार्गाला वेगवेगळ्या सेक्टरमध्ये विभागण्यात आले असून, प्रत्येक सेक्टरची जबाबदारी डीसीपी स्तरावरील अधिकाऱ्यांकडे देण्यात आली आहे. काही संवेदनशील भागांमध्ये विशेष काळजी घेतली जात आहे. ड्रोनच्या मदतीने पोलिसांचे सर्विलांस वाहनदेखील या मार्गावर लक्ष ठेवणार आहेत. त्यांनी नागरिकांना शोभायात्रेदरम्यान कोणतीही संशयास्पद व्यक्ती किंवा कृती आढळल्यास तत्काळ पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन केले आहे.

### वाहतूक व्यवस्थेत बदल

शोभायात्रा मार्गावरील वाहतूक व्यवस्थेतही बदल करण्यात आला आहे. महाल गांधी गेट, टिळक पुतळा, गणेश मंदिर वळण, आग्याराम देवी चौक, गीता मंदिर, कॉटन मार्केट चौक, लोखंडी पूल, आनंद टॉकीज, मुंजे चौक, झाशी राणी चौक, हेरिटेज चौक, बर्डी मेन रोड, मानस चौक, जयस्तंभ चौक आणि राम मंदिरपर्यंतचा संपूर्ण मार्ग सकाळी ६ वाजल्यापासून शोभायात्रा संपेपर्यंत वाहतुकीसाठी बंद राहणार आहे. या संपूर्ण मार्गावर नो पार्किंग झोन जाहीर करण्यात आला आहे.

## लोणारे बंधूंच्या जुगार अड्ड्यावर धाड

### १५ जुगाऱ्यांना रंगेहात अटक

**नागपूर, क्राईम रिपोर्टर.** परिमंडळ क्र. ४च्या पोलिस उपायुक्त रश्मिता राव यांच्या पथकाने गोपनिय माहितीच्या आधारावर अजनी पोलिस ठाण्यांतर्गत सुरू असलेल्या लोणारे बंधूंच्या जुगार अड्ड्यावर धाड टाकली. यावेळी लोणारे बंधूंसह १५ जुगाऱ्यांना रंगेहात अटक करण्यात आली. पोलिसांनी आरोपींकडून डावावर लावलेले ६,५८० रुपये आणि दुचाकी वाहनांसह एकूण ३ लाख ३ हजार ५८० रुपयांचा माल जप्त केला आहे. अटकेतील आरोपींमध्ये रितेश लोणारे (३७) आणि रोशन लोणारे (४२) रा. जयभीमनगर, गल्ली क्र. २ यांच्यासह विकास भिसे (४६) रा. विश्वकर्मानगर, दशरथ खडसे (५८) रा. शताब्दीनगर, नितीन गोथपगार (४३) रा. रामेश्वरी चौक, टागोर सिंग (५२), नितीन दगडे (३९) दोन्ही रा. सेमिनरी हिल्स, प्रकाश जोशी (५६) रा. अजनी रेल्वे कॉलनी, श्याम भोवते (४८), विशाल गलोट (३६) दोन्ही रा. चंदननगर, रंजित खांडेकर (४१) रा. जयभीमनगर, पंचमसिंह चंदेल (५१) रा. पार्वतीनगर, प्रफुल पाटील (३२) रा. जयभीमनगर, नितीन टागभवरे (४२) रा. न्यू ज्ञानेश्वरनगर आणि सुधाकर वंजारी (५३) रा. आदर्शनगर अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. विशेष म्हणजे रितेश लोणारे गत अनेक वर्षांपासून घरीच पहिल्या माळ्यावर जुगार अड्डा चालवत होता, मात्र अजनी पोलिसांना माहिती असूनही कधी कारवाई केली नाही. यावरून अजनी पोलिसांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहेत. लोणारे बंधू गत अनेक वर्षांपासून आपल्या घरी वरच्या माळ्यावर जुगार अड्डा चालवत असल्याची माहिती झोन ४ च्या पोलिस उपायुक्त रश्मिता राव यांना मिळाली होती. त्यांनी आपल्या पथकाला कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार शुक्रवारी सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास लोणारे बंधूंच्या जुगार अड्ड्यावर धाड टाकण्यात आली. यावेळी वरील आरोपी ताश पत्त्यावर कॉइन्सच्या माध्यमातून पैशांची बाजी लावून जुगार खेळताना मिळाले.

## तरुणीचा विनयभंग, वडिलांना मारहाण

**नागपूर, क्राईम रिपोर्टर.** प्रेयसीने दुरावा करीत बोलचाल बंद केल्याच्या रागातून एक गुंड रात्रीच्या वेळी मद्यधुंद अवस्थेत तिच्या घरी गेला. शिविगाळ करीत दारावर जोर-जोरात्नाथा मारू लागला. वडील बाहेर आले असता त्यांना मारहाण केली. पीडितेशीही गैरवर्तन करीत तिचा विनयभंग केला. ही घटना नंदनवन पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी २२ वर्षीय पीडितेच्या तक्रारीवरून आरोपी तरुण रुपेश प्रकाश ठोंबरे (२५) याला अटक केली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रुपेश हा पोलिस अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे. तो नशेच्याही आहारी गेला आहे. पीडित तरुणीचे बी.कॉमपर्यंतचे शिक्षण झाले असून ती मिहान येथील एका कंपनीत काम करते. एकाच परिसरात राहात असल्याने आधी दोघांमध्ये मैत्री होती. रुपेशने तिला प्रेमाच्या जाळ्यात अडकवले. दरम्यान रुपेश गुन्हेगारी प्रवृत्तीचा आणि व्यसनी असल्याचे समजताच पीडितेने त्याच्यापासून दुरावा करीत बोलचाल बंद केली. त्यामुळे आरोपी वारंवार तिच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न करीत होता. वेगवेगळ्या नंबरवरून फोन करून तिला त्रास देत होता. दरम्यान पीडिता नोकरीसाठी बंगळुरूला गेली. काही दिवसांपूर्वीच मिहानमध्ये नोकरी मिळाल्याने ती नागपूरला परतली. याबाबत समजताच रुपेशने पुन्हा तिला त्रास देण्यास सुरुवात केली. कामावर जाता-येतानाो तिचा पाठलाग करीत होता. बोलण्यासाठी दबाव टाकत होता. मात्र पीडिता त्याच्याकडे दुर्लक्ष करीत होती. गुरूवारी रात्री १०.३० वाजताच्या सुमारास तो मद्यधुंद अवस्थेत पीडितेच्या घरी गेला. घराचे दार आतून बंद होते. त्यामुळे घरापुढे उभा राहून शिविगाळ करू लागला. त्यानंतरही दार उघडत नसल्याने तो दारावर जोर-जोरात्नाथा मारू लागला. पीडितेच्या वडिलांनी बाहेर येऊन त्याला समजवण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याने त्यांना शिविगाळ करीत मारहाण सुरू केली. पीडिता वडिलांना सोडविण्यासाठी आली असता पीडितेशी अश्लील वर्तन करून विनयभंग केला.



## मोरया फाउंडेशन तर्फे पक्षांसाठी जल पात्राचे वितरण




**नागपूर :** मोरया फाउंडेशन तर्फे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही देखील पक्षांसाठी जलपात्र वितरणाचा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाचा शुभारंभ एपीआय चंदा दंडवते हुडकेश्वर ठाणा यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मोठ्या संखेने महिला उपस्थित होत्या. मोरया फाउंडेशनच्या संस्थापिका यांनी अलीकडे महिलांची ऑनलाइन द्वारे होणारी फसवणूक कशी टाळता येईल. यासाठी मार्गदर्शन करावे. असे आवाहन करण्यात आले त्यांवर एपीआय चंदा दंडवते यांनी महिलांनी कोणत्याही ऑनलाइन फसवणूक टाळण्यासाठी दिलेल्या आमिषाला बळी पडू नये तसेच फसवणूक होत असल्याचे निदर्शनास आले तर लगेच नेट बंद करावे व या संदर्भात सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करावी. असे निर्देश देण्यात आले. यावेळी चंदा दंडवते यांच्या हस्ते ना पंचवटी हनुमान मंदिर परिसरातील सर्वांना जलपात्र वितरीत करण्यात आले. उन्हाळ्यात पक्षांना पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्येकाणे प्रयत्न करावेत. असे आवाहन मोरया फाउंडेशनचे अध्यक्ष अविनाश चौहाण यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन रजनी चौहाण यांनी केले तर आभार प्रदर्शन सौ.निशिगंधा रामटेके यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीपणे माधूरी इत्तेडवार, सुवर्णा रहाटे, नरेंद्र रेवतकर, वसंत साठवणे, रेश्मा सहारे इत्यादींचे सहकार्य लाभले.

# वक्फ बोर्डाचा बुरखा गळाला!

राष्ट्रनामा



सुकृत खांडेकर
०९५९४२२४०००
sukritforyou@gmail.com




वक्फ सुधारणा विधेयक हे संसदेच्या दोन्ही सभागृहांत बहुमताने मंजूर झाले आणि वर्षानुवर्षे वक्फ व्यवस्थापनाच्या चालू असलेल्या मनमानी व भ्रष्ट कारभाराला लगाम घालण्याचा मार्ग मोकळा झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे देशाचे नेतृत्व असल्यामुळेच हे शक्य झाले. वक्फ सुधारणा विधेयक हे मोदी सरकारच्या तिसऱ्या कारकिर्दीतील आजवरचे सर्वात मोठे यश म्हणावे लागेल. लोकसभेत २८८ विरुद्ध २३२ आणि राज्यसभेत १२८ विरुद्ध ९५ अशा मतांनी वक्फ सुधारणा विधेयक मंजूर झाले. दोन्ही सभागृहांत बारा-बारा तासांहून अधिक काळ धारदार चर्चा व गरमा गरम वादविवाद झाले. दोन्ही सभागृहांत मध्यरात्री अडिचनंतर या विधेयकावर मतदान झाले. नरेंद्र मोदी देशाच्या सर्वोच्च पदावर आल्यापासून देशाचा नूर तर बदलला आहेच पण देशाचा चेहरा-मोहराही वेगाने बदलत आहे. सर्व जाती-धर्मातील लोकांना एक विश्वासक नेतृत्व लाभले आहे. मोदी सरकारने अयोध्येत भव्य राम मंदिर उभारले, जम्मू-काश्मीरला घटनेतील ३७० व्या कलमाद्वारे मिळालेला विशेषाधिकार रद्द केला व तेथील जनतेला देशाच्या मुख्य प्रवाहात आणले, सीसीए आणून घुसखोरांना लगाम घालण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलले, तिहेरी तलाक रद्द करून देशातील लक्षावधी मुस्लीम महिलांना मोठा दिलासा व विश्वास दिला, लोकसभा व विधानसभांमध्ये तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारा कायदा करून महिलांना सन्मान दिला, प्रयागराजला महाकुंभमध्ये ६५ कोटी भाविकांनी गंगेत पवित्र स्नान करून जागतिक विक्रम निर्माण केला आणि आता देशातील तिसऱ्या क्रमांकाचा जमीन मालक असलेल्या वक्फ बोर्डाच्या कारभारात पारदर्शकता आणण्यासाठी वक्फ सुधारणा विधेयकावर संसदेची बहुमताची मोहर उठविण्यात मोदी सरकारने बाजी मारली. मोदी है तो मुमकीन है, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले.

वक्फ म्हणजे मुस्लिमांनी आपल्या संपत्तीचा काही वाटा लोककल्याणासाठी दान करणे. वर्षानुवर्षे वक्फ बोर्डाची संपत्ती आणि मालमत्ता कोटी कोटीने वाढत आहे आणि देशातील सामान्य मुस्लीम मात्र गरीबच राहतो आहे. एकीकडे वक्फ बोर्ड गर्भश्रीमंत होत आहे आणि दुसरीकडे त्यांच्याच जमिनीच्या झालेल्या गैरव्यवहारातून उत्तुंग इमारती आणि पंचतारांकित हॉटेल्स देशात उभी राहिलेली दिसत आहेत. वक्फ बोर्डाच्या मालमत्तेत सतत होणारी वाढ खूप गूढ आहे. देशातील अनेक सरकारी व निमसरकारी जमिनींवर वक्फ बोर्डाने कब्जा केला आहे. अनेक मंदिरे व हिंदूंच्या मालमत्तांवर वक्फ बोर्डाने आपला हक्क दाखवला आहे. एवढेच काय पण आग्र्यातील ताजमहाल व दिल्लीतील संसद भवनावरही वक्फ बोर्डाने ही जागा आमचीच आहे असा दावाही केला आहे. हिमाचल प्रदेशात वक्फने तेथील शेकडो एकर जमिनीवर दावा केला व तेथे मशीद उभी राहिली आहे. उत्तर रेल्वेची जमीन वक्फने दावा करून बळकावली आहे. महाराष्ट्रात बीड व कोल्हापूर जिल्ह्यात मंदिरांची जमीन वक्फच्या ताब्यात आहे. वक्फच्या मालमत्तेवर दिवाणी कोर्टात दावा करता येत नाही. केंद्रात व राज्यात वर्षानुवर्षे सत्तेवर असलेल्या काँग्रेस पक्षाने नेहमीच वक्फ बोर्डाला झुकते माप दिले, एवढेच नव्हे तर २०१४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी केंद्रातील यूपीए सरकारने वक्फ बोर्डाला १२३ मालमत्ता देऊन टाकण्याचाही पराक्रम केला. मेरी मर्जी, अशा मनमानी भूमिकेतून वक्फ बोर्डाचा देशात कारभार चालू होता. काँग्रेस, सपा, तृणमूल काँग्रेस, द्रमुक, एआयएमआयएम आदींचा विरोध झुगारून मोदी सरकारने वक्फ सुधारणा विधेयक संमत करून दाखवले आहे.

वक्फ बोर्डाच्या मालकीची जमीन व मालमत्ता दोन लाख कोटींहून अधिक असताना सामान्य मुस्लीम गरिबीत का जगतो आहे? मुस्लिमांच्या मुलांना चांगले शिक्षण का मिळत नाही? मुस्लिमांना चांगले प्रशिक्षण व उत्तम रोजगार का नाही? प्रत्येक राज्यात वक्फ बोर्ड आहे पण त्याला आपल्या समाजाकडे लक्ष द्यायला वेळ नाही.

वक्फ सुधारणा विधेयक म्हणजे देशातील मुस्लिमांचा अवमान आहे, त्यांना दुय्यम नागरिकत्व देण्याचा प्रकार आहे असा आरोप करून असदुद्दीन ओवेसी यांनी विधेयकाची प्रत लोकसभेत फाडली. म. गांधींचे नाव घेऊन त्यांनी सरकारचा निषेध केला. पण ओवेसींना इतक्या वर्षात वक्फ बोर्डातील भ्रष्टाचार व मनमानी कारभार कधी दिसला नाही का? मुस्लीम समाजात फूट पाडण्यासाठी सरकारने खेळी खेळली आहे, असा आरोप सपाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी केला. १९९५ व २०१३ मध्ये वक्फ सुधारणा विधेयक संसदेत आणले होते तेव्हा भाजपाचे लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी, सिकंदर बख्त, सुषमा स्वराज, अरुण जेटली, मुख्तार अब्बास नकवी यांनी त्याला पाठिंबा दिला होता. मग भाजपाचे हे सर्व दिग्गज तेव्हा चुकीचे वागले असे मोदी सरकारला म्हणायचे आहे का, असा प्रश्न विरोधी पक्षांनी संसदेत विचारला. जर वक्फ कायदा वाईट असता तर या सर्व भाजपा दिग्गजांनी त्यावेळी त्याचे समर्थन का केले? एवढा वाईट कायदा बदलण्यासाठी मोदी सरकारला ११ वर्षे का वाट पाहावी लागली? अशीही विचारणा विरोधी पक्षांनी केली.

उत्तर प्रदेशात वक्फ बोर्डाची जमीन २ लाख ३२ हजार ४४७ एकर आहे, पंजाबमध्ये ७५,९६५, पश्चिम बंगालमध्ये ८०,४८०, केरळ ४३,२८२, गुजरात ८९,९४०, तामिळनाडू ६६,०९२, तेलंगणात ४५,६८२, कर्नाटकात ६२,८३० एकर जमीन आहे. महाराष्ट्रात वक्फ बोर्डाकडे ९३ हजार एकर जमीन असावी पण त्यातील ६० टक्के क्षेत्रावर अतिक्रमण आहे असे सांगितले जाते. वाढता वाढता वाढे अशी वक्फ बोर्डाची मालमत्ता दरवर्षी वाढते आहे. पण त्यावर कोणाचे नियंत्रण नाही, उत्तरदायित्व नाही. खासगी खरेदी-विक्री व्यवहारावर कोणाची देखरेख नाही. मग केंद्र सरकारने वक्फ बोर्डाच्या कारभारात, कायद्यात सुधारणा करून शिस्त आणि पारदर्शकता आणली तर त्याविरोधात थयथयाट कशासाठी?

वक्फ सुधारणा विधेयकाला विरोधी पक्षांनी सर्व काही पणाला लावून विरोध केला. सरकारला कोणाच्याही धार्मिक भावना दुखवायच्या नाहीत, गरीब मुस्लिमांना न्याय मिळावा हे सुधारणा विधेयकामागे उद्दिष्ट आहे असे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजिजू यांनी वारंवार स्पष्ट केले. वक्फमध्ये गैर मुस्लिमांना परवानगी दिली जाणार नाही, असेही सांगितले. वक्फ मालमत्ता हा धार्मिक विषय नाही. त्यामुळे हिंदू मंदिरांची तुलना वक्फ बोर्डाशी करणे योग्य नाही. प्रशासकीय व्यवस्थेमध्ये पारदर्शकता असावी हा या विधेयकाचा हेतू आहे. यापुढे वक्फ कारभारात नोंदणी, लेखा, लेखा परीक्षण करावे लागेल. सरकारी मालमत्ता परत करावी लागेल. डिजिटल नोंदी कराव्या लागतील. यापुढे शिया सुन्नी बोहरा सर्व वक्फ बोर्डात असतील असे रिजिजू यांनी स्पष्ट केले.

भाजपाचे धर्मनिरपेक्ष मित्र असलेल्या नितीश कुमार यांच्या जनता दल (युनाटेड), चंद्राबाबू नायडू यांच्या तेलुगू देशम, चिराग पासवान यांचा लोकजनशक्ती व माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांच्या जनता दल (सेक्युलर) यांनी वक्फ सुधारणा विधेयकाला पाठिंबा दिला.

गेल्या वर्षी वक्फ सुधारणा विधेयक संसदेच्या संयुक्त चिकित्सा समिती (जेपीसी)कडे पाठवले होते. जगदंबिका पाल यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीत दोन्ही सदनाचे सर्वपक्षीय ३१ सदस्य होते. या समितीच्या ३६ बैठका झाल्या. समितीत २०० तासांहून अधिक काळ चर्चा झाली. जगदंबिका पाल हे संपूर्ण समितीसह देशात १० ठिकाणी गेले. २८४ भागधारकांनी समितीपुढे आपली भूमिका मांडली. देशातून विधेयकावर एक कोटी सूचना आल्या होत्या. त्यांचा अभ्यास करून समितीने अहवाल सादर केला.

आग्र्याच्या ताजमहालवर वक्फ बोर्डाने दावा केला तेव्हा सर्वोच्च न्यायालयाने शहांजहांच्या काळातला आदेश घेऊन या असे वक्फला सांगितले, अशीही आठवण यानिमित्ताने पुढे आली. गुजरातमध्ये दंगली झाल्या तेव्हा अमित शहा तेथे गृहमंत्री होते असा आरोप काँग्रेसचे दिग्विजय सिंग यांनी केला तेव्हा राज्यसभेत उपस्थित असलेले शहा म्हणाले, दंगलीच्या काळात मी गृहमंत्री नव्हतो. दंगल शांत झाल्यावर अठरा महिन्यांनी मी गृहमंत्री झालो.

वक्फ बोर्ड कोणतीही जागा आपली कशी म्हणू शकते? भारतात काही कायदा, नियम आहेत ना? जर आम्ही रेल्वे गाडीत किंवा विमानात नमाज पढला तर ती ट्रेन किंवा विमान आमचे होते काय? असा प्रश्न एका मुस्लीम खासदारानेच विचारला.

सन २००६ मध्ये सच्चर समितीचा अहवाल आला. त्यात म्हटले होते की, वक्फ बोर्डाचा कारभार डिजिटल झाला पाहिजे. वक्फकडे ४ लाख ९० हजार मालमत्ता आहेत व उत्पन्न १६३ कोटी आहे. जर उत्तम व्यवस्थापन केले तर बारा हजार कोटी उत्पन्न मिळू शकेल. आता वक्फ बोर्डाकडे ८ लाख ७२ हजार मालमत्ता आहेत. सच्चर समितीच्या निकषानुसार उत्तम व्यवस्थापन असेल तर किती उत्पन्न मिळू शकेल, मार्केट रेट मोजा असा सल्लाही चर्चेत एका ज्येष्ठ सदस्याने दिला.

केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी म्हटले -

नरेंद्र मोदी है, मुसलमानों के सच्चे वाली
खरगेसाहब बजावं जोरदार टाली,
मत दे दो मोदी जी को गाली,
नहीं तो खुर्सी करो खाली
विरोधी दलों की रात हो गयी काली
नड्डासाहब तुम बजावं टाली... (हंशाच हंशा)

# उन्हाळ्यात मुलांना घरगुती पेय द्या !

सध्या सर्वत्र उन्हाचा जोर वाढतो आहे. मागील काही वर्षांच्या तुलनेत यंदा अधिक उकाडा सहन करावा लागणार असल्याचा अंदाज हवामान खात्यानेही वर्तवला आहे. राज्यात काही ठिकाणी मुलांच्या परीक्षा संपून शाळांना सुट्टी पडली आहे. अभ्यासाचा ताण नसल्याने मुले दिवसभरातील अधिकाधिक वेळ खेळण्यात व्यतीत करत आहेत. बाहेर खेळायला जाणाऱ्या मुलांना उन्हातान्हाची पर्वा नसते. अधिक वेळ उन्हात राहिल्याने घामावाटे शरीरातील पाणी आणि क्षार निघून जातात ज्यामुळे थकवा येतो. अशावेळी मुले घरी येऊन पालकांकडे कोल्ड्रिंक्स पिण्यासाठी पैसे मागतात. बऱ्याचदा पालकही त्यांना पैसे देऊन त्यांची इच्छा पूर्ण करतात. सध्या बाजारात मिळणारे अनेक प्रसिद्ध ब्रँड्सचे कोल्ड्रिंक्स लहान मुलांसाठी अपायकारक आहेत. अशा कोल्ड्रिंक्सच्या बाटल्यांवर ठळक अक्षरांत तशी सूचना लिहिणेही बंधनकारक करण्यात आले आहे. ही कोल्ड्रिंक्स जिभेला रुचकर वाटून मनाला गारवा देणारी असली तरी ती बनवण्यासाठी रसायनांचा आणि प्रीझर्वेटिव्हचा वापर करण्यात येत असल्याने लहान मुलांच्या नाजूक शरीरासाठी ती अत्यंत हानिकारक असतात. आहारतज्ज्ञांच्या मते कोल्डड्रिंक्समध्ये जास्त प्रमाणात साखर असते. साखर जास्त प्रमाणात पोटात गेल्याने मुलांमध्ये लठ्ठपणा वाढू शकतो. मुले जास्त प्रमाणात कोल्ड्रिंक्स पित असतील तर त्यांच्या शरीरातील कॅलरीज वाढल्याने त्यांचे अनावश्यक वजन वाढू शकते.




सौ. मोक्षदा घाणेकर,
काळाचौकी, मुंबई

कोल्ड्रिंक्समध्ये असणाऱ्या साखर आणि अन्य रासायनिक घटकाकांमुळे मुलांचे दात किडण्याचा धोका संभवतो. थंड आणि रसायनयुक्त असलेले हे कोल्ड्रिंक्स दातांच्या मुळांना कमकुवत करतात. मुलांच्या शरीरातील साखरेचे प्रमाण वाढल्याने मुलांमध्ये टाइप २ डायबिटीसचा धोका वाढू शकतो. काही थंड पेयांमधील रसायनांच्या अतिवापरामुळे मुलांच्या हाडांतील खनिजांचे प्रमाण कमी होऊन हाडे कमकुवत होतात ज्यामुळे मुलांमध्ये हाडांच्या दुखापतीचा आणि फ्रॅक्चरचा धोका वाढतो. १०० टक्के फळांचा रस असण्याचा दावा करणारे काही कंपन्यांचे फ्रुट ज्यूसचे टेट्रा पॅक बाजारांत उपलब्ध आहेत; मात्र त्यामध्ये प्रत्यक्षात फळांचा रस किती आणि इतर रसायने किती आहेत हे पॅकेटवरील घटकांचे प्रमाण वाचल्यावरच लक्षात येते. त्यामुळे उन्हाळ्याच्या दिवसांत असे तयार कोल्ड्रिंक्स मुलांना देऊन त्यांच्या आरोग्याशी खेळण्याऐवजी घरी तयार केलेले कोकम सरबत, लिंबू सरबत, ताक किंवा बाजारातून ताजी फळे आणून मुलांना फळांचा रस द्यावा. घरगुती पेय प्यायल्याने उन्हामुळे मुलांच्या शरीरात निर्माण होणारी पाण्याची कमतरता तर भरून निघेलच शिवाय मुलांना व्हिटॅमीन्स आणि मिनरल्ससुद्धा या पेयांतून मिळेल. केवळ मुलांसाठीच नव्हे तर मोठ्यांनीही उन्हाळ्यात रासायनिक शीतपेय पिण्याऐवजी घरगुती पेय पिऊन आपली रोगप्रतिकारक शक्ती आणि आरोग्य जपावे !

# शास्त्रज्ञ डॉ शंकर आबाजी भिसे 'भारतरत्न'च्या तोडीचे

स्वातंत्र्यपूर्व काळातील थोर भारतीय संशोधक डॉ शंकर आबाजी भिसे यांची आज पुण्यतिथी. त्यांचा जन्म २९ एप्रिल १८६७ रोजी मुंबईत झाला. भारताचे एडिसन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डॉ शंकर आबाजी भिसे या महान शास्त्रज्ञाचा जन्म मुंबईमध्ये एका मॅजिस्ट्रेटच्या घरी झाला. दोनशेच्यावर निरनिराळे शोध लावणारे आणि चाळीसहून अधिक शोधांचे एकस्व संपादन करणाऱ्या डॉ शंकर आबाजी भिसे यांची आज पुण्यतिथी असल्याने त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे तरीही त्यांचा विसर पडणाऱ्यांचीच संख्या यंदाही अधिक असेल. ज्या काळात भारतीय नागरिकांना कमी लेखले जात होते त्याकाळात डॉ भिसे यांनी संशोधनक्षेत्रात अजोड कार्य केले. लहानपणी एकदा भिसे साखर आणायला वाण्याकडे गेले. त्यावेळी वाण्यानी लबाडी करून कमी वजनाची साखर दिल्याचं त्यांच्या लक्षात आलं. याबाबत त्यांनी व्यापाऱ्याला विचारलं असता माझ्या काट्यावर विश्वास नसेल तर आपोआप वजन करणारं यंत्र शोधून काढ. असं वाण्याने त्यांना खोचकपणे म्हटलं. त्यावेळी एक दिवस तुला असे यंत्र देईन अस छोटा शंकर त्यांना आत्मविश्वासाने म्हणाला. लहानपणापासून संशोधनाची आवड असणाऱ्या डॉ भिसे यांनी वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी दगडी कोळशापासून गॅस शुद्ध करण्याचे यंत्र बनवले. १८९७ मध्ये इन्व्हेंटर रिव्हीव अँड सायंटिफिक रेकॉर्ड या मासिकाने स्वयंमापन यंत्र करण्याची एक स्पर्धा जाहीर केली. स्वयंमापन यंत्र म्हणजे साखर, पीठ इत्यादी वस्तूंचे गिर्हाईकाला हवं तेवढं वजन करुन देणारं यंत्र. डॉ भिसे यांनी अशा यंत्राचा आराखडा तयार करून पाठवला. त्यांनी तयार केलेल्या वजन मापन यंत्राच्या आराखड्याला इंग्लंडमध्ये पहिले बक्षीस मिळाले. या स्पर्धेत युरोप आणि अमेरिकेतल्या नामांकित यंत्र शास्त्रज्ञांनी भाग घेतला होता हे विशेष. इंग्लंडमध्ये गेल्यावर त्यांनी छपाईच्या क्षेत्रात अनेक शोध लावले. १९०० साली डॉ भिसे यांचं लक्ष मुद्रण व्यवसायातील यंत्र सामग्रीकडे लागलं. त्या काळी प्रचलित असलेल्या लायनो, मोनो इत्यादी यंत्राची रचना आणि कालमर्यादा यांचा अभ्यास करुन त्यांनी भिसो टाईप या यंत्राचा शोध लावला व त्याचं प्रथम इंग्लंडमध्ये आणि नंतर अमेरिक, जर्मनी, फ्रांस या देशांमध्ये पेटंट घेतले. या यंत्राच्या उत्पादनासाठी सर रतनजी टाटा यांचे सहकार्य मिळवून द टाटा भिसे इन्व्हेशन ही कंपनी १९१० मध्ये लंडन येथे स्थापन केली. पण १९१५ मध्ये ती बंद पडली. त्याच सुमारास दर मिनिटाला साधारण बाराशे अक्षर छापणारं गुणीत मातृका हे यंत्र तयार केलं आणि १९१६ मध्ये विक्रीला आणलं. १९१६ साली भिसे अमेरिकेला गेले तिथे त्यांनी युनिव्हर्सल टाईप क्लस्टर हे यंत्र शोधून काढले आणि अमेरिकेत त्याचं पेटंट घेतले. याशिवाय मुद्रण व्यवसायातली आणखी अनेक यंत्रे त्यांनी तयार केली. १९१० साली साली डॉ भिसे आजारी असताना त्यांच्यावर उपचार करण्यासाठी वापरण्यात आलेलं एक भारतीय औषध फार गुणकारी ठरलं. या औषधाचं रासायनिक पृथःकरण त्यांनी करवून घेतलं आणि त्याच्या गुणकारीपणा आयोडीनामुळे आहे जाणलं. १९१४ साली डॉ शंकर आबाजी भिसे यांनी स्वतःच एक नवीन औषध तयार केले आणि त्या औषधाला बेसलिन हे नाव दिले. हे औषध बाह्योपचारासाठी उपयुक्त ठरले. पहिल्या महायुद्धात या औषधाचा अमेरिकेने मोठ्या प्रमाणात वापर केला. या औषधामुळे पहिल्या महायुद्धात अनेक सैनिकांचे प्राण वाचले. या औषधावर आणखी संशोधन करून आयोडीन घटक असलेलं पण पोटात घेता येईल असं एक औषध नंतर डॉ भिसेंनी तयार केलं या औषधाला ऑटोमेडीयन असं नाव दिलं. हे औषध बऱ्याच रोगांवर उपयुक्त ठरले. पुढे त्यांनी कपडे धुण्यासाठी एक नवे संयुग तयार केले. डॉ भिसे यांनी विद्युत शास्त्रातही अनेक शोध लावले. डॉ भिसे यांच्या साठाव्या वाढदिवशी इंग्लंडमध्ये त्यांचा जंगी सत्कार करण्यात आला. या सुमारास त्यांची महान शास्त्रज्ञ थॉमस अल्वा एडिसन यांच्याशी भेट झाली. एडिसन यांनीही त्यांच्या संशोधन कार्याचा गौरव केला. डॉ भिसे इंग्लंडमध्ये असताना इंग्लंडचे आफ्रिकेशी युद्ध सुरू झाले. स्वयंचलित तोफा काढण्याची विनंती तेथील कारखानदारांनी डॉ भिसे यांना केली. त्यासाठी डॉ भिसे यांना त्यांनी खूप पैसे देऊ केले, पण आपले संशोधन हे विश्वाच्या कल्याणासाठी असून आपल्या संशोधनातून विश्वाचा संहार होऊ नये अशी त्यांची मानवतावादी भूमिका होती. म्हणूनच त्यांनी ही मागणी नम्रतापूर्वक नाकारली. डॉ भिसे यांनी सुमारे २०० शोध लावले. त्यांचे कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. अमेरिकेतील न्यूयॉर्क येथे ७ एप्रिल १९३५ रोजी या महान शास्त्रज्ञाचे निधन झाले. संशोधन क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य अतुलनीय आहे. शासनाने त्यांच्या या महान संशोधकाच्या कार्याची दखल घेऊन त्यांचा मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन गौरव करावा.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# दररोज मोठ्या प्रमाणात मंद विषाचे सेवन

आजच्या आधुनिक युगात माणसाने जशी प्रगती केली आहे, त्याच प्रमाणात, आरोग्याशीही तडजोड झाली आणि ती काळानुसार सतत वाढत आहे, ज्याचे कारण मानव स्वतः आहे. हृदयरोग, मेंदूचा झटका, कर्करोग यासारखे प्राणघातक आजार झपाट्याने वाढत आहेत, त्यासोबतच मधुमेह, रक्तदाब, लठ्ठपणा, अशक्तपणा, आहारात पोषक तत्वांचा अभाव या समस्या शिगेला पोहोचल्या आहेत, त्यामुळे अकाली मृत्यूची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. काही क्षणांपूर्वी पूर्णपणे निरोगी दिसणारी व्यक्ती, प्रौढांपासून ते लहान मुलांपर्यंत, खेळताना किंवा व्यायाम करताना किंवा बसल्याबसून देखील बेशुद्ध पडतात आणि अनेकदा त्यांचा मृत्यू झाल्याचे कळते. दशकापूर्वी आपण ज्या प्राणघातक आजारांबद्दल क्वचितच ऐकायचो, ते आता आपल्या नातेवाईक, शेजारी आणि कुटुंबातील सदस्यांपर्यंत पोहोचले आहे. मानवाचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य अत्यंत कमकुवत झाले आहे; हवामान बदलताच, लोक पटकन आजारी होतात. आपल्या देशातील सरासरी वयाचा दर पाश्चात्य देशांच्या तुलनेत सतत कमी होत आहे. २०२४ च्या जागतिक आनंद अहवालात भारत १४३ देशांपैकी १२६ व्या क्रमांकावर आहे. आनंदाच्या बाबतीत भारत पाकिस्तान, लिबिया, इराक, पॅलेस्टाईन आणि नायजर सारख्या देशांपेक्षाही मागे आहे. आजार वेगाने का वाढत आहेत या समस्येबद्दल तुम्ही कधी गांभीर्याने विचार केला आहे का? काय कारण असू शकते? निरोगी जीवन जगण्यासाठी आपल्याला दररोज पुरेशा प्रमाणात शुद्ध ऑक्सिजन, स्वच्छ पाणी आणि पौष्टिक अन्न मिळत आहे का?

प्रदूषण आणि अस्वच्छता आपला श्वास रोखत आहेत. २०२४ च्या एअर क्वालिटी इंडेक्सच्या आकडेवारीनुसार, भारत जगातील पाच सर्वात प्रदूषित देशांमध्ये समाविष्ट आहे. भारतातील सुमारे ७० टक्के पाणी प्रदूषित आहे आणि देशातील जवळजवळ अर्ध्या नद्या पिण्यासाठी किंवा सिंचनासाठी असुरक्षित आहेत, यामुळे, २०२४ च्या जागतिक जल गुणवत्ता निर्देशांकात भारत १२२ देशांपैकी १२० व्या क्रमांकावर आहे. २०२३ मध्ये बीएमजेमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासात असे आढळून आले की भारतात दरवर्षी २.१८ दशलक्ष मृत्यू बाहेरील वायू प्रदूषणामुळे होतात. लॅन्सेट २०१९ मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासात असे आढळून आले आहे की भारतात ५,००,००० हून अधिक मृत्यू जल प्रदूषणामुळे झाले आहेत. देशात हजारो कोटी रुपयांच्या बनावट औषधांचा मोठा व्यवसाय आहे, मोठ्या सरकारी रुग्णालयांमध्येही रुग्णांना बनावट औषधे वाटली जातात. आशियातील सर्वात मोठ्या रुग्णालयांमध्ये समाविष्ट असलेल्या महाराष्ट्र राज्यातील नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात ही घटना नुकतीच उघडकीस आली.

धान्य पिकवण्यापासून ते आपल्या ताटात वाढण्यापर्यंत, त्यांना अनेक हानिकारक रासायनिक प्रक्रियांमधून जावे लागते. देशात अशुद्ध अन्न आणि अस्वच्छतेची समस्या खूप मोठी आहे. लोक स्वार्थ आणि लोभात इतके आंधळे झाले आहेत की ते एका रुपयाच्या फायद्यासाठी देखील इतरांना विष पाजण्यास तयार आहेत. अलिकडेच कोल्हापूरमधून बातमी आली की मृतदेहांवर वापरला जाणारा बर्फ बाजारात मिळणाऱ्या थंड पेयांमध्ये वापरला जात आहे. आश्चर्यकारक आहे, की आपल्या देशात जेवळे दूध उत्पन्न होत नाही त्यापेक्षा जास्त दूध विकल्या जाते. देशातील ६८.७ टक्के दूध आणि दुग्धजन्य पदार्थांमध्ये प्रदूषक आढळून आले आहेत. तेल, तूप, गोड, नमकीन आणि मैदा सारख्या अन्नपदार्थांची मोठी मागणी आहे, जेव्हाकी ह्या पदार्थांचा आरोग्यावर खूप वाईट परिणाम होतो. मध, मसाले, चहापत्ती, तेल, दूध, मिठाई, तूप आणि केशर सारख्या अन्नपदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणात भेसळ आहे. बाहेरील खाद्यपदार्थांचे रंग खूपच चटक आणि आकर्षक दिसतात. बहुतेक खाद्यपदार्थांना रंग देण्यासाठी नैसर्गिक रंगांऐवजी हानिकारक कृत्रिम रंगांचा वापर केला जातो. अन्नपदार्थांमध्ये वापरले जाणारे बाह्य बर्फ, पाणी, चटण्या, सॉसेज, खाद्यतेल हे बहुदा कमाल दर्जाच्या मानकांची पूर्तता करत नाहीत. देशातील बहुतेक स्ट्रीट फूड विक्रेत्यांना ग्लब्स न घालता थेट अन्नपदार्थांना स्पर्श करण्याची खूप वाईट सवय आहे. याचे गंभीर परिणाम ग्राहकांच्या आरोग्याला भोगावे लागत आहे. जे अन्न प्राण्यांसाठीही योग्य नाही, म्हणजेच प्राणघातक कचरा, ते मानव मोठ्या आवडीने खात आहे.

देशातील बहुतेक अन्नपदार्थ पॅकिंग आणि गुंडाळण्यासाठी वर्तमानपत्रांचा वापर केला जातो, जो आरोग्यासाठी धोकादायक आहे. एफएसएसएआयच्या मते, अन्न पॅकेजिंग साहित्य म्हणून शोषक कागदाऐवजी वर्तमानपत्रांचा मोठ्या प्रमाणात वापर होत असल्याने भारतीयांमध्ये अन्न विषाक्तता हळूहळू पसरत आहे. रिफाइंड केलेले पीठ अर्थात मैदा रासायनिकरित्या ब्लीच केलेले (घातक) असते, त्याचा ग्लायसेमिक इंडेक्स जास्त असतो ज्यामुळे टाइप २ मधुमेह होऊ शकतो आणि फायबरच्या कमतरतेमुळे ते पचनसंस्थेसाठी अडथळा ठरते. जंक फूड तयार करण्यासाठी खाद्यतेलाचा मोठ्या प्रमाणात पुनर्वापर केला जातो; तेल वारंवार गरम केल्याने लिपिड्सचे ऑक्सिडेटिव्ह ब्रेकडाउन होते. पुन्हा गरम केलेल्या तेलाने बनवलेले अन्न दीर्घकाळ सेवन केल्यास व्यक्तीच्या अँटिऑक्सिडंट संरक्षण नेटवर्कवर गंभीर परिणाम होऊ शकतो, यामुळे उच्च रक्तदाब, मधुमेह आणि रक्तवाहिन्यांच्या जळजळासारखे विकार होऊ शकतात, नंतर पुढे घातक आजार होतात. जंक फूड किंवा बाहेरील अन्नामुळे उच्च कोलेस्ट्रॉल, हृदयरोग, मधुमेह, मूत्रपिंडाचे नुकसान, लठ्ठपणा, यकृताचे आजार, कर्करोग, दातांचे नुकसान, नैराश्य, पोटाचे विकार, त्वचारोग इत्यादी समस्यांचा धोका वाढतो. पॅकबंद अन्न आणि पेयांमुळे बहुदा आपण मायक्रोप्लास्टिकचे सेवन करत आहोत. भारतातील ५६ टक्के आजार हे अस्वास्थ्यकर आहाराशी संबंधित आहेत. आयुर्वेद म्हणतो की जर आहार योग्य नसेल तर आरोग्य सुधारण्यासाठी औषधही काम करणार नाही.



डॉ. प्रितम भि. गेडाम
(असीस्टेंट प्रोफेसर)
+०८२३७४१७०४१
prit00786@gmail.com

स्ट्रीट फूडचे आचारी किंवा अन्न विक्रेत्यांनी सरकारी सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. हात चांगले धुवा, स्वच्छ भांडी आणि उपकरणे वापरा, दुकानात स्वच्छता ठेवा, कच्चे आणि शिजवलेले अन्न वेगवेगळे ठेवा, अन्न तयार करण्यासाठी पिण्याचे पाणी वापरा. अन्न तयार करताना आणि वाढताना स्वच्छ धुतलेले कपडे घाला, ग्लब्स आणि एप्रन घाला. काम करताना तोंड आणि केस झाकून ठेवा, तसेच चेहरा, डोके, केस किंवा शरीराच्या इतर भागांना स्पर्श करणे किंवा खाजवणे टाळा. नखे कापा व स्वच्छता ठेवा. सुरक्षित तापमानात अन्न साठवा, चांगल्या दर्जाचा कच्चा माल निवडा, स्थानिक सरकारी नियमांनुसार कचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावा. तळण्यासाठी त्याच तेलाचा पुनर्वापर करू नका, अन्नपदार्थ झाकून ठेवा, शिळे अन्नपदार्थ विकू नका. हे नियम काटेकोरपणे पाळले पाहिजेत. स्वच्छतेसाठी आणि गुणवत्तेसाठी थोडे जास्त पैसे खर्च करावे लागले तरी ठीक, पण आरोग्याशी तडजोड करू नका.

मरण्यासाठी आता आपल्याला फार दूर जाण्याची गरज नाही, आपल्या सभोवतालचे वातावरण आणि आपली जीवनशैली आपल्याला अकाली मृत्यूकडे वेगाने घेऊन जात आहे. देशातील अनेक व्हायरल फूड व्हिडिओ आणि बातम्यांमध्ये अन्नपदार्थांमधील अशुद्धता, निकृष्ट दर्जाचे अन्नपदार्थ, धोकादायक रासायनिक प्रक्रिया, विषारी रंग आणि भेसळ याबद्दल माहिती मिळतेच. बंद खोल्यांमध्ये तयार होणाऱ्या अनेक अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबद्दल शंका निर्माण होते, तरीही हे अन्नपदार्थ रस्त्यावर, रेल्वेवर, बसस्थानकांवर आणि सार्वजनिक ठिकाणी खुलेआम विकले जातात. देशात मोठ्या प्रमाणात भेसळीबरोबरच बनावट कंपन्यांचे अन्न आणि पेयेही विकली जातात. आपले आरोग्य आणि आपल्या प्रियजनांच्या आरोग्याची काळजी घेणे ही आपली स्वतःची जबाबदारी आहे; चवीच्या लोभापायी आपले अमूल्य आरोग्य पणाला लावू नका. घरी बनवलेल्या अन्नाला प्राधान्य द्या, दररोज व्यायाम, पुरेशी झोप, स्वच्छता आणि पौष्टिक आहाराची काळजी घ्या. गरम पेये आणि अन्नासाठी प्लास्टिक आणि छापील टाकाऊ कागद वापरू नयेत. शिळे अन्न, तळलेले, मसालेदार, गोड, मैदा असलेले, कृत्रिम रंग, पॅक केलेले अन्न आणि रासायनिक प्रक्रिया केलेले अन्नपदार्थांपासून दूर रहा. गरज पडल्यास, प्रवास करताना किंवा बाहेर जाताना घरून पिण्याचे पाणी आणि जेवणाचा डबा सोबत ठेवा. आरोग्य हीच खरी संपत्ती आहे, आरोग्याची काळजी घ्या, निरोगी आयुष्य जगा.



## आत्मिक स्वातंत्र्य - हेच खरे स्वातंत्र्य

संत राजिंदर सिंह जी महाराज

संत, चिंतक आणि धर्मगुरू इतिहासाच्या पानांच्या हि पुढील आंतरिक मंडलांचा शोध घेऊन अंती एका निष्कर्षावर पोहोचतात की, आपण शरीर आणि मस्तिष्का पेक्षा काही अधिक वेगळे आहोत. आपण एक आत्मा आहोत जो अध्यात्मिक मंडलांची यात्रा करू शकतो आणि आपल्या वास्तविक स्रोत असलेल्या सृष्टिकर्ता म्हणजेच पिता परमेश्वराच्या रूपाला जाणू शकतो. त्यांनी याचा अनुभव ध्यान-अभ्यासाद्वारे केला. संत महापुरुष म्हणतात की, जेंव्हा आपण एकांतात आपले डोळे बंद करून अंतरी ध्यान टिकवितो आणि आपल्या अंतःचक्षूने परमात्म्याचा अनुभव करतो, तेच आपले खरे स्वातंत्र्य आहे. आत्मिक स्वातंत्र्य यात्रेचा प्रारंभ आपले अंतःचक्षू व कान उघडल्या नंतर आपण परमात्म्याची ज्योती पाहू शकतो आणि श्रुतीला ऐकू शकतो.

## भलत्या ठिकाणी भाषण

हिमालयातले दोन हंस व कासव यांची एकदा मैत्री झाली. हंसांकडून हिमालयाचं वर्णन ऐकून कासव म्हणालं, बाबांनी मला घेऊन चला की रे तुमच्या बरोबर हिमालयात हंस म्हणाले, तुला चोचीनं पकडता येणार नाही. म्हणून एका काठीला तू मध्ये दातांनी धर. आम्ही दोघे काठी पकडू. मात्र तोंड उघडशील तर काठी सुटेल आणि तू प्राण गमावशील हे ध्यानात ठेव. कासवाने काठीचा मध्यभाग दातांनी पकडला व ती काठी घेऊन हंस उडत चालले. कासवालादेखील हे सुंदर हंस आपल्याला नेतात याचा अभिमान वाटला. एका शहरावरून हे तिघे चालले असता खेळणाऱ्या मुलांनी ते दृश्य पाहिलं. मुलं ओरडून म्हणाले, अरे पहा ते देखणे हंस आणि मध्ये लटकतयं कुरूप ओबडधोबड कासव. कासवाला संताप आला त्या मुलांना उद्देशून बोलण्यासाठी कासवानं तोंड उघडलं मात्र ते खाली कोसळून गतप्राण झालं.

## अशोकायन...

### यशाचे रहस्य

ज्याला जीवनात करावयाचे
साकार काही स्वप्न
त्याच्या पुर्तीस्तव सतत
करावे लागती प्रयत्न .. !

सातत्य व वेळेचे बंधन
ज्यांना येते पाळता
तो त्या क्षेत्रात निश्चीतच
ठरत असतो विजेता . !

नियोजन व साधनांचा
बसला योग्य मेळ
तर स्वप्न साकार होण्या
लागत नाही भौ वेळ ...!

संयम व मनोधैर्याची
ताकद असते मोठी
झुकेगा नही साला
ही म्हण नाही खोटी . . !



प्रा. अशोक सारडा, गेहकर.
(९४२२३९४३३९)

# वोक्हार्ट हॉस्पिटल्स येथे इंटर्नल मेडिसिन आणि क्रिटिकल केअरमध्ये वेळेवर उपचारास सर्वाधिक महत्त्व

**नागपूर, ६ एप्रिल :** दरवर्षी ७ एप्रिल रोजी संपूर्ण जग जागतिक आरोग्य दिन साजरा करतं. हा दिवस म्हणजे संपूर्ण समाजाला भेडसावणाऱ्या महत्त्वाच्या आरोग्यविषयक समस्यांबाबत जनजागृती करण्यासाठी असतो. यावर्षी आरोग्य आणि चांगल्या जीवनशैलीबद्दल विचार करत असताना वोक्हार्ट हॉस्पिटल्स येथील इंटर्नल मेडिसिन व क्रिटिकल केअर विभागाचे तज्ञ सल्लागार डॉ. जयेश तिमाने (डीएनबी-इंटर्नल मेडिसिन, ईडीआयसी-ब्रुसेल्स) यांनी आधुनिक औषधींबाबतच्या गंभीर पैलूवर भर दिला आहे. त्यांनी इंटर्नल मेडिसिन आणि क्रिटिकल केअरमध्ये तीव्र आजारांची वेळेवर ओळख आणि योग्य उपचार व्यवस्थापन हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा मांडला आहे जो बऱ्याचदा जीवन आणि मृत्यूमधील फरक स्पष्ट करतो.

क्रिटिकल केअरमध्ये अनेक पातळीवर न दिसणारी लढाई सुरु असते. वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूर येथील आयसीयूमध्ये प्रत्येक सेकंद मोलाचा असतो. येथे गंभीर स्थितीतले रुग्ण भरती होतात. तीव्र संसर्ग (सेप्सिस), हृदयविकाराचे झटके, श्वसनविकार आणि गुंतागुंतीच्या चयापचयासंबंधी अडचणी यांसारख्या जीवघेण्या परिस्थितीसह रुग्ण रोज रुग्णालयात उपचारासाठी दाखल होतात. क्रिटिकल केअर यासाठीच आव्हानात्मक विभाग आहे कारण येथे आजार फार वेगाने फोफावू शकतो आणि गुंतागुंत देखील मोठ्या प्रमाणात असते. त्यामुळे लवकर निदान, तत्काळ उपचार आणि प्रगत देखभाल प्रणाली या गोष्टी रुग्णाच्या जगण्याच्या शक्यता वाढवतात, असे डॉ. जयेश तिमाने म्हणाले.

डॉ. तिमाने यांच्या मते ही लढाई फक्त आयसीयू मध्येच सुरू होत नाही तर, ती बऱ्याचदा रुग्णाकडून दुर्लक्षित झालेल्या किरकोळ लक्षणांपासून सुरू होते. इंटर्नल मेडिसिनमध्ये लक्षणं लवकर ओळखणं, जुनाट आजारांचं प्रभावी व्यवस्थापन करणं आणि त्यांना गंभीर किंवा मेंदूसंबंधी आणीबाणीपर परिस्थितीत जाण्यापासून रोखणं हेच आमचे उद्दिष्ट असल्याचे डॉ. तिमाने म्हणाले.

**प्रतिबंध ते आपत्कालीन काळजी– एक मजबूत दुवा**

वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूर येथे इंटर्नल मेडिसिन आणि क्रिटिकल केअर या दोन्ही विभागात काम करत असल्याने मला दिवसेंदिवस असं जाणवलं की एकत्रित उपचार पद्धती खरोखर जीव वाचवू शकतात. मधुमेह, उच्च रक्तदाब आणि मूत्रपिंडाचे आजार हे अशा प्रकारचे शांततेत नुकसान करणारे आजार आहेत, जे हळूहळू शरीराची प्रतिकारशक्ती कमी



करतात. जर हे आजार वेळेत लक्षात घेतले नाहीत, तर ते गंभीर स्थितीत जाऊन क्रिटिकल केअरची गरज भासवू शकतात, असे डॉ. तिमाने म्हणाले.

यावेळी अशा परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी प्रिव्हेन्शन (प्रतिबंधात्मक उपाय) आणि आपत्कालीन सेवा यामधील दुवा मजबूत करणं आवश्यक असल्याचे प्रतिपादन डॉ. तिमाने यांनी केले. जीवनशैलीशी संबंधित आजारांसाठी नियमित तपासण्या करणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले. श्वास लागणे, छातीत दुखणे, अनपेक्षित थकवा किंवा गोंधळलेपणा अशी लक्षणं ओळखण्यासाठी आणि लक्षणं वाढण्याची वाट न पाहता वेळीच रुग्णालयात जाण्यासाठी रुग्ण व कुटुंबीयांना शिक्षित करणे काळाची गरज असल्याचे ते म्हणाले.

सार्वजनिक जनजागृती देखील यात मोलाचे काम करते. त्यामुळे या जागतिक आरोग्य दिनानिमित्त वेळेवर पावलं उचलण्याबाबत सर्वांनी जनजागृती वाढविण्याचा संकल्प करण्याचे आवाहन त्यांनी केले. कारण, कुटुंबातील सदस्य, काळजीवाहू आणि शेजारीदेखील एखाद्या व्यक्तीची प्रकृती बिघडत असल्यास आणि तातडीच्या वैद्यकीय मदतीची आवश्यकता ओळखण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात असे त्यांनी प्रतिपादन केले.

डॉ. जयेश तिमाने यांनी सांगितले कि, ''वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूर येथे आम्ही केवळ उपचार पुरवणं एवढ्यावर थांबत नाही, तर रुग्णांना माहिती देणं आणि वेळेवर योग्य उपचार मिळवून देणं हेही आमचं ध्येय आहे. याशिवाय मानसिक आरोग्याचा मुद्दाही दुर्लक्षित करता कामा नये. तणाव, चिंता आणि नैराश्य यामुळे शरीराच्या आजारांमध्ये वाढ होऊ शकते आणि बरे होण्याची प्रक्रिया मंदावू शकते. म्हणून संपूर्ण उपचारपद्धती ही शारीरिक आणि मानसिक अशा दोन्ही पैलूंना स्पर्श करणारी असावी, हे आमचं मत आहे.''

आधुनिक क्रिटिकल केअरमध्ये आज खूप प्रगती झाली आहे. प्रगत तंत्रज्ञान, प्रभावी औषधं आणि वेगवेगळ्या तज्ञांनी एकत्रित दिलेली सेवा यामुळे अनेक गंभीर आजारांमध्ये रुग्णांचे बरे होण्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले आहे. पण केवळ तंत्रज्ञान पुरेसे नसून जनजागृती, वेळेवर कृती आणि प्रतिबंधात्मक विचारप्रणाली यांची खरी गरज आहे, असा संदेश वोक्हार्ट हॉस्पिटल्सतर्फे देण्यात आला.

वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूर येथील आमचे समर्पित वैद्यकीय कर्मचारी दिवस-रात्र मेहनत करून दर्जेदार सेवा देत आहे, मग ते दीर्घकालीन आजाराचे व्यवस्थापन असो की आयसीयूमध्ये जीवनासाठी चाललेली झुंज असो. परंतु, जागतिक आरोग्य दिन साजरा करत असताना, आपण आणि आपल्या समाजाने हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे कि आरोग्य ही आपली सामूहिक जबाबदारी आहे, असा संदेश डॉ. जयेश तिमाने यांनी दिला.

सर्व मिळून सतर्क राहूया, वेळेवर कृती करूया आणि आयुष्याची ही अनमोल भेट जपून ठेवूया असे आवाहन करत त्यांनी वोक्हार्ट हॉस्पिटल्सच्या वतीने आरोग्यदायी आणि सुरक्षित राहण्याच्या सदिच्छा दिल्या.

# नितीन गडकरी यांच्या हस्ते 'इवाना बाय जिंदाल'चे उद्घाटन



**नागपूर, ६ एप्रिल :** विविध क्षेत्रातील गुंतवणुकीनंतर आता नागपूर शहराला रत्न आणि दागिने क्षेत्रहि खुणावत असून आंतरराष्ट्रीय लॅब-ग्रोउन डायमंड आणि पोल्की दागिन्यांमध्ये आघाडीवर असलेल्या सुरतस्थित इवाना बाय जिंदाल ब्रँडने नागपूरमध्ये आपले तिसरे फ्लॅगशिप स्टोअर सुरू केले आहे. याचे उद्घाटन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री श्री नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन सोहळ्याला जिंदाल कुटुंब आणि विविध मान्यवर उपस्थित होते.

इवाना बाय जिंदालचे सह-संस्थापक सुषिल जिंदाल म्हणाले, नागपूर हा उत्कृष्ट दागिन्यांचा वेगाने विकसित होणारा बाजार आहे, आणि आम्हाला येथे लक्झरीचा एक नवीन पैलू आणायचा आहे. उच्च दर्जाच्या आणि जबाबदारीने तयार करण्यात आलेल्या दागिन्यांची मागणी वाढत आहे, पण पर्याय मर्यादित आहेत. या स्टोअरच्या माध्यमातून आम्ही ग्राहकांना वारसा आणि नवोन्मेष यांचे उत्तम संमिश्रण उपलब्ध करून देणार आहोत.

सह-संस्थापक आयुषी जिंदाल यांनी स्पष्ट केले, दागिने हे अतिशय व्यक्तिगत असतात, आणि प्रत्येक दागिना गुणवत्तेचा आणि भावनांचा सार जपतो, हे सुनिश्चित करणे हे आमचे ध्येय आहे. नागपूर स्टोअरमध्ये ग्राहक चिरकाल टिकणाऱ्या डिझाइन्स पाहू शकतात, कला समजू शकतात, आणि दागिने वैयक्तिकरित्या डिझाइन करू शकतात. पारंपरिक किंवा आधुनिक कोणत्याही प्रकारचे दागिने निवडताना त्यांचा सौंदर्य आणि विश्वसनीयतेवर आत्मविश्वास असावा.

१,५०० चौरस फूट क्षेत्रात विस्तारलेले हे नवीन स्टोअर प्रमाणित लॅब-ग्रोउन डायमंड्स आणि पोल्की दागिने सादर करत आहे. पारंपरिक आणि आधुनिक पद्धतींचे संतुलन साधत १५,००० ते १५,००,००० या विस्तृत किंमत श्रेणीत उपलब्ध असलेल्या दागिन्यांमुळे दररोजच्या वापरासाठी तसेच वैवाहिक दागिन्यांसाठी आकर्षक पर्याय ग्राहकांना उपलब्ध आहेत. सुरत आणि नोएडामधील यशस्वी स्टोअर्सनंतर, इवाना बाय जिंदालने भारतात आपले नेटवर्क विस्तारत नेण्याचा निर्धार केला आहे. नागपूर स्टोअर हे देशभरात शाश्वत दागिन्यांचा प्रसार करण्याच्या व्यापक रणनीतीचा एक भाग आहे, जिथे लॅब-ग्रोउन डायमंड्सबद्दल जागरूकता आणि मागणी वाढत आहे.

# कळमेश्वरात बाबा जुमदेव यांची जयंती उत्साहात

**कळमेश्वर, ६ एप्रिल :** परमपूज्य परमात्मा एक सेवक मंडळ टिमकी नागपूर शाखा कळमेश्वर यांच्या वतीने मानवधर्माचे संस्थापक महान त्यागी बाबा जुमदेवजी यांची जयंती तीन एप्रिल गुरुवारला कळमेश्वर शाखा मार्गदर्शक हंसराज साकोरे यांच्या नेतृत्वात शोभायात्रा काढून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शोभा यात्रेची सुरुवात कळमेश्वर मार्गदर्शक हंसराज साकोरे यांच्या निवासस्थानावरून बाबा हनुमान जी व महानत्यागी बाबा जुमदेवजी तसेच वाराणसी आई यांच्या प्रतिमेचे स्वागत करून करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित प्रमुख मान्यवरामध्ये भाजपा जेष्ठ नेते डॉ राजीव पोतदार, प्रमोद हत्ती व कार्यकर्ता गणामध्ये विश्वास सावरकर काटोल, गोविंदा परिसे, प्रमोद रेवतकर, पंढरी चौधरी, देवराव फरकासे, मनोज नासरे रमेश कुबडे, निखिल भुते, किरण कडू, मनोज शेंडे, मिनेश शेंडे, अरविंद ढोले, विष्णू कामडी, प्रकाश राऊत, माधव पन्नासे, माणिक अंबा गडे, विष्णू नेतनकर, ईश्वर हे लोंडे, सागर घोराडकर अन्य मान्यवर उपस्थित होते भगवान बाबा हनुमान जी महानत्यागी बाबा जुमदेवजी वाराणसी आई यांच्या यांच्या रथावर असलेल्या प्रतिमा व बँड पथक ढोल ताशा लेझीम पथक व डीजेच्या गजरात फटाक्याची आतिषबाजी करीत निघालेल्या या शोभायात्रेमध्ये हजारोच्या संख्येने परमात्मा एक सेवक सहभागी झाले होते. या शोभायात्रेमध्ये बाहुबली हनुमान आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला होता ही शोभायात्रा कळमेश्वर पोलीस स्टेशन मार्गे बस स्टॅन्ड जोड मारुती चौक बाजार चौक नागपूर रोड मटन मार्केट कळमेश्वर सावनेर बायपास वरील अहिल्याबाई होळकर चौकात या शोभा यात्रेचे समापन करण्यात आले शोभायात्रा भ्रमणादरम्यान कळमेश्वर शहरातील सेवकाच्या वतीने ठिकठिकाणी महाप्रसाद मठ्ठा बिस्किटे चना पोहे आधीचे वितरण करण्यात आले समापनप्रसंगी आयोजित कार्यक्रमांमध्ये माजी नगरसेवक मनोज शेंडे व त्यांचे बंधू परमात्मा एक सेवक मिनेश शेंडे या बंधूंनी कळमेश्वर येथे परमात्मा एक भवन बांधण्यासाठी ५००० स्वे .फुट जागा देण्याची घोषणा केली यावेळी कळमेश्वर शाखा मार्गदर्शक हंसराज साकोरे यांनी त्यांना महानत्यागी बाबा जुमदेवजी यांची प्रतिमा देऊन सत्कार केला तसेच अन्य मान्यवरांच्या सुद्धा यावेळी सत्कार करण्यात आला शोभा यात्रेच्या यशस्वीतेसाठी स्वप्निल साकोरे, आदेश कोल्हे, आदेश राऊत, मनीष किरपाळ, अक्षय शेंडे, रोशन बांबल, अतुल भुजाडे, आशिष कामडी, शुभम बी सेन, रितेश कामडी आदींनी प्रयत्न केले.

# महाबळेश्वर महापर्यटन महोत्सव २०२५ यशस्वी करूया : शंभूराज देसाई

**मुंबई, ६ एप्रिल :** सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर येथे प्रथमच 'महाबळेश्वर महापर्यटन महोत्सव २०२५' मोठ्या स्वरूपात साजरा होणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागातंर्गत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ आणि सातारा जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने हा पर्यटन महोत्सव २ ते ४ मे २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील मंत्रीगण तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत २ मे २०२५ रोजी या महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे, अशी माहिती पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी पावनगड या निवासस्थानी पत्रकार परिषदेत दिली.



पर्यटनमंत्री शंभूराज देसाई म्हणाले की, 'महाबळेश्वर महापर्यटन महोत्सव २०२५' या पर्यटन महोत्सवाच्या टेन्ट्स उभारण्यात येणार आहेत. पर्यटकांसाठी अत्याधुनिक निवासव्यवस्थेकरिता टेंट सिटी उभारली जाणार आहे. वेण्णा तलावात पर्यटकांना साहसी खेळ आणि वॉटर स्पोर्ट्सचा आनंद घेता येईल. देशभरातील पर्यटन उद्योगातील तज्ज्ञ, ट्रॅव्हल एजंट्स आणि गाईड्स यांचा एक विशेष परिसंवाद देखील आयोजित करण्यात येणार आहे.

पर्यटनमंत्री शंभूराज देसाई म्हणाले की, महाराष्ट्रातील गडकिल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व आणि पर्यटनदृष्ट्या त्यांचे योगदान यावर विशेष सादरीकरण देखील होणार आहे. ३ मे २०२५ रोजी महाबळेश्वरच्या साबळे रोड येथे एक विशेष सांस्कृतिक मिरवणूक काढण्यात येईल. या महोत्सवात राज्यातील प्रत्येक भागातील पारंपरिक खाद्यसंस्कृतीचा आस्वाद पर्यटकांना घेता येईल. तसेच ४ मे २०२५ रोजी समारोप सोहळ्यापूर्वी महाराष्ट्रातील विविध पारंपरिक लोककला जसे

**महोत्सवात नेत्रदीपक लेझर शो, टेंट सिंटी, पर्यटकांसाठी साहसी खेळ,**
**विविध परिसंवाद, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन**
**पर्यटन उद्योगातील तज्ज्ञ, ट्रॅव्हल एजंट्स आणि गाईड्स यांचा समावेश**

बोधचिन्हाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्रीमंडळातील इतर सदस्यांच्या उपस्थितीत लोकार्पण करण्यात आले. सातारा जिल्ह्यात प्रथमच एवढ्या मोठ्या स्वरूपात पर्यटन महोत्सव होत आहे. या महोत्सवात पर्यटकांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. महाबळेश्वरमधील प्रसिद्ध वेण्णा तलावात महोत्सव कालावधीत नेत्रदीपक लेझर शो होणार आहे. गुजरातमधील कच्छ रणच्या धर्तीवर महाबळेश्वर येथे शंभरहून अधिक की लावणी, गोंधळ, जागर, नाशिक ढोल इत्यादींचे सादरीकरण होणार आहे. तसेच, भव्य ड्रोन शो या महोत्सवाचे मुख्य आकर्षण असणार आहे. महोत्सवाच्या समारोप कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित राहणार असून या महोत्सवात सहभागी झालेल्या उद्योजक, ट्रॅव्हल गाईड्स आणि स्थानिक कलाकारांचा यथोचित सत्कार केला जाणार आहे. कार्यक्रमाची सविस्तर रूपरेषा लवकरच जाहीर करणार आहोत या महोत्सवाला पर्यटनप्रेमींनी जरूर यावे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

## दुकानात चोरीचा पर्दाफाश

**नागपूर, ६ एप्रिल :** वर्धमाननगरातील कापडाचे दुकान फोडून चोरी करणाऱ्या तीन आरोपींना पकडण्यात गुन्हे शाखा युनिट ३ च्या पथकाला यश आले. आरोपींमध्ये कुणाल सुखदेव कुकडे(१९) रा. प्रजापतीनगर, वाठोडा याच्यासह दोन अल्पवयीनचा समावेश आहे. पोलिसांनी आरोपींकडून चोरीचा मुद्देमालही जप्त केला. पारडीच्या सुभाननगर परिसरात राहणाऱ्या रूदाम हुसेन मकबूल अहमद अंसार (३३) यांची वर्धमाननगर परिसरातील वैष्णो देवी चौकात एसडी फॅशन नावाने कापडाची दुकान आहे. गत २६ मार्चच्या रात्री ११ वाजता ते दुकान बंद करून घरी गेले होते. मध्यरात्रीला अज्ञात आरोपींनी दुकानाचे शटर तोडून आत प्रवेश करीत गल्ल्यातील रोख १० हजार, घड्याळ, कपडे व इतर साहित्य असा एकूण ३९ हजार रुपयांचा माल चोरून नेला. दुसऱ्या दिवशी ही चोरी उघडकीस आल्यानंतर हुसेन यांच्या तक्रारीवरून लकडगंज पोलिसांनी अज्ञात आरोपीवर कलम ३०५(अ), ३३४ (१) अन्वये गुन्हा नोंदविला होता. गुन्हे शाखा युनिट ३ चे पथकही या गुन्ह्याचा समांतर तपास करीत होते. तांत्रिक तपासात कुणालचा सुगावा लागला. त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता अल्पवयीन साथीदारांसोबत मिळून चोरीची कबुली दिली. पोलिसांनी कुणालला अटक करून त्याच्या दोन्ही साथीदारांना ताब्यात घेतले. आरोपींकडून पोलिसांनी चोरीसाठी वापरलेले दुचाकी वाहन आणि चोरीतील मुद्देमालासह एकूण १ लाख ४ हजार रुपयांचा माल जप्त केला. तिन्ही आरोपींना मुद्देमालासह पुढील कार्यवाहीसाठी लकडगंज पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आले.

# महावीरनगरात भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सवाचे आयोजन

**नागपूर, ६ एप्रिल :** श्री सैतवाळ जैन संघटन मंडळ महावीरनगर नागपूर द्वारे २६२४ व्या भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सवानिमित्त बुधवार १० एप्रिलला सकाळी ७:३० वाजता महावीर दिगंबर जैन मंदिर महावीरनगर येथून प्रभातफेरी निघून मयुर मंगल कार्यालय, महावीरनगर परिसर मार्गे मंदिरात पोहचेल. तेथे भगवान महावीरांच्या प्रतिमेचा जन्माभिषेक होईल. सायंकाळी ७ वाजता एक शाम भगवान महावीर के नाम संगीतमय कार्यक्रम नागपूरच्या सुप्रसिद्ध गायिका श्रुती जैन बंड व सुरमणी श्यामकुमार जैन पोहरे सादर करतील. त्यानंतर संगीतमय महाआरती होईल.



श्री पार्श्वप्रभू दिगंबर जैन सैतवाळ मंदिर, अखिल दिगंबर जैन सैतवाळ संस्था, श्री दिगंबर जैन युवक मंडळ (सैतवाळ), श्री चंद्रप्रभू दिगंबर जैन मंदिर बाहुबलीनगर, श्री आदिनाथ दिगंबर जैन सैतवाळ मंदिर अंबानगर, पुलक मंच परिवार नागपूर, महावीर युथ क्लब, जैन सहायता ट्रस्ट यांचे सहकार्य लाभत आहे.

# सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत अर्जुनच्या राशीविषयीच्या भावनांबाबत बादशाह साशंक होतो

**मुंबई, ६ एप्रिल :** सोनीसबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत पुष्पा (करुणा पांडे) या केंद्रीय व्यक्तिरेखेभोवती गुंफलेल्या कथानकाने प्रेक्षकांचे मन जिंकले आहे. या मालिकेत जीवनातील आव्हानांना हिंमतीने आणि सकारात्मकतेने तोंड देण्याची पुष्पाची क्षमता वेळोवेळी दिसून येते. अलीकडच्या भागांमध्ये प्रेक्षकांनी पाहिले की, राशीला (देशना दुगड) अर्जुन शेखावतच्या (तन्मय नागर) ॲड फिल्ममध्ये झळकण्याची संधी मिळते. या सगळ्या प्रक्रियेत अर्जुन पुष्पाशी वाईट वागतो. त्यावरून अर्जुन आणि राशीमध्ये वादावादी होते. परिस्थिती निराशाजनक वळण घेत असल्याचे वाटत असतानाच पुष्पा मध्ये पडते आणि राशीला तिचे शूटिंग पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहन देते.

आगामी भागांमध्ये, दिलीपला कॅन्सरचे निदान झाल्याचे कळल्यावर राशी आपल्या मनातील भावनांच्या वादळाशी झुंजताना दिसते. ती मनातून पार हादरून जाते आणि आधारासाठी पुष्पाकडे जाते व चाळीतून बाहेर पडण्याअगोदर ही धक्कादायक बातमी पचवण्यासाठी थोडा वेळ मागते. बाहेर, अर्जुन तिची वाट बघत आहे. तिला दिलासा देऊन तो तिला आपल्या गाडीत बसायला सांगतो आणि ती त्याच्यापाशी मन मोकळे करू शकते, असे सुचवतो. त्याच्या या सौहार्दपूर्ण वागण्याने हुरळून गेलेल्या राशीच्या मनात त्याच्याविषयी नाजुक भावना उमलू लागतात. त्यांचे नाते हळूहळू घट्ट होऊ लागते. त्यांच्यातील या हळुवार नात्याची कुणकुण बादशाहला (हितुल पुजारा) लागते आणि त्याला ते आवडत नाही, हे स्पष्ट दिसते.

राशीविषयीच्या काळजीने बादशाह ही गोष्ट पुष्पाला सांगायचे ठरवतो. गोष्टी अधिक पुढे जाण्याअगोदर पुष्पा मध्ये पडेल का?

पुष्पाची भूमिका करणारी करुणा पांडे म्हणते, पुष्पाच्या तिच्या मुलांवरील प्रेमाला कोणत्याही मर्यादा नाहीत. ती एक अशी आई आहे, जी आपल्या मुलांच्या रक्षणासाठी आणि त्यांच्या आनंदासाठी काहीही करू शकते. एक आई म्हणून पुष्पाच्या लक्षात ही गोष्ट आली आहे की राशी आणि अर्जुन यांच्यात नाजुक नाते निर्माण होत आहे. आपल्या मुलीच्या समजूतदारपणावर विश्वास ठेवावा की तिला संभाव्य धोक्याची जाणीव करून द्यावी हा संभ्रम तिच्या मनात निर्माण झाला आहे. खूप उशीर होण्याअगोदर ती हस्तक्षेप करणार का? की राशीला स्वतःलाच आपल्या अनुभवातून हा धडा शिकावा लागेल? मला वाटते, या भावनिक संभ्रमामुळेच पुष्पाची गोष्ट लोकांना आपलीशी वाटते. कारण प्रत्येक माणसाच्या मनातील भीती, प्रेम आणि ताकद यांचे प्रतिबिंब त्याला पुष्पामध्ये दिसते.

## राशीभविष्य

**मेष :** तुम्हाला प्रत्येक कार्यात सन्मान मिळेल. धावपळीमुळे तुमच्या आरोग्यावर वाईट परिणाम होऊ शकतो. तुम्हाला तुमच्या कुटुंबाचा पूर्ण पाठिंबा मिळेल. प्रवासाचा योग संभवतो. तुमच्या सन्मानात वाढ होईल.

**वृषभ :** तुमची आर्थिक स्थिती मजबूत होईल. तुमचा मान-सन्मान वाढेल. कोणताही निर्णय घाईत घेणे टाळा, अन्यथा तुम्हाला नंतर पश्चात्ताप होऊ शकतो. काही महत्त्वाच्या कामासाठी बाहेर जावे लागू शकते.

**मिथुन :** घर-कुटुंबातील समस्या सुटतील. तुम्हाला सरकारी मदतही मिळेल. अचानक लाभ होण्याची शक्यता आहे. अनोळखी व्यक्तीच्या सल्ल्याने केलेल्या गुंतवणुकीतून फायदा होईल.

**कर्क :** या राशीच्या लोकांसाठी शिक्षण आणि स्पर्धा क्षेत्रात विशेष यश मिळेल. तुमच्यासाठी उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण होतील. धनलाभ होईल. तुम्हाला बोलण्यामुळे लोक प्रभावित होतील.

**सिंह :** या वृश्चिक राशीच्या व्यक्तींसाठी आर्थिक लाभाचे योग आहेत. तुमच्या धन-सन्मानात वाढ झाल्यामुळे मन प्रसन्न राहील. तुमची रखडलेली कामे पूर्ण होतील. प्रियजनांशी भेट होईल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा,

**कन्या :** कुटुंबातील लोकांकडून तुम्हाला मदत मिळेल. आज तुम्हाला यश मिळेल. या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस खूप चांगला आहे. ग्रहांच्या शुभ स्थितीमुळे तुम्हाला अचानक धनलाभ होऊ शकतो.

**तुळ :** आज घरातील वस्तूंवर पैसे खर्च होतील. कोणत्याही कर्मचाजयामुळे किंवा नातेवाईकामुळे ताण वाढेल. आज कोणताही व्यवहार करु नका. सावधगिरी बाळगा, नाहीतर तुमचे पैसे अडकू शकतात.

**वृश्चिक :** तुम्हाला अडचणींचा सामना करावा लागू शकतो. संध्याकाळी आणि रात्री फिरण्याची संधी मिळेल. आपल्या कामावर लक्ष केंद्रित करा. घरात वाद होण्याची शक्यता आहे. जपून बोला.


**धनु :** या राशीच्या व्यक्तींना राजकीय क्षेत्रात मोठे यश मिळेल. मुलांप्रती तुमच्या जबाबदाजया तुम्ही पूर्ण कराल. तुम्हाला स्पर्धात्मक परीक्षेत यश मिळण्याची शक्यता आहे. तुमची रखडलेली कामे पूर्ण होतील.

**मकर :** आजचा दिवस यशाने भरलेला असेल. तुमच्या कामांना गती मिळेल. तुम्हाला तुमच्या कुटुंबाकडून आणि नातेवाईकांकडून आनंदाची बातमी मिळेल. तुमचे भाग्य तुमच्या सोबत असेल. पण रागावर नियंत्रण ठेवा.

**कुंभ :** आशावादी राहा. नकारात्मक विचार सोडा. घरात सलोख्याचे वातावरण ठेवा. अचानक प्रेम व्यक्त करण्याची संधी मिळेल. आज भाऊबहिणींसोबत चित्रपट पाहण्याचा योग आहे.

**मीन :** तुम्हाला आर्थिक लाभ होईल. संध्याकाळपासून रात्रीपर्यंतचा वेळ हसण्यात-खेळण्यात जाईल. खाण्यापिण्याची काळजी घ्या. एकमेकांच्या भावना समजून घ्या. प्रेम वाढवा.

## शब्दकोडे क्रमांक २०७७



**आडवे शब्द :-**

१) दैववान,
५) वेडावाकडा
८) मेहेरबानी
१०) पाठविलेला
११) अबोलीची माळ
१३) धपाटा
१५) आयुष्य
१६) इमारतीचे बांधकाम करणारा राज
१८) पोष्टऑफिस
१९) उष्ण वा थंड नसलेले (पाणी)
२०) पुष्पदल
२१) वाघूळ
२२) षट
२३) मुस्लीम सरदार
२४) दुसऱ्याच्या मनातील विचार जाणणारा
२६) इंग्रजीत भाजणे
२७) गाढव
२८अ) कणीदार
३०) लवंडणे
३२) एक कंदमूळ
३३) छोटी लढाई
३४) व्रत
३६) मगज
३७) लाकडी जिना
३८) ढोंगी, नट, बहुरुपी
४०) धरा, पकडून ठेवा
४३) वाळवी
४५) दया
४६) लक्ष्मी
४८) बासरी
५०) साठ मिनीटे
५२) कपडालत्ता
५४) आत्याचा मुलगा
५५) शूर पुत्राला जन्म देणारी आई
५७) पृथ्वी
५८) खेळ, क्रीडा
६०) धैर्य, हिंमत
६२) सूर्याचे एक नाव
६३) फुरसत
६४) ** गण **
६७) शेतीतील काम
६९) फलक, टोपली
७०) हार
७१) मृत्यू नसलेला
७२) शेतकरी
७४) न्याय
७५) रत्न
७६) खलातील कुटण्याचे साधन

**उभे शब्द :-**

१) पुरुष
२) महाराष्ट्राचा राजा
३) नकली, खोटे
४) पर्वत
५) वाहणारी हवा
६) प्रेत वाहण्याची ताटी
७) ओटा
९) सुरळीत चालू असलेले काम बंद पाडणे (वा.प्र.)
१२) चकचकीत
१४) पुष्पदल
१७) नमस्कार
१८) हातोहात, त्वरेने
१९) दोन मैलाचे अंतर
२०) अलगुजे
२१) एक चतुर्थांश
२३) आकाश
२४) मळलेला
२५) दया, कीव
२६) न घाबरणारा
२८) टोळेचा प्रमुख
२९) श्रीविष्णुचा बटु अवतार
३१) पायाने अधू असलेला
३२) गाणे गाणारा
३३) उसाचा रस काढणारे यंत्र
३५) सर्प
३९) पोपट
४१) छिद्रातून जमिनीवर पडणारे उन
४२) दरवाजा
४४) अखेरीस
४७) एक सुगंधी वनस्पती
४८) पाप करण्यास घाबरणारा
४९) आई, ज्ञानेश्वर
५१) संतोष, आनंद
५३) पंख
५६) ताल वृक्ष
५९) लाजणारा
६१) सुरक्षित
६२) सुपारी कातरण्याचे साधन
६३) समतल
६५) दृष्टी
६६) मेलेला
६८) फळातील खाद्य
७०) पाय कवितेतील चरण
७३) अभिनेता

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



महासागर भंडारा
सोमवार ०७एप्रिल२०२५
पान ६

## वाघाये महाविद्यालयाची बन्सी डेअरीला भेट

**सानगडी :** येथील स्वर्गीय निर्धन पाटील वाघाये महाविद्यालयातील वाणिज्य विभागाने बन्सी डेरी लाखनीला भेट दिली. यात विद्यार्थ्यांनी विविध मिल्क प्रोडक्ट साठी करावयाची प्रक्रिया व मार्केटिंग याबाबत माहिती मिळवली. महाविद्यालयातील वाणिज्य विभाग प्रमुख प्राध्यापक धवन कुमार करेले यांच्या प्रमुख उपस्थितीत वाणिज्य व अर्थशास्त्र शाखेतील विद्यार्थ्यांनी बन्सी डेअरी लाखनी ला भेट दिली. यादरम्यान डेअरी संचालक लवकुश पांडे आणि उत्पादन अभियंता अमित कुमार गुप्ता आणि पटले यांनी दूध टिकवण्याची पद्धत, घेण्यात येणारे उत्पादन, दूध व दही तसेच बाजारपेठात येणाऱ्या अडचणी कच्चामाल आणि खरेदी विक्री याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. सदर विद्यार्थ्यांना दुधाच्या टिकवण्याच्या पद्धती बद्दल प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले. याप्रसंगी पीबी मेश्राम प्रशांत वाघाये, व डेअरीतील कर्मचारी उपस्थित होते.

# साकोलीत शस्त्रांसह दोघांना अटक

### आरोपींकडुन तलवारी, कोयते, दारू जप्त



**महासागर प्रतिनिधी**

**साकोली ,दि. ०६ :** शहरातील गणेश वार्ड येथे शनिवारी पोलीसांनी शस्त्र बाळगून दहशत माजवित असलेल्या दोन आरोपींकडून मोठा शस्त्रसाठा व दारूच्या शिश्या जप्त करून दोन्ही ओडीशा येथील आरोपींना अटक केली आहे. ही कारवाई श्रीराम नवमीच्या आदल्या दिवशी पोलीस निरीक्षक एम. पी. आचरेकर व सहाय्यक पोलीस निरिक्षक दिपक वानखेडे यांनी केली असून या दोन्ही वादग्रस्त व्यक्तींमुळे नागरीक कमालीचे त्रस्त झाले होते असे प्रभागातील जनतेने सांगितले.

जूने पोलीस ठाणे, पंचायत समिति बाजूला स्व. गोपालदास गंगाराम अग्रवाल यांच्या घरी रवि. ०५ ला दु. ११:३० दरम्यान जावई रूपेश चांडक ३५ रा. ब्रम्हपुरी हे आले असता, तेथे राहणारे अशोक मालीराम अग्रवाल वय ६४ व दिनेश मालीराम अग्रवाल वय ४४ मुळगाव रा. बेटनोटी, तह. छनबडीया जिल्हा मयुरभंज (ओडीशा) यांनी वादविवाद घालित शस्त्र बाळगून दहशत निर्माण केली. तातडीने साकोली पोलीसांना याची माहिती देण्यात आली. पोलीस निरीक्षक एम. पी. आचरेकर यांनी तात्काळ सहा. पोलीस निरीक्षक दिपक वानखेडे यांना तेथे पाचारण केले. पोलीसांनी त्यांच्या रूममध्ये झडती घेतली असता तिथून सहा ते सात घातक (तलवार, चाकु, गुप्ती, कोयता अवजारे व अनेक दारूच्या बाटल्या हस्तगत केल्या. ही कारवाई करून दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. पोलीस ठाणे येथे त्यांवर गंभीर स्वरूपाच्या गुन्हयाची कारवाई सुरू होती.

विशेष म्हणजे गणेश वार्ड प्रभागात या दोन्ही 'रंगा बिल्ला' या टोपण नावाने ओळखले जाणाऱ्या दोन्ही भावंडांची चांगलीच दहशत निर्माण झाली होती. वारंवार रोडवर निघून वादविवाद घालित परीसरातील शांतता भंग करणे. किरायादारांना धमक्या देऊन पैसे उकळणे. या त्रासापायी येथील दोन भाडेकरू याच मानसिक त्रासाला कंटाळून खोली सोडून गेले आहेत. यांवर यापूवीही पोलीसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून शस्त्र बाळगून दहशत निर्माण करणाऱ्या दोघांवरही कायदेशीर कारवाई करून अश्या आरोपींना हद्दपार करण्यात यावे अशी चर्चा गणेश वार्ड प्रभागात सुरू आहे. आजच्या गंभीर घटनेचा तपास पोलीस निरीक्षक महादेव आचरेकर यांचे मार्गदर्शनात सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक वानखेडे करीत आहेत.

# दुधापेक्षा पशूखाद्य महाग पोट भरायचे कसे!

**महासागर प्रतिनिधी**

**मोहाडी :** ग्रामीण भागात रोजगाराची कमतरता असल्याने ग्रामीण भागातील लोक मिळेल ते काम करून आपला उदरनिर्वाह करत असतात. शासन रोजगार हमी योजने अंतर्गत लोकांना काम मिळावे म्हणून गावोगावी महात्मा गांधी रोजगार हमी योजने अंतर्गत कामे करते , परंतु हे कामे नेहमी सुरू राहत नसल्याने ग्रामीण भागात रोजगाराची हळहळ निर्माण होत असते. रोजगार हमीचे काम हे साधारणतः जवळपास पाच महिने सुरू असतात पाच महिने पूर्ण झाले की पुन्हा कामाची कमतरता ग्रामीण भागात जाणवत असते. अशातच ग्रामीण भागातील लोक दुग्ध व्यवसाय करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत असतात. स्वस्त किमतीचे दुधाळू जनावरे घेऊन त्यांचे नित-नियमाने पालन पोषण करून दुग्ध व्यवसाय सुरू करतात. परंतु आत्ताच्या स्थितीत दुग्ध व्यवसाय सुद्धा न परवडणारा झाला आहे. जनावरांना जेवढा पशुखाद्य ग्रामीण भागात लागतो त्यापेक्षा कमी हप्त्याचा दुध होत असते. त्यामुळे आता ग्रामीण भागातील लोकांनी काय करावे , कसे करावे असा विचार दुग्ध उत्पादकांना पडला आहे. नुसतं हिवरा चारा खाल्ल्याने गाईचे / म्हशीचे दूध वाढत नाही, तर त्यांना पशुखाद्य सुद्धा द्यावा लागतो. पण आज पशुखाद्याच्या किमतीमध्ये एवढी वाढ झाली आहे की त्यापेक्षा दुधाच्या किमतीमध्ये फारच घसरन झालेली आहे. त्यामुळे जनावरांना खीलाई चारायचं कसं असा संतप्त विचार दुग्ध व्यवसायांना पडला आहे. एकेकाळी शासन दूध उत्पादन वाढवण्यासाठी आवाहन करत असते, परंतु त्या तुलनेत दुग्ध व्यवसायाला शासनाकडून प्रोत्साहन मिळत नसल्याने दुग्ध व्यवसाय करायचा की नाही असा प्रश्न दुग्ध व्यवसायिक करीत आहेत. शेती पूरक जोडधंदा म्हणून ग्रामीण भागात दुग्ध व्यवसाय केला जातो. मात्र पशुखाद्याचे दर वाढल्यामुळे दुग्धोत्पादक, पशुपालक मेटाकुटीला आले आहेत. दुसरीकडे गत दोन वर्षांपासून दुधाचे दर मात्र वाढले नाही. पशुखाद्याच्या दरात वीस ते तीस रुपयांची दरवाढ झाली आहे. पशुखाद्यात टप्प्याटप्प्याने तीन ते चार पट वाढ झाली आहे. गेल्या दहा ते बारा वर्षात दुधाचे दर कमीत कमी तर पशुखाद्याचे दर जास्तीत जास्त वाढत चालले आहेत. शेती व्यवसायाला ग्रामीण भागात जोडधंदा पूरक धंदा म्हणून शेतकरी दूध व्यवसायाकडे मोठ्या प्रमाणात वळले आहेत. शासन विविध योजनांद्वारे त्यांना दुग्ध व्यवसायाकरिता प्रोत्साहन देतात, परंतु त्यांच्या दूध दरवाढीच्या मागणी कडे शासनाचे मात्र सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचे चित्र उमटत आहे. शेती सोबतच दूध व्यवसायात सुद्धा नुकसान होत चाललेला आहे.

बाजारपेठेतील गहु, मका, तूर, सोयाबीन या पूरक पासुखाद्याचे दर गगनाला भिडले आहेत. मका, मकाचूनी हे सुद्धा महागले आहेत. ओल्या व सुक्या वैरणीचा प्रश्नही दिवसेंदिवस कठीण होत चाललेला आहे. मात्र दुधाचा दर वाढत नसल्यामुळे दूध व्यवसाय परवळेनासा झाला आहे. एक गाय किंवा म्हशीला प्रतिदिन जवळपास २५०ते ३०० रुपयांची खीलाई लागते. आणि इतर खर्च वेगळा, मेहनत वेगळी दुधातील फॅटवर म्हशीच्या दुधाला प्रति लिटर चाळीस ते पन्नास रुपये दर मिळतो. तर गाईच्या दुधाला तीस ते चाळीस रुपये दर मिळतो. बाहेर दूध रोजनदारीत विकल्यास दोन्ही दुधाला मात्र तीस ते चाळीस रुपये एवढाच दर मिळत असते. दूध उत्पादकांना सुग्रास, सरकी, ढेप चे पोते १० वर्षांपूर्वी ३५० रुपयाला मिळत होते . आता तेच गत दोन वर्षांत ९०० रुपये वरून १३०० रुपये व आता मात्र चक्क अठराशे रुपये वर पोहोचला आहे. पशुखाद्यत चारशे टक्के दरवाढीच्या तुलनात्मक विचार करता दहा वर्षात गाईच्या दुधाचा दर साडेसहा रुपयावरून ५० रुपये, आणि म्हशीचे दूध ६५ रुपये. दूध उत्पादकांच्या दरात पडायला काही हरकत नव्हती. परंतु सरकारच्या या धोरणामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या मुळावर उठले आहे.

जिल्ह्यात धान, कपाशी, सोयाबीन, व संत्रा यांचा उत्पादन असला तरी त्यातून पाहिजे तेवढा उत्पन्न निघत नसल्यामुळे त्यातून अनेक शेतकरी शेती सोबतच दुग्ध व्यवसाय करतात. मात्र पशुखाद्याच्या वाढत्या दरामुळे दूध व्यवसाय तोट्याचा झाला आहे. असे दुग्ध व्यवसायांचे बोलणे आहे. दुग्ध व्यवसाया बाबत शासनाची उदासीनता यामध्ये कारणीभूत ठरत आहे.दूध व्यवसाय हा ग्रामीण भागाचा आर्थिक कणा ठरला होता. मात्र प्रचंड महागाईने पशुधन सांभाळणे कठीण झाले आहे. दुग्ध व्यवसाय हा तोट्यात चालला असुन हा व्यवसाय बंद करण्याच्या मानसिकतेत दुग्ध व्यवसायिक आले आहेत.

# आरोग्य हेच खरे धन आहे - प्रा. डॉ. जिर्तेंद्र कुमार ठाकूर

### दिन विशेष ७ एप्रिल - विश्व आरोग्य दिवस



**महासागर प्रतिनिधी**

**साकोली ,दि. ०६ :** मानवाने विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आपल्यासाठी सुख-सुविधांचे साधन मोठ्या प्रमाणावर वाढवले आहे. आज आपण सोफ्यावर बसले बसलेच रिमोटच्या सहाय्याने टीव्ही, पंखे, कूलर, एसी इत्यादी सर्व गोष्टी चालू किंवा बंद करू शकतो. संगणक, लॅपटॉप किंवा मोबाईलच्या माध्यमातून आपण घरबसल्या सर्व दैनिक कामे करू शकतो. असे अनेक कामे आहेत ज्या साठी आपण यांत्रिक साधनांवर अवलंबून राहू लागले आहेत. एकतर अनेक आधुनिक सुख-सुविधांमुळे आपल्याला निष्क्रिय आणि आलसी बनवले आहे आणि याचा परिणाम आपल्या आरोग्यावर प्रतिकूलपणे पडत आहे. त्यामुळे आपल्या शरीरातील रोगांशी लढण्याची क्षमता कमी होत आहे आणि त्याच कारणामुळे आपल्याला अनेक रोग आपल्या चपेटेत घेत आहेत.

चांगले आरोग्य हे आपल्याला जीवनातील सर्वांत मोठे खजिना म्हणून मानले जाते. चांगल्या आरोग्याचे महत्त्व आपल्याला ते खराब होऊन गेल्यावरच लक्षात येते. हे खरे आहे की आपल्याला आपले आरोग्य सर्वोच्च राखायला हवे. जर आपले आरोग्य चांगले असेल, तर आपण कोणत्याही आव्हानाचा सामना करू शकतो. जर आरोग्य चांगले नसेल, तर जगातील कोणत्याही संपत्तीने आपल्याला खरी खुशी मिळवता येणार नाही. कोणत्याही व्यक्तीचे चांगले आरोग्य म्हणजे केवळ रोगमुक्त असणे नाही, तर शारीरिक, मानसिक आणि सामाजिक दृष्ट्या संपूर्णपणे आरोग्यपूर्ण असणे आहे. चांगले आरोग्य राखण्यासाठी आपल्याला आपल्या दैनंदिन जीवनात नियमित शारीरिक व्यायाम, योग, ध्यान, संतुलित आहार, व्यक्तिगत स्वच्छता, संतुलित जीवन, झोप आणि आराम यांचे पालन करणे आवश्यक आहे.

तसेच, चांगले विचार, समाजिकतेची भावना, विविध खेळांमध्ये भाग घेणे आणि नेहमी सकारात्मक विचार ठेवणे महत्त्वाचे आहे. तंबाखू, सिगरेट, मद्यपान याचा वापर न करणे आणि मोबाइल, लॅपटॉप, संगणक यांचा वापर आवश्यकता नुसार करणे आवश्यक आहे. आपले वजन नियंत्रणात ठेवणे महत्त्वाचे आहे. यामुळे आपले आरोग्य चांगले राहू शकते. एक आरोग्यपूर्ण नागरिक मजबूत राष्ट्राचा निर्माण करू शकतो. म्हणूनच आपल्याला आपल्या आरोग्याचे विशेष ध्यान ठेवणे आवश्यक आहे.'

# डोंगरदेव ते मांडवी रस्ता तात्काळ दुरुस्त करा

### भाजपा जिल्हा युवा मोर्चांचे जिल्हा उपाध्यक्ष विश्वनाथ बांडेबुचे यांची मागणी



**महासागर प्रतिनिधी**

**मोहाडी ,दि.२० :** तालुक्यातून कोका अभियारण्यातून तिरोडा ते भिलेवाडा जाणारा जी. प्र. क्र. १६ हा मार्ग डोंगरदेव ते मांडवी या गावादरम्यान अतिशय खराब झाला असून जनप्रतिनिधी व अधिकारी यांच्या उदासीन धोरणाने या मार्गावरून ये जा करणाऱ्यांचे मोठे हाल होत असून हा मार्ग त्वरित दुरुस्त करावा , अशी मागणी भाजपा युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष विश्वनाथ बांडेबुचे यांनी केली आहे. मुंबई ते हावडा हायवे क्रमांक ६ पासून सुरू होणारा जिल्हा मुख्य मार्ग क्रमांक १६ हा मांडवी खडकी करडी ते बीरसी (तिरोडा) येथे जाऊन मनसर ते गोंदिया या हायवेस जाऊन हा मार्ग मिळतो हा मार्ग तिरोडा ते भंडारा येथे येण्यासाठी सर्वात कमी अंतराचा मार्ग असल्यामुळे प्रवास करणारे लोक या मार्गास आपली पसंती दाखवितात व या मार्गाने ये जा करतात हा मार्ग कोका अभयारण्यातून ढिवरवाडा ते मांडवी २ की.मी. अंतर जातो कुऱ्हाळ बंदी आल्याने व कोका अभयारण्य घोषित झाल्याने झाडांची कत्तल होणे बंद आहे व हा जंगल दिवसेंदिवस घनदाट होत आहे , या जंगलात वन्यप्राण्यांची मोठी वर्दळ आहे वन्यप्राणी दिवसा ढवळ्या व रात्री मोठ्या प्रमाणात जंगलातून ढिवरवाडा व मांडवी येथील शेत शिवारात चरण्याकरिता व वैनगंगा नदीकडे दिवसाढवळ्या रोड ओलांडून जातात . वन्यप्राण्यांच्या उपद्रवामुळे या दोन्ही गावातील शेतकऱ्यांनी आपली हजारो एकर शेती पडीत ठेवली आहे . हा परिसर नदी काठावर आहे पाण्याची मुबलकता आहे जमीन सुपीक आहे परंतु वन्यप्राण्यांच्या उपद्रवा मुळे शेतकरी आपल्या शेतात पीक घेऊ शकत नाही त्या वन्य प्राण्यांच्या भीतीमुळे रात्री वाहन चालविणारे व्यक्ती थोड्या वेगाने वाहन चालविण्याचा प्रयत्न करतात परंतु खड्डेच एवढे मोठे आहेत की टू व्हीलर किंवा चार चाकी वाहन या मार्गाने दहाच्या स्पीडच्या वर वाहन चालवू शकत नाही हा रस्ता गिट्टी उघडलेला खड्डे पडलेला असल्यामुळे वाहनांची मोठ्या प्रमाणात हानी होत आहे . अनेक वाहने पंचर सुद्धा होतात या मार्गास दुरुस्त करावे म्हणून अनेक वेळा आंदोलन रास्ता रोको निवेदन सर्वच काही करण्यात आले परंतु कुंभकर्णी झोपेत असलेले प्रशासन अजून जागे झाले नाही त्यामुळे हा मार्ग अजूनही नादुरुस्त आहे.

देशाचे बांधकाम मंत्री नितीन गडकरी हे रस्ते बांधकामा साठी प्रसिद्ध आहेत. विकास पुरुष म्हणून त्यांना संबोधले जाते. परंतु या रस्त्यास कुठले ग्रहण लागले आहे माहीत नाही. गडकरी साहेबांचा मानस साखर कारखाना याच मार्गावर येतो त्यांच्या कारखान्यात उस नेणाऱ्या वाहनांना मोठा त्रास सहन करावा लागतो परंतु पाणी कुठे मुरते हे कळेनासे झाले असून गडकरी साहेबांनी याकडे लक्ष देणे गरजेचे वाटते . १० कोटीचा डोंगरदेव ते ढिवरवाडा रस्ता मंजूर झाला असून त्या रस्त्याला वेळोवेळी निधी प्राप्त होत नसल्याने त्या रस्त्याचे काम कासव गतीने सुरू आहे. परंतु जंगलातून जाणारा रस्ता अजून मंजूर झाला नसून हा रस्ता तात्काळ मंजूर करावा तसेच सुरू असलेले काम वेगाने सुरू व्हावे व शासनाने त्यास निधी वेळोवेळी प्राप्त करून द्यावा व लोकांना होणाऱ्या शारीरिक व मानसिक त्रासापासून मुक्ती द्यावी , अशी मागणी भाजपा जिल्हा युवा मोर्चांचे जिल्हा उपाध्यक्ष विश्वनाथ बांडेबुचे यांनी केली आहे.

# सिंदपुरी येथे विष्णू मंदिरात तुकाराम बीज सोहळा




**महासागर प्रतिनिधी**

**सिहोरा :** तुमसर तालुक्यातील सिंदपुरी येथील विष्णू मंदिरात ब्रह्मनिष्ठ सदगुरु आप्पानंदजी महाराज पुण्यतिथी सोहळा, तुकाराम बीज सोहळयाचे औचित्य साधून हरिनाम सप्ताहाचे पहिल्याच दिवशी भक्तांची मांदियाळी दिसून आली.

दररोज सायंकाळी सामूहिक हरिपाठ करण्यात येते. तर ७:०० वाजेपासून ह. भ. प. गीतांजली ताई यांचे कीर्तन झाले. यानिमित्त रवीवारी सायंकाळी विशेष पूजा व हरिपाठाचे आयोजन करण्यात आले होते.

संत तुकाराम महाराजांनी माणसाचे जगणे, वागणे, स्वभाव वृत्ती, खरे-खोटेपणा यांवर सडेतोड विचार त्यांच्या लेखणीतून मांडले. आज ज्या पर्यावरणाविषयी जागृत राहण्याचा संदेश आपल्याला दिला जातो, तो संदेश त्यांनी ५०० वर्षांपूर्वी आपल्या अभंगवाणीतून दिला आहे, असे ह. भ. प. गीतांजली ताई यांनी आपल्या कीर्तनातून सांगितले. तर ह. भ. प. मंगलाताई यांचे जाहीर कीर्तनातून संत तुकाराम महाराज यांच्या जीवनचरित्रावर सखोल विवेचन केले.

त्यांनी संत तुकाराम महाराजांचे विचार, त्यांची अभंगरचना आणि त्यांच्या समाजप्रबोधन कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी श्रीमती राधाताई बोरकर, प्रवचनकार गीताताई सहारे, महादेव नंदरधने (गुरुजी), ताराचंद कटनकार, शालिकराम नंदरधने, माजी सरपंच नेजनबाई गायधने, निरंजना कटणकार, ईश्वरचंद गिरडकर, मोहने महाराज, दसाराम निकुळे, पुष्पलता सिंगणजुळे, सहादेव निकुळे, रामचंद्र कटनकार, सुनीताबाई बोरकर, बायाबाई मोरे, मानिकाबाई टेकाम, पुष्पा मोरे, बेबीबाई गाढवे, फुलनबाई चौरीवार, मनोहर रोखडे, भरत उताणे, दिलीप निकुडे, सूर्यभान चौधरी, राजू मोहने व अन्य महिला भक्तगणात हरिनाम सप्ताह च्या पहिल्याच दिवशी उपस्थितीत उत्सुकता मोठ्याने दिसून आली होती.

# नवनित विद्यालयात राणी अवंतीबाई बलिदान दिवस



**महासागर प्रतिनिधी**

**जवाहरनगर :** २० मार्च २०२५ ला सन १८५७ च्या भारतीय संग्रामातील अमर शहिद वीरांगना राणी अवंतीबाई यांचा १६७ वा बलिदान दिवसाचा कार्यक्रम नवनित माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय खमारी (बुज.) येथे घेण्यात आला. सर्वप्रथम शाळा मुख्याध्यापक नरेंद्र गणविर यांच्या हस्ते वीरांगना राणी अवंतीबाई लोधी यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून दिप प्रज्वलित करण्यात आली. यावेळी सर्व उपस्थितांनी विनम्र अभिवादन करून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. भारतात देश, राज्य, धर्म, संस्कृतीच्या रक्षणासाठी पुरूषांच्या बरोबर स्त्रियांनीही जिवाचे बलिदान दिले आहे. राणी अवंतीबाईने इंग्रजाविरूद्ध युद्ध करतांना, मातृभूमीच्या रक्षणार्थ प्राणाचे बलिदान दिले.

रामगढची राणी अवंतीबाईने गोंडवनाची राणी दुर्गावती, झॉंसीची राणी लक्ष्मीबाई यांचे अनुकरण केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक नरेंद्र गणविर, संस्था सचिव हिरालाल गजभिये, प्रा. अरुण कांबळे, प्रा. नानाजी गजभिये, निर्मला रंगारी, सुमिता गजभिये, अशोक गजभिये, अनिरुद्ध गजभिये, संजीव मेश्राम तसेच कार्यक्रमास विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सुमिता गजभिये यांनी केले.

# साकोलीत जिओ इंटरनेट सेवा समस्यांच्या विळख्यात

### *वापर करते त्रस्त झाले असून ऑपरेटर बदलविण्याच्या तयारीत * जीवो ला होवू शकतो मोठा नुकसान

**शाहेद कुरेशी**

**साकोली ,दि. ०६ :** जगातील सर्वांत मोठी व तिसऱ्या क्रमांकाची इंटरनेट सेवा देणारी जिओ इंटरनेट सेवा देणारी कंपनी सध्या मागील काही दिवसापासून साकोली मध्ये इंटरनेट सेवा देण्यास असमर्थ असल्यामुळे वापर करते त्रस्त झाले असून वारंवार तक्रार करूनही जिओ कंपनीच्या मार्फत कोणतेही समाधान मिळालेले नसल्यामुळे शेवटी साकोली तालुक्यातील ग्राहक मोबाईल इंटरनेट ऑपरेटर बदलण्याच्या तयारीत आहेत.

जगातील तिसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी मोबाईल इंटरनेट सेवा देणारी कंपनी जिओ ही भारतीय कंपनी असून या कंपनीच्या हाय स्पीड इंटरनेट मुळे ही कंपनी जगात तिसऱ्या क्रमांकावर असून तालुक्यात साकोली तालुक्यात सुद्धा या कंपनीचे सर्वांत जास्त वापर करते असून मागील काही दिवसापासून जिओ ची इंटरनेट सेवा कोलमडली असून व्हिडिओ , फेसबुक , व्हाट्सअप , गुगल फीड, व वर्क फ्रॉम होम करणारे व्यक्ती जिओच्या कोलमडलेल्या व्यवस्थेमुळे त्रस्त झाले असून बऱ्याच लोकांनी आपला इंटरनेट ऑपरेटर बदलविण्याकरिता जिओ कडे तक्रार सुद्धा केली असून जिओच्या कर्मचाऱ्यांकडून फक्त आम्हाला खेद आहे तुमची समस्या लवकरच सोडविली जाईल फक्त एवढेच आश्वासन देऊन वेळ मारून नेत आहे त्यामुळे आज इंटरनेट सेवा सर्वांसाठी ज्याप्रमाणे अन्न , वस्त्र , निवारा आवश्यक गरज आहे त्याच प्रकारे आता चौथी गरज मोबाईल नेटवर्कची आहे परंतु जिओ कंपनीचे वरिष्ठ अधिकारी साकोलीकरांच्या समस्या कडे दुर्लक्ष करीत असल्यामुळे जर जिओने आपली सेवा सुधारली नाही तर लवकरच जिओ या सर्वांत मोठ्या मोबाईल इंटरनेट कंपनीला साकोली तालुक्यात मोठा नुकसान सहन करावा लागेल अशी चर्चा जिओचे वापर करते करीत आहेत व लवकरात आपण सुद्धा आपला मोबाईल ऑपरेटर कंपनी बदलविण्यासंदर्भात विचार करीत आहेत



***साकोली येथील जिओचे टावर मुख्य समस्येचे केंद्र***

साकोली येथील मोदी पेट्रोल पंप येथे जिओ कंपनीचे टावर असून ही कंपनी पूर्वी रिलायन्स नावाने होती परंतु नंतर रिलायन्स ही कंपनी जिओ ने टेक ओव्हर केल्यामुळे रिलायन्स कंपनीच्या टावर वर जिओचे टावर सुरू झाले परंतु रिलायन्स कंपनी व जिओने केलेल्या या टॉवरच्या करारनामा दोन वर्षांपूर्वीच संपलेला असून जागा मालकांनी संबंधित कंपनीला बऱ्याचदा इथून टावर हलविण्या संबंधात अर्ज दिले आहे परंतु करारनामा संपून सुद्धा रिलायन्स कंपनी जागा मालक यांना प्रतिसाद देत नाही बऱ्याचदा टॉवरमध्ये बिघाड झाल्यास जिओ कंपनीचे कर्मचारी देखभाल व दुरुस्ती करिता टावरवर चढण्याकरिता गेल्यास जागेचे मालक हे त्यांना टावर वर चढू देत नाही त्यामुळे जागामालक व टावर कंपनीमध्ये वाद निर्माण झाला असून याच वादामुळे साकोलीकरांना नेहमी जिओ इंटरनेट नेटवर्क समस्येच्या सामना करावा लागतो व त्यामुळे सामान्य नागरिकांचे अति महत्त्वाचे कामकाज देखील यामुळे प्रभावित होत असल्यामुळे ग्राहकांनी जिओच्या ग्राहकांनी मागणी केली आहे की जिओ कंपनीने एक तर टावर दुसऱ्या ठिकाणी उभारावे किंवा जागा मालकासोबत बसून वाद मिटविण्यात यावे जर जिओ कंपनीने लवकरात लवकर या समस्येचे समाधान नाही केले तर साकोली तालुक्यात जिओ कंपनीला मोठ्या प्रमाणावर नुकसान होऊ शकतो व वापर करते दुसऱ्या इंटरनेट सेवेकडे वळू शकतात .

मागील बऱ्याच दिवसापासून साकोली तालुक्यात जिओची इंटरनेट सेवा कोलमडलेली असून जिओ इंटरनेट सेवा देण्यास असमर्थ असल्याचे दिसून येत आहे. या कंपनीकडे वारंवार तक्रार करून सुद्धा कंपनीचे कर्मचारी फक्त वेळ मारून नेत आहेत परंतु ग्राहकांचे समाधान करू शकत नाही त्यामुळे जिओ इंटरनेट सेवा वापरणाऱ्या ग्राहकांनी बीएसएनएल या सरकारी कंपन्याची इंटरनेट सेवा वापरावी यामुळे खाजगी कंपन्यांची मोनोपली संपेल व शासकीय कंपन्यांच्या लाभ होईल.



**विनायक देशमुख.**
**सामाजिक कार्यकर्ते**
**व कंत्राटदार साकोली**

# दुषित पाण्यामुळे मोहगाव वासियांचे आरोग्य धोक्यात

### गावकऱ्यांची गटविकास अधिकाऱ्यांकडे तक्रार

**महासागर प्रतिनिधी**

**सिहोरा :** तुमसर तालुक्यातील मोहगाव (खदान) येथे सार्वजनिक विहिरीजवळ अवैधरित्या गोठा तयार करून त्यात पाळीव जनावरे बांधली जातात. परिणामी पाळीव जनावरांचे मलमूत्र विहिरीच्या पाण्यात शोषित होत असल्याने विहिरीच्या दुषित पाण्यामुळे मोहगाववासियांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

यामुळे ग्रामस्थांनी याबाबत पंचायत समिती, गटविकास अधिकाऱ्यांकडे तक्रार केली आहे.

मोहगाव (खदान) येथील राजेंद्र कटरे नामक पशुपालक यांनी डॉ. रविंद्र पटले यांच्या घरासमोरील सार्वजनिक विहिरीजवळ गोठा तयार केला. त्यात आपली पाळीव जनावरे बांधले जात आहे. पाळीव जनावरांचे मलमूत्र विहिरीच्या पाण्यात शोषित होत आहे. त्यामुळे गावातील त्या विहिरीचे पाणी वापर करणाऱ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. पंचायत समितीतुमसर येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे गांभिर्याने लक्ष देऊन सार्वजनिक विहिरीजवळील जनावरांचा गोठा दूर करावा, जेणेकरुन विहिरीतील पाणी दुषित होऊन याचा फटका ग्रामस्थांच्या आरोग्यावर होणार नाही, अशा मागणीचे निवेदन गटविकास अधिकाऱ्यांना देण्यात आला. तक्रारीमध्ये शिवदास सोनवाने, बाबुलाल रहांगडाले, संतोष सोनवाने, गायत्री सोनवाने, रंजीत राऊत, मदन कुंभरे, मनोहर मेश्राम, अनिल मेश्राम, आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत. तरी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तक्रारीची गांभीर्य लक्षात घेऊन तात्काळ कारवाई करण्यात यावी.

RNI No.- MAHAMAR-2010/35801 महासागर भंडारा **मालक, मुद्रक, प्रकाशक** -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर -१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, गांधी चौक समोर, भंडारा येथे प्रकाशित केले. **संपादक**- श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन - ०७१२-२७६७६२८- ९३७३११७०४२ * स्थानिक संपादक-**सुरेश लक्ष्मण कोटगले,** फोन -८७९३१९१२१३ * (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहील.)

# कॅलिडोस्कोप

## लडाखमधील 'ॲस्ट्रो व्हिलेज'

लडाखमध्ये अनोखं 'ॲस्ट्रो व्हिलेज' आहे. या गावात पाच 'होम स्टे' आहेत. आसपासच्या पंधरा गावांमधल्या ३० महिलांनी या 'ॲस्ट्रो व्हिलेज'ची जबाबदारी स्वीकारली आहे. लडाख समुद्रसपाटीपासून बरंच उंचावर आहे. त्यातच वातावरण कोरडं असल्यामुळे इथे अगदी निवांत आकाशनिरिक्षण करता येतं. म्हणूनच ॲस्ट्रो व्हिलेजसाठी लडाखची निवड करण्यात आली. लडाखमध्ये मोठ्या प्रमाणावर पर्यटक येतात. पण या ॲस्ट्रो व्हिलेजमुळे त्यांच्या संख्येत वाढ होते आहे. इथल्या निरभ्र आकाशाचा अर्थार्जनासाठी वापर करण्याची



कल्पना 'ग्लोबल हिमालयन एक्सपिडिशन' या संस्थेच्या कार्यकर्त्यांना सुचली आणि त्यांनी इथल्या स्थानिकांना हा मार्ग दाखवला. या संस्थेने 'इंटरनॅशनल ॲस्ट्रॉनॉमिकल युनियन'सोबत या प्रकल्पावर काम सुरू केलं. 'ॲस्ट्रॉनॉमी फॉर हिमालयन लाईव्हलीहूड' असं या उपक्रमाचं नाव आहे. या उपक्रमाची लोकप्रियता वाढते आहे. मोठ्या संख्येने पर्यटक इथे येऊ लागले आहेत. लडाखच्या निरभ्र वातावरणात आकाशनिरिक्षण करण्याचा आनंद अनोखाच म्हटला पाहिजे.

## भलामोठा शब्द



इंग्रजी ही गंमतीशीर भाषा आहे. या भाषेतल्या शब्दांच्या स्पेलिंगमधल्या काही अक्षरांचे उच्चारच होत नाही तर काही वेळा नसलेल्या शब्दाचा उच्चार करावा लागतो. अनेकदा स्पेलिंग वेगळं आणि उच्चार काहीतरी वेगळाच अशीही परिस्थिती असते. इंग्रजीतल्या भलंमोठं स्पेलिंग असणाऱ्या शब्दाचा उच्चार करताना आपली भंबेरी उडते. अशावेळी इंग्रजीतल्या एका भल्यामोठ्या शब्दाचा उच्चार करणं जगातलं सर्वात कठीण काम असेल.

इंग्रजीतला सर्वात मोठा शब्द कोणता, असा प्रश्न तुम्हाला कधी पडला आहे का? या भाषेतल्या सर्वात मोठ्या शब्दात तब्बल १,८९,८१९ अक्षरं आहेत. त्यामुळे या शब्दाचा योग्य उच्चार करायला तुम्हाला साडेतीन तास लागतील. हा शब्द माणसाच्या शरीरात सापडणाऱ्या 'टिटिन' नामक प्रथिनाचं रासायनिक नाव आहे. शास्त्रज्ञांच्या मते, मानवी शरीरात २० लाखांहून अधिक प्रथिनं आहेत. ही प्रथिनं अमिनो ॲसिडपासून तयार झाली आहेत. मानवी शरीरातलं 'टिटिन' हे आत्तापर्यंतचं ज्ञात असणारं सर्वात मोठं प्रथिन आहे. यात २६ हजारांपेक्षा अधिक अमिनो ॲसिड्स आहेत.

काही वर्षांपूर्वीपर्यंत इंग्रजी शब्दकोशात टिटिनचं रासायनिक नावही छापलं जात होतं. पण नंतर ते काढून टाकण्यात आलं. आता हे प्रथिन 'टिटिन' याच नावाने ओळखलं जातं.

## मुलींना राहायचेय अविवाहित



भारतात लग्न हा जीवनातील महत्त्वाचा भाग मानला जातो. लग्न झाले नाही तर त्याला अथवा तिला समाजाकडून टोमणे ऐकावे लागतात. पण आजकाल मुलींना एकवेळ टोमणे ऐकणे मान्य आहे, मात्र लग्न करणे त्यांना मान्य नाही. आजकाल महिलांचा विवाहाबाबत भ्रमनिरास होत आहे. त्यातूनच 'बॅचलर', 'सोलोगॅमी', 'सिंगलहूड' असे शब्द ट्रेंड होत आहेत. आता तरुण पिढीला लग्नाचे बंधन वाटू लागले आहे. त्यातूनच मुलींमध्ये लग्नास नकार देण्याचा ट्रेंड झपाट्याने वाढत आहे.

तरुणांची ही विचारसरणी पालकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. काही काळापूर्वी लग्नासंदर्भात एक सर्वेक्षण करण्यात आले. त्यात सांगण्यात आले होते की, देशातील ८१ टक्के महिला लग्नाशिवाय खूप आनंदी आहेत. लग्नाबाबत विचारले असता महिलांनी सांगितले की, त्यांना लग्नाशिवाय जगणे आवडते. त्यांना लग्न कधी करायचे आहे, असे विचारले असता ३९ टक्के महिलांनी कधीच नाही, असे उत्तर दिले तर लग्नाच्या हंगामात आपल्यावर दडपण येत असल्याचे काहींनी स्पष्ट केले.

पालकांचा दबाव

लग्नाचा मोसम असताना पालकांना आपल्या वयात आलेल्या अपत्याचे लग्न कधी होणार, असा प्रश्न सतावत असतो. यातूनच विशेषत: मुलींवर लग्नासाठी दडपण येत असल्याचे चित्र दरवर्षी पाहायला मिळते. पालकही मुलांवर दबाव आणतात. यामुळेच अनेक मुलींना त्यांच्या संमतीशिवायही लग्न करावे लागते. त्यामुळेच लग्न हे बंधन आहे असे काहींना वाटते. एके काळी जोडपी सात जन्म एकत्र राहण्याची शपथ घेत असत. पण आता लोकांना लग्नाची सात वर्षे पूर्ण करणेही कठीण जाताना दिसते.

नोकरी टिकवण्यासाठी नको लग्न

सर्वेक्षणानुसार, सुमारे ३३ टक्के लोकांवर लग्नानंतर दीर्घकाळ नातेसंबंधात राहण्याचा दबाव असल्याचे दिसते. खरंतर लग्नानंतर मुलं-मुली आयुष्यभर एकत्र राहतात असं लोकांना वाटतं. मात्र सध्या हे वास्तव राहिलेले नाही. महिलांना लग्न करायचे नसते कारण काही कुटुंबातील सदस्य त्यांना लग्नानंतर नोकरी सोडण्यास सांगतात. महिलांना आयुष्यभर स्वत:च्या पायावर उभे राहायचे असते. त्यांना कोणावरही अवलंबून राहायचे नसते. या कारणाने आजच्या तरुणी लग्न करण्यास नाखूष दिसतात.

किती टक्के महिलांना लग्न करायचे नाही?

एका सर्वेक्षणात भारतातील ८१ टक्के महिलांनी आपल्याला लग्न न करण्यात आणि एकटे राहण्यात खूप आनंदी वाटते असे सांगितले आहे तर ६२ टक्के महिलांनी, त्या गरजा आणि प्राधान्यांशी तडजोड करू शकत नसल्याचे स्पष्ट केले आहे. ८३ टक्के मुलींना विश्वास आहे की, चांगला जीवनसाथी मिळेपर्यंत त्या लग्न करणार नाहीत.

## विमानातील विशेष



विमानात बसल्यावर तुम्हाला बऱ्याच सूचना दिल्या जातात. त्यात ऑक्सिजन मास्कचीही सूचना असते. विमानातल्या प्रवाशांना खाद्यपदार्थही दिले जातात. विमानात बसल्यानंतर मोबाईल फोन फ्लाईट मोडवर टाकण्याच्या सूचना दिल्या जातात. मात्र हे सगळं का बरं केलं जात असावं, हा विचार कधी मनाला शिवला आहे का? विमानाशी संबंधित बऱ्याच रंजक बाबी आहेत. चला तर मग याविषयी जाणून घेऊ.

* विमानातला हवेचा दाब कमी झाला तर ऑक्सिजन मास्क खाली येईल. हा मास्क नाकावर लावून श्वास घ्यावा, असा संदेश हवाई सुंदरी देते. पण प्रत्यक्षात या मास्कच्या आधारे माणूस फक्त पंधरा मिनिटं जिवंत राहू शकतो.

* १९५३ पर्यंत विमानाच्या खिडक्या चौकोनी असायच्या. मात्र एका अपघातानंतर त्यांचा आकार बदलून गोल करण्यात आला. कारण खिडक्यांचे गोल कोपरे हवेला फार प्रतिरोध करत नाहीत आणि यामुळे विमानावर फार दबाव येत नाही.

* वैमानिक आणि सहवैमानिकाला नेहमीच वेगळं अन्न दिलं जातं. एकच अन्न खाऊन दोघेही एकाचवेळी आजारी पडू नयेत हा यामागचा उद्देश असतो. दोन्ही वैमानिक एकाच वेळी आजारी पडले तर प्रवाश्यांचा जीव धोक्यात येण्याची शक्यता असल्याने ही खबरदारी घेतली जाते.

## गुजराथी लोक जास्त कामसू



भारतीयांच्या कामाच्या सवयींवर बरीच चर्चा होत असते. आपण जास्त काम करतो की कमी? काही लोकांचा विश्वास आहे, की जास्त वेळ काम केल्याने उत्पादकता वाढते तर काहींचे म्हणणे आहे की कठोर परिश्रमापेक्षा स्मार्ट काम करणे महत्त्वाचे आहे.

मात्र एका अहवालात काही धक्कादायक गौप्यस्फोट झाले आहेत. यावरून गुजरातची जनता दीर्घकाळ काम करण्यात आघाडीवर असल्याचे दिसून आले आहे. त्याच वेळी, गोव्याचे लोक सर्वात कमी काम करतात; परंतु तरीही त्यांचे आर्थिक उत्पादन अधिक आहे.

कोणत्या राज्यात सर्वाधिक काम?

एका अभ्यासानुसार, गुजरातमधील ७.२ टक्के कर्मचारी आठवड्यातून ७० तासांपेक्षा जास्त काम करतात. हा आकडा देशात सर्वाधिक आहे. पंजाब, महाराष्ट्र आणि पश्चिम बंगालही त्याच्या जवळ आहेत. दुसरीकडे, बिहारमध्ये जास्त वेळ काम करणाऱ्यांची संख्या सर्वात कमी आहे. बिहारमध्ये केवळ १.१ टक्के कर्मचारी आठवड्याला ७० तास काम करतात. पंजाबमध्ये ७.१ टक्के, महाराष्ट्रात ६.६ टक्के, पश्चिम बंगालमध्ये ६.२ टक्के आणि केरळमध्ये ६.२ टक्के कर्मचारी आठवड्याभरात ७० टक्के काम करतात. पण रोजच्या सरासरी कामाच्या तासांचा विचार केला तर दिल्लीकर आघाडीवर आहेत. दिल्लीत लोक ८.३ तास काम करतात तर गोव्यात हेच प्रमाण फक्त ५.५ तास आहे. ईशान्य भारतातील बहुतेक राज्यांमध्ये दिवसातून सहा तासांपेक्षा कमी काम होते.

शहरी लोकांचे कामाचे तास जास्त

खेड्यापाड्यात राहणाऱ्या भारतीयांपेक्षा शहरात राहणारे भारतीय जास्त वेळ काम करतात, असेही या अभ्यासातून समोर आले आहे. शहरांमध्ये कामाची सरासरी ७.८ तास आहे तर खेड्यांमध्ये हा आकडा साडेसहा तास आहे. राजस्थान (८.६ तास), उत्तराखंड (८.३ तास) आणि गुजरात (८.३ तास) या शहरी कुटुंबांमध्ये सर्वाधिक काम केले जाते. मेघालय (६.३ तास), मणिपूर (६.१ तास) आणि गोवा (५.९ तास) या राज्यांमध्ये सर्वात कमी काम केले जाते. ग्रामीण भारतात उत्तराखंड (७.७ तास), पंजाब (७.३ तास) आणि झारखंड (७.२ तास) हे सर्वाधिक काम करतात. आसाम, नागालँड आणि गोव्यात कामाचे तास कमी असतात.

कोण जास्त काम करते?

पुरुष आणि महिलांमध्ये कामाच्या तासांमध्ये मोठा फरक असल्याचेही या अभ्यासातून समोर आले आहे. पुरुष पगारी कामांवर जास्त वेळ घालवतात तर विशेषत: खेड्यापाड्यातील स्त्रिया पैशांशिवाय घरातील कामांचा भार अधिक उचलतात. शहरी भागात पुरुष ८.२ तास तर महिला ६.२ तास काम करतात. ग्रामीण भागात पुरुष ७.३ तास आणि महिला ५.६ तास काम करतात.



## लेंग्यामुळे थांबली 'वंदे भारत'

रेल्वे दोन कारणांसाठी थांबते. एकतर स्टेशनवर पोहोचल्यानंतर ती थांबते किंवा काहीवेळा त्यांना पुढील मार्ग उपलब्ध नसल्यामुळे ब्रेक लावावा लागतो. कधी कधी ट्रॅकवर प्राणी आल्याने ट्रेन थांबवावी लागते. पण लेंग्यामुळे देशातील सर्वात वेगवान ट्रेनची चाके थांबल्याचे तुम्ही कधी ऐकले आहे का? होय, हे खरे आहे. उत्तर प्रदेशातील कानपूर येथे देशातील सर्वात वेगवान ट्रेन 'वंदे भारत'ला लेंग्यामुळे वेग कमी करावा लागल्याचे उदाहरण आहे.

हे प्रकरण थोडे विचित्र असले तरी कानपूरमध्ये हे जाणूनबुजून किंवा नकळत झाले आहे. झाले असे की, नवी दिल्लीहून वाराणसीला जाणारी वंदे भारत एक्स्प्रेस क्रमांक २२४३६ कानपूर सेंट्रलवर १०.३० वाजता पोहोचली. काही वेळ स्थानकावर थांबल्यानंतर ट्रेन प्रयागराजकडे रवाना झाली. पण एक किलोमीटर प्रवास केल्यानंतर ट्रेनच्या चालकाला ब्रेक लावावा लागला. फलाटापासून एक किलोमीटर अंतरावर शांतीनगर क्रॉसिंगवर कुठून तरी लेंगा उडत आला आणि 'ओएचई'च्या तारांमध्ये अडकला. मोटारमनने लाईनवर अडकलेल्या कापडाकडे पाहिले असता त्यातून धूर निघत असल्याचे दिसले.

या प्रकरणाचे गांभीर्य समजून चालकाने तातडीने ब्रेक लावत नियंत्रण कक्षाला सदर प्रकरणाची माहिती दिली. आता हे प्रकरण सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. आतापर्यंत ते लाखो लोकांनी पाहिले आहे तर अनेकांनी या प्रकरणावर आश्चर्यही व्यक्त केले आहे. मात्र हा लेंगा कुठून आणि कसा उडत आला हे अद्यापही स्पष्ट झालेले नाही.

## आजीचे मृत्यूपत्र वाचल्यानंतर आश्चर्याचा धक्का

गडगंज संपत्ती असणारे लोक मृत्यूपत्र तयार करतात. त्यांच्या मृत्यूनंतर मृत्यूपत्र वाचलं जातं. गरीब लोक शक्यतो असं काही करत नाहीत कारण त्यांच्याकडे वाटण्यासारखं काही नसतं. पण एका गरीब म्हातारीने तिचं मृत्यूपत्र बनवलं. या महिलेचं घर अगदी पडकं होतं. घराची साफसफाईसुद्धा झालेली नव्हती. पण मृत्यूनंतर तिचं मृत्यूपत्र वाचल्यावर सर्वांनाच धक्का बसला. लोकांना विश्वासच बसेना. लोक चर्चा करायला लागले.

असं काय होतं मृत्यूपत्रात?

हिल्दा लेवी असं या आज्ञीचं नाव. केंटमधील व्हिसिलटेबलमध्ये १९७० मध्ये बांधलेल्या एका साध्या घरात ती राहत होती. वयाच्या ९८ व्या वर्षी तिचा मृत्यू झाला आणि मृत्यूपत्र वाचलं गेलं तेव्हा त्यात १.४ मिलियन पाऊंड म्हणजे जवळपास १६ कोटी रुपयांचा उल्लेख होता. त्यातील साडेपाच कोटी रुपये तिने मित्रांना आणि कँटरबरी रुग्णालयाला दिले होते तर तीन कोटी रुपये लंडनच्या आणखी एका रुग्णालयाला आपल्या मित्राच्या नावे दान केले होते. तिने चॅरिटीमध्ये दिलेल्या पैशाची माहिती ऐकून लोक अधिकच हैराण झाले. महिलेचं घर अत्यंत जीर्ण होतं. ते पाहिल्यावर ती कोट्यधीश असेल असं कुणालाही वाटलं नव्हतं.

कुठून आला एवढा पैसा?



त्यानंतर हिल्दा लेवीकडे एवढा पैसा कुठून आला? याचा शोध घेण्यात आला. तेव्हा अत्यंत महत्त्वाची माहिती मिळाली. १९३०मध्ये ती जर्मनीतून इंग्लंडला निर्वासित म्हणून आली होती. होलोकॉस्टमध्ये तिच्या कुटुंबीयांचा मृत्यू झाला होता. म्हणजेच ती अनाथ होती. मात्र इंग्लंडमधील एलन जेफरी नावाच्या महिलेने तिला दत्तक घेतले होते. पुढे हिल्दाने इंग्लंडमध्ये संपूर्ण आयुष्य घालवलं. पण तिला काकाच्या मालमत्तेचा हिस्सा मिळाला होता. काकांनी त्यांची ३०० कोटीहून अधिक संपत्ती बहीण-भाऊ आणि कुटुंब तसेच दूरच्या नातेवाइकांमध्ये वाटली होती. त्यामुळे हिल्दा यांनाही काकांच्या प्रॉपर्टीतील हिस्सा मिळाला आणि ती मालामाल झाली.

## गावाबाहेर नाही होत लग्नं!

असं म्हणतात की, रक्ताच्या नात्यांपेक्षा मनानं जोडलेली नाती कैक वर्षे टिकतात आणि उत्तरोत्तर दृढही होतात. मात्र भारतात एक असंही गाव आहे जिथं ही नाती लग्नाच्या बंधनानेच दृढ होतात आणि कुटुंबेच्या कुटुंबे जोडली जातात. या गावात लग्नाची एक अशी परंपरा आहे ज्याद्वारे एका विशिष्ट समुदायाची माणसे आपल्याच समुदायात



लग्न करतात आणि आपसूकच मुलींना आपल्याच गावात सासरही मिळून जातं. मध्य प्रदेशातील शहडोल जिल्ह्यातील खन्नाथ नामक गावात ही प्रथा प्रचलित आहे. तिथे सारे जण एकमेकांचे नातलग आहेत. इथं एका व्यक्तीचं किमान तीन गावकऱ्यांशी थेट नातं असतंच. या गावात पटेल बहुल समाज आहे तर गावची लोकसंख्या चार हजारांहून अधिक आहे.

गावाबाहेरची स्थळे नगण्य

इथले रहिवासी गावातल्या गावातच आपल्या मुला-मुलींची लग्न लावून देतात. एका आकडेवारीनुसार, या गावातील जवळपास ५०० लग्न तिथल्या तिथेच पार पडली आहेत. काही स्थळं गावाबाहेरची असली तरीही त्यांची संख्या नगण्य आहे.

जोडीदार निवडा; परंतु गावातील

येथील पटेल समुदायाच्या तरुण-तरुणींना गावातच लग्न करण्याची मुभा असते. तरुण मंडळींनी योग्य जोडीदार निवडून फक्त मोठ्यांना त्याची कल्पना देणं अपेक्षित असतं. त्यानंतर घरातील जाणते विधीवत त्यांचा लग्नसोहळा आयोजित करतात. वर्षभरात या गावात सरासरी चार ते पाच लग्नसोहळे अशाच पद्धतीनं पार पडतात.

गावात हुंडाबंदी

खन्नाथ गावातील समुदायाचा हुंड्याला किंवा लग्नातील आर्थिक देवाणघेवाणीला विरोध असून आतापर्यंतच्या लग्नांमध्ये इथं कधीच हुंडा घेण्यात किंवा देण्यात आलेला नाही. टिळा लावताना शुभशकुनाचे फक्त ५१ रुपये दिले जातात. आश्चर्याची बाब आणि गावकऱ्यांनी केलेल्या दाव्यानुसार आतापर्यंत गावातच झालेल्या अशा लग्नांमध्ये एकही काडीमोड किंवा घटस्फोट झालेला नाही. काही कारणास्तव नातेवाइकांमध्ये मतभेद झाले तर ते संवाद साधून मिटवले जातात; पण इथं नात्यांना तडा जाऊ दिला जात नाही.

## भाजपचे कार्यालय सामाजिक-आर्थिक परिवर्तनाचे केंद्र ठरेल : नितीन गडकरी

# भाजपच्या स्थापनादिनी पक्ष कार्यालयाचे भूमिपूजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :



भाजप हा विचाराधिष्ठित पक्ष आहे. कुण्या एका परिवाराचा पक्ष नाही. असंख्य कार्यकर्त्यांचे बलिदान आणि समर्पणातून आज भाजप हा जगातील सर्वांत मोठा पक्ष ठरलेला आहे. सुशासन आणि विकास हेच आपले उद्दिष्ट आहे. समाजातील शेवटच्या माणसाचे जीवन सुसह्य करण्यासाठी आपण काम करतोय. आज भाजपच्या स्थापना दिनी पक्षाच्या कार्यालयाचे भूमिपूजन झाले. भविष्यात हे कार्यालय सामाजिक-आर्थिक परिवर्तनाचे केंद्र ठरणार आहे, असा विश्वास केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला.

भाजपच्या स्थापनादिनाचे औचित्य साधून गांधीसागर महाल येथे विदर्भ विभाग, नागपूर महानगर व नागपूर ग्रामीणच्या संयुक्त कार्यालयाचा भूमिपूजन सोहळा रविवारी आयोजित करण्यात आला. त्यावेळी नितीन गडकरी बोलत होते. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, नागपूर प्रदेशाध्यक्ष बंटी कुकडे, जिल्हाध्यक्ष सुधाकर कोहळे, ज्येष्ठ कार्यकर्ते आनंदराव ठवरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

नितीन गडकरी म्हणाले, आज कार्यालयाचे भूमिपूजन होत असल्याचा मनापासून आनंद आहे. हे कार्यालय भाजपचे घर आहे. कार्यालय उभारण्यामागचा भाव प्रत्येक कार्यकर्त्याने समजून घेतला पाहिजे. आपला पक्ष आपला परिवार आहे आणि कार्यकर्ता हा या परिवाराचा महत्त्वाचा सदस्य आहे. आपल्या मुलाप्रमाणे कार्यकर्त्यांवर प्रेम करणे आणि त्याला गुणदोषांसह स्वीकारणे अधिक महत्त्वाचे आहे. १९५२ पासून आजपर्यंत प्रतिकुल काळात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या समर्पणामुळे आजचा दिवस उजाडला आहे. याची जाणीव सर्वांनी ठेवली पाहिजे.

१९८० मध्ये भाजपची स्थापना झाली. त्यावेळी देशभर कार्यक्रम झाले. नागपुरात न्यु इंग्लिश हायस्कुलच्या मैगानात शांतीभूषण आणि राम जेठमलानी यांच्या उपस्थितीत हा सोहळा आयोजित करण्यात आला होता, अशी आठवणही नितीन गडकरी यांनी सांगितली.

पक्ष कार्यालय हे आपल्या घराप्रमाणे आहे. अनेकांनी त्यासाठी परीश्रम घेतले आहेत. हे केवळ शहराचेच नव्हे तर जिल्हा आणि विदर्भाचे महत्त्वाचे कार्यालय ठरणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# बंजारा समाजाचा काशी पोहरादेवी येथे श्री रामनवमी सोहळा

## बंजारा समाजाचा शौर्य व त्यागाचा इतिहास : मुख्यमंत्री फडणवीस

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. ६ :



प्रभू श्री रामचंद्राने सर्व घटकांना एकत्र करत समता, एकता, न्यायप्रियता आदी मूल्य व्यवस्था असलेले आदर्श रामराज्य निर्माण केले. संत सेवालाल महाराज यांनी हा आदर्श अनुसरत प्रत्येकात राम जागविण्याचा प्रयत्न केला. बंजारा समाजाचा इतिहास शौर्य, पराक्रम व त्यागाचा आहे.

बंजारा काशी पोहरादेवी या पवित्र स्थळाच्या विकासासाठी राज्य शासनाने नंगारा भवन, संस्कृती परंपरेचे दर्शन घडविणारे संग्रहालय अशी अनेक कामे पूर्ण केली. उर्वरित कामेही लवकरच पूर्ण केली जातील. निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिली.

श्रीराम नवमी सोहळा आणि संत सेवालाल महाराजांच्या जन्मोत्सव सोहळा बंजारा काशी पोहरादेवी येथे झाला. काही तांत्रिक अडचणींमुळे मुख्यमंत्री कार्यक्रमस्थळी पोहोचू शकले नाहीत. त्यामुळे त्यांनी कार्यक्रमाला दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित राहून सर्वांशी संवाद साधला. राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, धर्मगुरू परमपूज्य बाबूसिंग महाराज, उद्योग व सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री इंद्रनील नाईक, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, आमदार सई डहाके, संजय कुटे, राजेश राठोड, तुषार राठोड यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, बंजारा प्राचीन समाज असून, ऋग्वेदातही त्याचा उल्लेख आढळतो. या समाजाचे देशात पुरातन काळापासून व्यापार, वाहतूक क्षेत्र समृद्ध करण्याबरोबरच धार्मिक, सांस्कृतिक क्षेत्रातही मोठे योगदान दिले आहे. समाजाच्या प्रगतीसाठी शासनातर्फे संत सेवालाल महाराज तांडा सुधारणा समिती, तांड्याला ग्रामपंचायतीचा दर्जा यासह अनेक निर्णय, तसेच नवीन योजना व उपक्रम हाती घेतले आहेत. पोहरादेवी या पवित्र स्थळी भाविकांच्या सुविधेसाठी आवश्यक सर्व कामे पूर्ण केली जातील.

मंत्री गिरीश महाजन, राज्यमंत्री नाईक व विविध मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. प्रारंभी जन्मोत्सव व पाळणा कार्यक्रम तसेच आरती झाली. मंत्र्यांनी श्री जगदंबा मातेचे दर्शन घेतले. तसेच संत सेवालाल महाराज यांच्या समाधीस्थळाचे दर्शन घेतले. पोहरादेवी येथील सोहळ्याला मोठा जनसागर उसळला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण झालेले नंगारा संग्रहालय सर्वसामान्य पर्यटकांसाठी कालपासून खुले झाले आहे. ते पाहण्यासाठी भाविकांची गर्दी होत आहे.

# नागपूरमधील मोठ्या सेक्स रॅकेटचा पर्दाफाश

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

**हॉटेलमध्ये सुरू होता वेश्याव्यवसाय**
**पोलिसांच्या कारवाईत दोघांना अटक**
**तरुणींची सुटका**

नागपूरमध्ये एका ओयो हॉटेलमध्ये तरुणींकडून देहव्यवसाय करून घेतला जात असल्याचे समोर आले आहे. या घटनेने नागपूर शहरात एकच खळबळ उडाली आहे. या हॉटेलमध्ये हुक्का सुद्धा ग्राहकांना पुरवला जात असल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांना या संबंधीची माहिती मिळताच या हॉटेलवर पोलिसांनी धाड टाकली. पोलिसांनी काही आरोपींना देखील यावेळी अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नागपूर येथील गिट्टीखदान भागात एका हॉटेलमध्ये तरुणींकडून वेश्याव्यवसाय करून घेतला जात होता. तसेच या हॉटेलमध्ये ग्राहकांना हुक्काची देखील सुविधा पुरवली जात होती. हा प्रकार उघडकीस आल्यावर पोलिसांनी या हॉटेलवर धाड टाकत कारवाई केली आहे. यातून नागपूरमध्ये मोठे सेक्स रॅकेट सुरू असल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी केलेल्या कारवाईत काही तरुणींची सुटका करण्यात आली आहे, तसेच काही आरोपींना अटक देखील करण्यात आली आहे.

नागपूर शहरतील गिट्टीखदान भागात एक ओयो हॉटेल आहे. या हॉटेलमध्ये आर्थिक फायद्यासाठी तरुणींकडून वेश्याव्यवसाय करून घेतला जात होता. पोलिसांना याबाबत माहिती मिळाली असता त्यांनी तातडीने या हॉटेलवर धाड टाकत कारवाई केली. या कारवाईत एकूण दोन आरोपींना नागपूर गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाने अटक केली आहे. कारवाईत दोन आरोपींनी मात्र पळ काढला असून पोलिस त्यांचा शोध घेत आहेत. चेतन आकोले आणि युगांत दुर्गे असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. यावेळी काही तरुणींची देखील सुटका करण्यात आली आहे.

पोलिसांनी एका हॉटेलवर छापा टाकल्यानंतर तेथे चार पीडित मुलींकडून जबरदस्तीने देहविक्रीचा व्यवसाय करून घेतला जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत या चार मुलींची आरोपींच्या ताब्यातून सुटका केली. सदर हॉटेलमध्ये ग्राहकांना हुक्का पिण्यासाठीही पुरवठा केला जात असल्याचे तपासात निष्पन्न झाले. पोलिसांनी घटनास्थळावरून दोन मोबाईल फोन, हुक्का पॉट आणि इतर साहित्य असा एकूण ८६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. दरम्यान, या प्रकरणातील दोन आरोपी पळून गेले असून, पोलिस त्यांचा कसून शोध घेत आहेत. तसेच या रॅकेटमध्ये आणखी कोण-कौन सहभागी आहेत, याचा तपासही पोलिस करत आहेत.

# अपघातग्रस्त कारमध्ये सत्तर लाखांची रोकड

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. ६ :

एप्रिल महिन्यात खामगाव-शेगाव मार्ग चांगलाच चर्चेत आहे. या मार्गावर २ एप्रिलला झालेल्या भीषण अपघातात सहा प्रवाशांचा मृत्यू झाला होता. राज्य परिवहन महामंडळाची बस, खाजगी बस आणि बोलेरो वाहन एकमेकांवर आदळल्याने ही दुर्घटना घडली होती. घटनेला दोन दिवस उलटत नाही तोच या मार्गावर झालेल्या अपघातात एक इसम गंभीर जखमी झाला.

खामगाव-शेगाव मार्गावरील वरील सिद्धिविनायक अभियांत्रिकी महाविद्यालया कॉलेजसमोर ५ एप्रिल रोजी संध्याकाळी कार आणि दुचाकीचा अपघात झाला. त्यामध्ये दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला. संध्याकाळी घटना स्थळ पंचनामा, वाहतूक सुरळीत करणे, रुग्णाला अगोदर खामगाव येथील उप जिल्हा रुग्णालयात व नंतर अकोला येथील शासकीय रुग्णालयात दाखल करणे आदी आवश्यक सोपस्कार पार पडले. नंतर अपघातग्रस्त चारचाकी आणि दुचाकी वाहन शेगाव ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले.

शेगाव तालुक्यातील लासुरा येथील सूरज साहेबराव बोदडे (२५) हे दुचाकी क्रमांक एमएच-३४, एपी-४५११ ने खामगावकडे जात होते. सिद्धिविनायक टेक्निकल कॉलेजच्या जवळ समोरून येणाऱ्या कार क्रमांक एमएच-२१, डीएफ-३४४४ ने त्यांना धडक दिली. या अपघातात ते गंभीर जखमी झाले. त्यांना तत्काळ खामगाव उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी त्यांना अकोला येथील रुग्णालयात पाठविले.

दरम्यान अपघातग्रस्त चारचाकी वाहनाची तपासणी केल्यावर शेगाव ग्रामीण ठाण्याचे अधिकारी, कर्मचारी देखील चक्रावून गेले, कारण कारमध्ये तब्बल ७० लाख ४ हजार ५०० रुपये रोख असलेले दोन पोते आढळले. नोटा मोजण्यासाठी स्टेट बँकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना पाचारण करण्यात आले.

# टेम्पो उलटून एक जण ठार, एक जखमी

■ महासागर प्रतिनिधी, हिंगोली, दि. ६ :

आखाडा बाळापूर ते डोंगरकडा मार्गावर भरधाव टेम्पो उलटून झालेल्या अपघातात क्लिनर ठार तर चालक गंभीर जखमी झाल्याची घटना रविवारी ता. ६ दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास घडली आहे. आखाडा बाळापूर पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार नांदेडकडून एक टेम्पो (क्र.एमएच-२४एयु-८३६०) रेशमी धाग्यांचे बंडल घेऊन विदर्भाकडे निघाला होता. सदर टेम्पोवर चालक म्हणून दामानंद दादाराव रायभोळे (रा. लातूर) हा काम करीत होता. तर त्यांच्या सोबत एक क्लिनर होता. आज दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास टेम्पो आखाडा बाळापूर ते डोंगरकडा मार्गावर भाटेगाव शिवारात आला असतांना त्या ठिकाणी असलेल्या वळणावर चालक दमानंद यांचे वाहनावरील नियंत्रण सुटले अन टेम्पो पलटी झाला. या अपघातात क्लिनरच्या् पोटात लोखंडी रॉड घुसल्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला तर चालक दमानंद गंभीर जखमी झाला.

# एकाच आठवड्यात दुसरी वाघीण जेरबंद

■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. ६ :



शेतकऱ्याचा बळी घेणाऱ्या एका वाघिणीला शुक्रवारी जेरबंद केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी आणखी एका वाघिणीला पिंजऱ्यात कैद करण्यात वन विभागाला यश आले आहे. आंतरजिल्ह्याच्या दाट जंगलातून भरकटून वैनगंगा नदीच्या किनाऱ्यावरील डांभेविरली, टेंभरी, गवराळा आदी गावांच्या शेत क्षेत्रात आलेल्या एका वाघिणीने मागील एक महिन्याच्या कालावधीत पाळीव जनावरांसह काही वन्य प्राण्यांचीही शिकार केली होती. यामुळे परिसरातील शेतकरी, पशुपालक आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते.

शिकार उपलब्ध न झाल्यास माणूस-वन्यजीव संघर्ष होण्याची शक्यता लक्षात घेता वन विभागाकडून गवराळा परिसरात पिंजऱ्यासह मचान उभारून त्या मचाणीला शिकारी बांधून ठेवण्यात आली. ५ एप्रिल रोजी रात्री ७ वाजता गवराळा शेत परिसरात वाघिणीला डार्ट मारून बेशुद्ध करत तिला सुरक्षितरीत्या पिंजऱ्यात कैद करण्यात आले.

प्राप्त माहितीनुसार, एका महिन्यापूर्वी आंतर जिल्ह्याच्या दाट जंगलातून वैनगंगा आणि चूलबंद नद्यांच्या किनाऱ्यावरील चौरस परिसरातील विविध गावांच्या शेतात दोन वेगवेगळ्या वाघिणी आल्या होत्या. यामुळे संपूर्ण भागात नागरिक आणि शेतकऱ्यांमध्ये दहशतीचे वातावरण होते. या दोन वाघिणींपैकी एका वाघिणीने ३० मार्च रोजी खैरी/पट येथील डाकराम देशमुख (४०) या शेतकऱ्याचा बळी घेतला होता. नागरिकांच्या आक्रोशानंतर दोन दिवसांत ती वाघीण पकडून गोरेवाडा प्रकल्पात हलवण्यात आली होती.

मात्र, दुसरी वाघीण वैनगंगा नदीच्या किनाऱ्यावरील गावांमध्ये पाळीव जनावरांची शिकार करत होती. ५ एप्रिल रोजी तिने गवराळा येथे एक शिकार केली. सततच्या शिकारीमुळे परिसरातील नागरिक, शेतकरी आणि पशुपालकांमध्ये मोठ्या प्रमाणावर भीती पसरली होती.

या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या मागणीची दखल घेत उपवन संरक्षक राहुल गवई यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक वनसंरक्षक संजय मेंढे, वनपरिक्षेत्र अधिकारी प्रदीप चन्ने आणि इतर वन कर्मचाऱ्यांच्या नेतृत्वाखाली शार्प शूटरसह पिंजरा, मचान आणि ट्रॅप कॅमेरे लावून वाघिणीस शिकारीचे आमिष देण्यात आले. नियोजितप्रमाणे वाघीण मचान परिसरात शिकारीसाठी आली असता शार्प शूटरने तिला डार्ट मारून बेशुद्ध केले. गेल्या एका महिन्यात या दोन वेगवेगळ्या वाघिणींच्या दहशतीमुळे त्रस्त असलेल्या शेतकरी आणि नागरिकांना आता दिलासा मिळाल्याची चर्चा आहे.

# भाजपच्या माजी नगरसेवकाचे कार्यालय फोडले

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ६ :



अंबरनाथमध्ये भाजपच्या माजी नगरसेवकाचे कार्यालय फोडल्याची धक्कादायक घटना घडली आहे. शनिवारी रात्री काही तलवारधारी अज्ञातांनी ऑफिमध्ये घुसून तोडफोड केली. यावेळी या हल्लेखोरांनी कार्यालयातील कर्मचाऱ्यावरही तलवारीने प्राणघातक हल्ला केला. सदरची घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे. या हल्ल्यामागचे कारण अद्याप समजू शकले नाही. मात्र, हा हल्ला कोणत्यातरी गंभीर कारणावरून केला असावा, अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे. पोलिसांकडून या घटनेचा तपास सुरू आहे.

भाजपचे माजी नगरसेवक रोहित राजू महाडिक यांचे अंबरनाथ पूर्वेच्या बी केबिन रोडवरील स्वानंद शॉपिंग कॉम्प्लेक्स शेजारी कार्यालय आहे. या कार्यालयात शनिवारी रात्री पावणे अकराच्या सुमारास अचानक १० ते १२ जणांचे टोळके तोंडाला रुमाल बांधून आणि हातात तलवारी घेऊन दाखल झाले. त्यांनी ऑफिसच्या काचा फोडल्या. तसेच ऑफिसमधील खुर्च्यांचीही तोडफोड केली. यामध्ये ऑफिसचे मोठे नुकसान झाले आहे.

हल्लेखोरांनी ऑफिसमध्ये काम करणाऱ्या एका कर्मचाऱ्यावर देखील तलवारीने हल्ला केला. कर्मचाऱ्याने आपला जीव वाचवण्यासाठी खुर्च्यांचा आधार घेतला होता. तेव्हा हल्लेखोरांनी खुर्च्यांवर वार करत त्यांचे नुकसान केले. सुदैवाने कर्मचाऱ्याला मोठी दुखापत झाली नाही.

ही संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाली. हल्लेखोरांनी अवघ्या २३ सेकंदात हल्ला चढवून ऑफिसचे मोठे नुकसान केले. यानंतर हे हल्लेखोर तिथून पसार झाले. पण हे हल्लेखोर नेमके कोण होते आणि त्यांना हल्ला का केला? याबाबतची माहिती समोर आलेली नाही. याप्रकरणी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला "स्कॉच पुरस्कार- २०२५" प्रदान

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ६ :



महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला (एमएसआरडीसी) हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या यशस्वी उभारणीसाठी प्रतिष्ठेचा "स्कॉच पुरस्कार- २०२५" प्रदान करण्यात आला आहे. एमएसआरडीसीचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. अनिलकुमार गायकवाड यांना नवी दिल्लीतील इंडिया हॅबिटेट सेंटर येथे नुकत्याच पार पडलेल्या १०० व्या स्कॉच समिटमध्ये प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्राच्या वाहतूक व्यवस्थेचा चेहरा मोहरा बदलणारा पथदर्शी प्रकल्प म्हणून समृद्धी महामार्गाकडे पाहिले जाते. यामुळे,आज महाराष्ट्रातील दळणवळण व्यवस्थेला एका नवा आयाम प्राप्त झाला आहे. या पुरस्कार सोहळ्यात डॉ. अनिलकुमार गायकवाड यांनी उपस्थितांना संबोधित करताना समृद्धी महामार्गाच्या उभारणीचा प्रवास उलगडला.

महाराष्ट्र समृद्धी महामार्गासाठी मिळालेला स्कॉच पुरस्कार म्हणजे एमएसआरडीसीच्या सर्व सहकाऱ्यांचे कामाप्रती समर्पण आणि मेहनतीचा सन्मान आहे. अनेक आव्हानांवर मात करून आम्ही राज्यातील सर्वात लांब एक्सप्रेसवे विक्रमी वेळेत पूर्ण केला. हा यशस्वी प्रकल्प आम्हाला भविष्यातही महाराष्ट्रासाठी जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यास प्रेरित करत राहील, असा आशावाद डॉ.गायकवाड यांनी व्यक्त केला.

हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग हा उच्च-गतीचा ग्रीनफील्ड एक्सप्रेस वे आहे. जो महाराष्ट्रातील १० जिल्ह्यांतील २६ तालुक्यांमधील ३९२ गावांना थेट जोडतो. या महामार्गामुळे नागपूर-मुंबई प्रवासाचा कालावधी १६-१८ तासांवरून अवघ्या ७-८ तासांवर आला आहे. याशिवाय, हा महामार्ग विदर्भ आणि मराठवाडा प्रदेशांतील कृषी आणि औद्योगिक विकासास चालना देत असून, राज्याच्या अर्थव्यवस्थेला गती देत असल्याचेही डॉ.गायकवाड यांनी यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना सांगितले.

२००३ मध्ये स्थापन झालेला स्कॉच पुरस्कार हा प्रशासन, समावेशक विकास, तंत्रज्ञान उत्कृष्टता, कॉर्पोरेट नेतृत्व, नागरिक सेवा वितरण या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या संस्थांना आणि व्यक्तींना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. भारताला अधिक प्रगत आणि विकसित राष्ट्र बनविण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या व्यक्ती, प्रकल्प आणि संस्थांना हा पुरस्कार दिला जातो.

# राम नवमीनिमित्त लाखावर भाविकांची मांदियाळी

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. ६ :

संत गजानन महाराज संस्थानच्या मुख्य उत्सवापैकी एक असलेल्या श्रीरामनवमी निमित्त रविवारी विदर्भ पंढरी शेगावात लाखावार भाविकांची मांदियाळी जमली आहे. विदर्भासह राज्यभरातील कमी अधिक पायदळ दिंड्या देखील शनिवारी रात्री पर्यंत डेरे दाखल झाल्या आहे. गजानन महाराज समाधी स्थळी नतमस्तक होण्यासाठी हजारो आबालवृद्ध भाविकांच्या रांगा लागल्या. जय श्रीराम आणि गण गण गणात बोते च्या जयघोषाने आसमन्त दुमुमला असून संपूर्ण मार्ग भाविकानी फुलून गेले आहेत.

संत नगरी शेगाव येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही १३१ वा श्रीराम नवमी उत्सव सोहळा रविवार ६ एप्रिल रोजी भक्तिमय व मंगलमय वातावरणात साजरा होत आहे. या सोहळ्यासाठी संत नगरी नटल्याचे दिसून आले. श्री संत गजानन महाराज संस्थान मध्ये होणाऱ्या श्रीराम जन्मोत्सवानिमित्त श्रींच्या मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली असून मंदिर परिसर केळीचे खांब, आंब्याची तोरणे, भगव्या पताका आणि ध्वजानी शुशोभीत करण्यात आला आहे.श्रीराम जन्मोत्सवाच्या पूर्वसंध्येला राज्यभरातून श्रीराम नवमी उत्सवासाठी ६५० च्या आसपास भजनी दिंड्या संतनगरीत दाखल झाल्या होत्या. भजनी दिंड्या येण्याचा ओघ संतनगरीत आज रविवारी, ६ एप्रिलला देखील सुरूच होता. हरे रामा हरे रामा रामा हरे हरे,हरे कृष्णा हरे कृष्णा कृष्णा हरे हरे श्रीराम जय राम जय जय राम, जय गजानन श्री गजानन, गण गण गणात बोते मंत्राचा नाम घोष करीत भजनी दिंड्या टाळ मृदंगाच्या निनादात संतनगरीत दाखल झाल्या. यापूर्वी श्रींच्या मंदिरात १३१ वा श्रीराम नवमी उत्सवाला गुढीपाडवा ३० मार्च रविवार पासून प्रारंभ झाला. त्या अनुषंगाने श्रींच्या मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले . यामध्ये दररोज मंदिरामध्ये काकडा भजन दुपारी प्रवचन सायंकाळी हरिपाठ व रात्री महाराष्ट्रातील नामवंत महाराजांचे कीर्तन आदि विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

# गोरेगाव येथे लग्न सोहळ्याच्या जेवणातून ६० पाहुण्यांना विषबाधा

■ महासागर प्रतिनिधी
गोंदिया, दि. ६ :



गोंदिया जिल्ह्यातील गोरेगाव तालुक्यात बबई या गावी लग्न सोहळ्यातील जेवणातून लग्नातील सुमारे ६० पाहुण्यांना विषबाधा झाली. त्यांना गोरेगाव ग्रामीण रुग्णालय, चोपा प्राथमिक आरोग्य केंद्र, जिल्हा सामान्य रुग्णालय गोंदिया या सोबतच गोरेगाव येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहे.

सविस्तर वृत्त असे की गोरेगाव तालुक्यातील बबई रहिवासी केशवराव भोजलाल बिसेन यांच्या धाकट्या मुलाचा लग्न सोहळा शुक्रवार ४ एप्रिल २०२५ रोजी आमगाव तालुक्यातील वळद या गावी झाला. लग्नसमारंभ आटोपल्या नंतर वरात शनिवार ५ एप्रिल ला दुपारी वराच्या घरी बबई येथे आली. दुपारच्या सुमारासच वरातीतील आणि घरच्या मंडळी करिता जेवण तयार करण्यात आले. त्या जेवणात वापरण्यात आलेले तांदूळ हे तीन वर्ष जुने होते तसेच टिनाच्या एका गंज चढलेल्या डब्यात ठेवलेले होते. या तांदळाचा वापर जेवणात करण्यात आलेला होता.

हे जेवण उपस्थित पाहुण्यांनी दुपारच्या सुमारास केले. त्यांना जेवण केल्यानंतर दोन-तीन तासाने सायंकाळच्या सुमारास उलट्या जुलाब आणि अतिसारचा त्रास जाणू लागला असता शनिवारी सायंकाळी ७:३० वाजता पासून जवळील गोरेगाव ग्रामीण रुग्णालयात उपचार करिता आणण्यास सुरुवात झाली. तर काही रुग्णांना त्रास जाणू लागल्यानंतर बबई गावा जवळील चोपा प्राथमिक केंद्र येथे दाखल करण्यात आले. मध्यरात्रीच्या सुमारास यापैकी पाच ते सहा रुग्णांना अधिकचा त्रास जाणू लागला असता त्यांची प्रकृती अत्याधिक अत्यव्यस्थ होत असल्याचे बघून गोरेगाव ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांनी त्यांना गोंदिया येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आले आहे . अशा ५ रुग्णांवर गोंदिया येथील के. टी.एस. जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहे.

काही रुग्ण गोरेगाव येथील खाजगी रुग्णालयात उपचार घेत आहेत. या संदर्भात गोरेगाव ग्रामीण रुग्णालयात उपचार घेत असलेले रुग्णांनी सांगितले की जेवणात तयार करण्यात आलेला भात हा काहीसा लालसर रंगाचा होता आणि ते जेवण केल्यानंतरच त्यांना उलट्या जुलाब आणि अतिसार चा त्रास जाणवू लागला. एकापाठोपाठ एक अशा सर्व जेवण केलेल्यांना हा त्रास जाणवू लागला असल्याने सर्व रुग्णांना गोरेगाव येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. बहुतांश रुग्णांची प्रकृती सध्या स्थिर आहे.